साल अखेर „ ७ „ १ ८८
किरकोळ अंकास ........................८४

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस........८१ न६
दुसरे खेपेस .... ........८१

Six monthly......... 3 ............... 8
Single copy ..................................4a

Advertisement
Below 10 lines ...... 2 R
Per line over 10 ......4 a
Repetition Per line...3 a

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXXII AKOLA MONDAY 7 FEBRUARY 1898 NO 6

वर्ष ३२ आकोला सोमवार तारीख ७ माहे फेब्रुवारी सन १८९८ इ० अंक ६

NOTICE

Notice is hereby given to the public that the Commission appointed by the Government of India to formulate for future guidance the lessons taught by the famine experience of 1897 have now assembled at Calcutta and will sit at the place named below on or about the dates mentioned for the purpose of hearing the evidence of witnesses from Berar:—

Nagpur 7th to 10th March 1898.

2. The commission desire to make it known that they are ready to receive the evidence of witnesses who consider themselves qualified & desire to give evidence touching the subject matter of the commission's inquiry. The points referred to the commission for inquiry and report are those mentioned below and all evidence must be strictly confined to these subject.

A ' epartures from the prescriptions of the Bombay Famine code which have occurred in Berar during the famine.

(B) The degree of success which has attended the measures adopted, considered primarily with regard to the relief of distress and the saving of human life, and secondarily with regard to economy.

(C) Advice as to the measures and methods of working which seem likely to prove most effective in future in these two respects.

(D) Other recommendations or opinions thought likely to be useful in future famines.

3. Witnesses offering evidence will be required to confine themselves strictly to these subjects and to send their evidence in written form, and in English, to the Secretary to the Commission as soon as possible. In so doing, the witnesses must give full particulars of their race, age, profession and residence and of the opportunities they have had of forming an opinion on famine and Famine Relief questions.

4. As the time at their disposal is limited the Commission do not bind themselves to invite all such volunteer witnesses to attend and be examined. Witnesses whom the Commission desire to hear will receive notice, by post, and any witnesses appearing in reply to such invitation will be paid his travelling expenses. No witness should attend for examination without an invitation from the Commission. In the case of witnesses who are not invited to attend their evideuce will be examined and placed on the record.

Calcutta 12—1—98 } (Sd.) Mc Intosh Secy. Indian Famine Commission.

---

## जाहिरात.

सन १८९८–९९ सालीं बाहेरचे प्रांतांतून गांजा आणण्यासाठीं व तो लायसेन्स मिळालेले किरकोळ विक्रीदारांस विकण्या साठीं प्रत्येक तालुक्या करितां एक ठोक विक्रीदार लायसेन्स देऊन नेमला जाणार आहे.

लायसेन्सा बद्दल फी द्यावी लागणार नाहीं; परंतु त्या ठोक विक्रीदारास काडी कचरा काढून साफ केलेल्या गांजाच्या दर शेरास ३ रुपये प्रमाणें सरकारास कर द्यावा लागेल, व तो किरकोळ विक्रीदारास दर शेरास ४ रुपये प्रमाणें विकण्याचें त्यास लायसेन्स मिळेल.

एखाद्या तालुक्यांत गांजाचे ठोक विक्रीचें लायसेन्स मिळावें अशी ज्याची इच्छा असेल त्यानें त्या जिल्ह्याचे डिपुटी कमिशनर साहेब यांजकडे तारीख २० फेब्रुवारी सन १८९८ चे पूर्वीं लेखी अर्ज करावा.

उमरावती
तारीख २७ जानेवारी सन १८९८

R. D. Hare,
Offg. Inspector General of Excise,
H. A. D

---

## जाहिरात

### वऱ्हाड हायस्कूल माजी विद्यार्थी समाज

वऱ्हाड हायस्कूलांतील सर्व माजी विद्यार्थी मंडळीस कळविण्यांत येते कीं सन १८९८ सालचा समाज दर्यापूर येथें तारीख ६ व ७ मार्च ( रविवार व सोमवार ) रोजीं भरविण्याचें सर्वानुमतें ठरलें आहे. वर्गणीचे दर नेहमीं प्रमाणें रु० १, रु० २, रु० ५, असे आहेत तर मंडळींनीं कृपा करून आपल्या योग्यते प्रमाणें वर्गणी देऊन समारंभास येण्याची मेहेरबानी करावी.

मुर्तिजापूर पासून दर्यापूर पर्यंत जाण्यासाठीं बैल गाड्याची चांगली तजवीज केली आहे.

दर्यापूर ता. १४ जानेवारी १८९८ } गोविंद कृष्ण पर्वते. गंगाधर नारायण जगदळे सेक्रेटरी

---

## जाहिरात

अकोलें गोरक्षण सभेस गोरक्षणाच्या अवश्यकतेबद्दल व उपयुक्तते बद्दल लोकांस सतत व्याख्यानें देणारा हुशार उपदेशक पाहिजे आहे. ज्याची इच्छा असेल त्यांनीं खालीं सही करणाराकडे ता० २०।२।९८ चे आंत अर्ज पाठवावेत. ज्या गृहस्थाची नेमणूक केली जाईल त्याचे योग्यतेप्रमाणें पगार ठरविण्यांत येईल कळावें तारीख २४।१।९८

केशव गोविंद दामले.
सेक्रेटरी गोरक्षण सभा अकोलें
प्रांत वऱ्हाड

---

नोटीस

रा. रा. पांडु वल्लद सखाराम वाघ बेराळेकर हल्लीं राहणार वझेगांव तालुके बाळापूर —यांस नोटीस देणार बायणी मर्द पांडु राहणार खीरोळ तालुके जळगांव नोटीसीनें असें कळविते कीं तुमचें बरोबर माझें लग्न होऊन आज अदमासे पंधरा—१५ वर्षे जाहलीं. मी शाहणी होऊन अजपासे चार ४ वर्षे जाहलीं. तुह्मी माझ्या बद्दल आजपावेतो कांहीं विचार कोणत्याही प्रकारानें केला नाहीं. मी आजपावेतो बहुत वेळां माझ्या बापाकडून तुह्मास कळवीत आले कीं मजला घेऊन जाऊन चार जातभाई गृहस्था प्रमाणें संसार करावा वगैरे. परंतु तुह्मी नुस्ते माझे बापास असे सांगतां की घेऊन जातो वगैरे. परंतु घेऊन जात नाही व माझे पोटपाण्याची तजवीज करीत नाहीं. माझा जन्म वाया जात आहे. हे दिवस संसार करण्याचे परंतु तुह्मी कांहीं तसें करीत नाहीं याजकरीतां नाइलाज होऊन तुह्मास ही नोटीस देऊन असे कळविते कीं तुह्मी मजला घेऊन जावे. चार जातभाई पंचाची खात्री करून द्यावी कीं माझे जिवास कांहीं इजा करणार नाहीं व मजला चार जातभाई गृहस्थाप्रमाणें घेऊन जाऊन संसार करावा वगैरे तर मी तुह्मा जवळ येण्यास एकापायावर तयार आहे. आता ही नोटिस पावल्या पासून १५ दिवसाचे आंत सदरीं लिहिले प्रपाणे तजवीज करून घेऊन जावे. घेऊन जाण्याचे अगोदर आजपावेतो पोटगीचे रुपये ९५० अडिचशे देऊन घेऊन जावे व असे जाहले नाहीं तर मी तुमचेवर पोटगी बद्दल सरकारांत फिरयाद करीन व नाइलाज ह्मणून मी पंचा मारफत व सरकारास कळवून दुसरा घरठाव करीन. हे तुह्मास कळावे ह्मणून दिल्ही नोटीस सही ता. २ माहे फेब्रुवारी सन १८९८ इसवी.

सही
सहीची निशाणी बांगडी
बायणी मर्द पांडु दस्तुर
सुकदेव वल्लद कचराजी पाटील राहणार
सवणे दस्तुर खुद्द

---

वऱ्हाडसमाचार

मिती माघ वद्य १ शके १८१९

---

रयतेच्या सोई कडे आणि सुखा कडे काळजी पूर्वक लक्ष दिल्यानें सरकारचें पोष्ट खातें लोकांस फार प्रिय आणि आदरणीय झालें आहे दिवसानुदिवस ह्या खात्यांत सुधारणा होत असून त्याचा विस्तार ही वृद्धिंगत होत आहे आणि या मुळें लोकांच्या व्यावहारिक हितांत फार भर पडत आहे. सन १८९६–९७ सालचा रिपोर्ट नुकतांच प्रसिद्ध झाला आहे त्यांतील मुख्य मुख्य माहिती दिली आहे—

चोहोंकडे गतसाल दुष्काळाचें होतें तरी त्याचा परिणाम पोष्ट खात्यावर कांहीं निदर्शनास आला नाहीं. मुंबई आणि सिंध या प्रांतांत प्लेग उत्पन्न झाल्यामुळें लोकांची फार धांदल उडाली व त्यामुळें बहुतेक सर्व देशभर विशेषें करून प्लेग झालेल्या भागांत पोष्टाचें काम फार वाढलें. एकंदरींत पाहतां सदरहू खात्याचें गतवर्षींचें काम सर्वतोपरी समाधान कारक झालें.

पत्रें, पार्सल्स वगैरे एकंदर ४ कोटि ३९ लक्ष जिनसांचा बटवाडा पोष्टांतून झाला. या शिवाय मनिआरडरींचा बटवाडा झाला तो वेगळाच.

गतवर्षी ३७० ठिकाणीं नवीन पोष्ट व १२५० पत्रें टाकण्याच्या पेट्या ज्यास्त स्थापन करण्यांत आल्या. मागील रिपोर्टाच्या सालापेक्षां ह्या सालीं, पोष्टकार्डस, पाकिटस आणि मनिआरडरी ह्यांचा एकंदर बटवाडा २ कोटि ६५ लक्षांनीं ज्यास्त झाला.

बंगाल, मुंबई आणि पंजाब प्रांतांत मागील रिपोर्टाच्या साला प्रमाणेंच ह्या वर्षीं पाकिटाच्या तिकिटां पेक्षां कार्डाचा ज्यास्त खप झाला. बेरिंग पत्राची संख्या मागील साला पेक्षां दीड लाखानें ज्यास्त वाढली. ही बेरिंग पत्रामध्यें वाढ प्लेगमुळें बरीच झाली असें पोष्टाचे आधिकारी ह्मणतात. रजिष्टर केलेल्या पत्रांची संख्या ८॥ लाख झाली ह्मणजे मागील रिपोर्टाच्या साला पेक्षां ह्या सालीं शेंकडा १००,८७ वाढ झाली. १८९५ च्या आगस्ट महिन्या पासून रजिष्टर न करतां पार्सलें पाठविण्याची व्यवस्था सुरू करण्यांत आली आहे. या व्यवस्थे पासून रजिस्टर्ड पार्सलांची संख्या कमी होईल अशी शंका वाटत होती; परंतु ही संख्या कमी न होतां उलट २७ हजारांनीं ज्यास्त झाली आहे.

एकंदर लोकसंख्येवर आणि ह्या लोकसंख्ये पैकीं ज्यास लिहितां वाचतां येतें अशा प्रत्येक इसमावर पोष्टांतून पाठविलेल्या पत्र वगैरे जिनसांची सरासरी काय पडते त्यांचें प्रमाण अनुक्रमें १·५४ आणि ३६·३९ असें काढण्यांत आलें आहे. हेंच प्रमाण मागील वर्षी अनुक्रमें १.४४ व ३४·३१ होतें.

इनलंड मनिआरडरची संख्या ह्या वर्षी मागील रिपोर्टाच्या वर्षा पेक्षां शेंकडा ९ व मनिआरडरच्या रकमेंत शेंकडा ६ प्रमाणें वाढ झाली आहे आणि या मानानें कमिशनच्या उत्पन्नांत ही शेंकडा ७ प्रमाणें वाढ झाली आहे.

गतवर्षी पोष्ट खात्यांत ज्या नवीन सुधारणा करण्यांत आल्या त्या पैकीं पुढील महत्वाच्या आहेत त्या येणे प्रमाणें:—

१ भरतपूर आणि खैरपूर या देशी संस्थानांत जीं देशी पोष्ट आफिसें होतीं तीं आतां सरकारी पोष्ट आफिसांत सामील केलीं आहेत.

२ प्रेसिडेन्सी सेव्हिंग ब्यांक्स होत्या त्या आतां पोष्टांतील ब्यांकेंत सामील केल्या आहेत.

३ कोयनाईन सर्व पोष्टांतून मिळेल अशी व्यवस्था केली.

४ मुंबई, नार्थवेस्टर्न प्रांत, औध व ब्रह्मदेश, या प्रांतांत फारेष्ट खात्याच्या वसुलाच्या वसुलाच्या रकमा मनिआरडरीनें पाठविण्याची व्यवस्था केली आहे.

५ कोर्टातील कागदपत्रांच्या नकला व्हॅल्युपेबलनें पाठविण्याची पंजाबांत जी व्यवस्था कांहीं ठिकाणीं केली होती ती आतां ज्यास ठिकाणीं करण्यांत आली आहे.

६ कलकत्ता, खुलना आणि इतर कांहीं भागांत ज्यास लिहितां येत नाहीं अशा माणसाची, मनीआरडरवर निशाणी न घेतां त्या ऐवजी त्याच्या अंगठ्याचा छाप घेण्याची नवीन व्यवस्था सुरेख रीतीनें केलेली आहे, व इतर सर्व प्रांतांतही लवकरच अशा व्यवस्था सुरू करण्याचा पोष्ट खात्याचा विचार आहे.

७ पत्रें नेमलेल्या वेळीं लोकांस मिळतात किंवा नाहींत ह्यावर पैरवी रहावी ह्मणून पोष्टाच्या छापांत तारीख महिना असून त्या शिवाय तास घालण्याची व्यवस्था केली आहे.

८ एखाद्या पार्सलवर कस्टमड्युटि अकारली असल्यास ती, तें पार्सल घेणारापासून वसूल करितां यावी अशाबद्दल पोष्टआफीसच्या कायद्यांत नवीन सुधारणा केली आहे

९ पोष्टांतून १० रुपये पर्यंत किंमतीचे व्हॅल्युपेबल पार्सल मालकाचे घरीं पाठविण्यांत येत असे. या वरील किंमतीचें पार्सल घेण्या करितां त्याला पोष्टांत यावें लागत असे. आतां अशीं पार्सलें २५ रुपये किंमती पर्यंत मालकांस घरीं पावतीं करण्याचें ठरविलें आहे.

१० वर्तमानपत्रें रजिष्टर करण्याची नवीन व्यवस्था सुरू केली आहे.

११ मुंबई व कलकत्ता, मद्रास व टुटिकोरिन ह्यांच्या दरम्यान नवीन मेल ट्रेनी काढून पत्रें वगैरे लौकर मिळण्याची सोय केली आहे.

ह्या वर्षी पोष्टांत बटवाड्या करितां मनिआरडर सुद्धां एकंदर ४४०८७१८९८ जिन्नस होते या पैकीं बटवाडा ४३६७१६-३२४ इतक्या जिनसांचा ह्मणजे शेंकडा ९९.०६ झाला बाकी राहिलेल्या जिनस। डेड लेटर आफिस कडे पाठविण्यांत आल्या

---

अकोला मुनिसिपाल कमिटीनें नवीन कर बसविण्याचा विचार केला असून त्या नव्या सूचने संबंधानें सर्व शहरभर वाटाघाटी चालू आहेत. घरपट्टी, जागा पट्टी, गाडीपट्टी जनावरपट्टी वगैरे नव्या नव्या पट्या बसविण्या संबंधानें लोकांच्या तक्रारी गोळा करण्या करितां मुनसिपालिटीनें स्वतंत्र जाहिरात दिलेलीच आहे. त्या जाहिरावी बरोबर लोकांच्या माहिती साठीं मुनसिपालिटीच्या जमाखर्चाचा अदावा छापला असतां तर त्या बाबदींत आपापला अभिपाय तयार करण्यास लोकांस चांगलें साधन मिळालें असतें. मुनसिपालिटीचें ह्मणणें असें कीं त्या संस्थेचे खर्च वाढले आहेत, उत्पन्नाच्या बाबी फार कमी झाल्या आहत आणि त्या अर्थी नवीन करांच्या रूपानें उत्पन्न वाढविल्या शिवाय मुनसिपालिटीला आपलें अस्तित्व कायम राखण्यास गत्यंतरच नाहीं. नवीन कर बसविणें हाच एक उपाय मुनसिपालिटि जवळ शिल्लक राहिला आहे. मुनसिपालिटीचा अगदीं निरुपाय झाला आहे आणि या स्थितींत लोकांसही नवीन कर दिल्या शिवाय दुसरा तरणोपाय नाहीं असा मुनसिपालिटीच्या सूचनेचा भावार्थ आहे.

मुनसिपालिटीच्या दृष्टीनें लोकांनीं विचार केला तर त्यांनीं बिनतकार नवीन कर देण्यास सिद्ध असावें असाच विहित मार्ग दिसेल. मुनसिपालिटीच्या रिपोर्टांत मे. कमिशनर साहेबांनींही शेरा ठोकला आहे कीं मुनसिपल हद्दींतील लोकांवर करांचा बोजा हलका आहे आणि त्यांनीं नवीन कर आनंदानें स्वतांवर बसवून घ्यावेत.

मुनसिपालटीला नळाच्या पाण्याचा खर्च मोठा सोसावा लागतो. कापशीच्या विहिरीचें पाणी गोड, पाचक व आरोग्यकारक आहे आणि तें लोकास पिण्यास मिळावें ह्मणून ७।८ लक्ष रुपये खर्चही झाला परंतु पाण्याविषयीं लोकांचे हाल कहीं कमी नाहींत. पावसाच्या कमतई मुळें हा तोटा पडला आहे तथापि पाण्याचा अमोल्य फायदा ह्मणजे लोकांच्या पैशाचा उत्तम मोबदला होय. पर्जन्यकाळ चांगला होईल तेव्हां ही पाण्याची दुर्भिळता नाहींशी होईल. या नळाच्या पाण्याबद्दल सालिना ६००० रुपये कर्जाच्या फडीकड द्यावे लागतात, त्या शिवाय दरसाल विहिरींतलें पाणी पंपानें नळांत आणण्यासाठीं सरासरी २५०० रुपये खर्च पडतो. प्राथमिक शाळांच्या खर्चाचा तिसरा भाग सरकार देते आणि २ भाग मुनसिपालिटीला द्यावे लागतात. हा बोजा उत्तरोत्तर वाढत आहे. उत्पन्नाच्या बाबी पैकीं सट्टाकर फार कमी झाला असून ती बाबच अगदीं नाहींशी होईल. मुनसिपल हद्दींतील जाग्यांचें भाडें सरकारानें काढून घेतलें आहे. तसेंच टाऊन फंडाची आकारणी सरकारी अधिकाऱ्यांवर करूं नये असा नवीन ठराव करण्यांत येत आहे. दुष्काळा निमित्त एक मोठीशी रक्कम खर्चण्यांत आली आहे. हा तोटा भरून काढण्या साठीं व नवीन खर्च भागविण्या साठीं नवे कर बसविण्याची योजना होत आहे.

आतां लोकांच्या दृष्टीनें या प्रश्नाचा विचार निराळाच होण्या सारखा आहे. हल्लीं लोकांस मुनसिपाल करांचा बोजा मोठा वाटतो. लोकांस अधीक देण्याचें सामर्थ्य नाहीं असा आमचा समज आहे. लोकांची नादानी जर खरोखरीच आहे तर अवाढव्य खर्च करणारे मुनसिपालिटीचें कृत्रिम यंत्र लोकांस नको असेंच ह्मटलें पाहिजे. उत्तम उत्तम राजवाडे सार्वजनिक बांधले व सर्व सोयी करून ठेविल्या आणि अशा ठिकाणीं गरीब लोकांस राहण्याची जबरी केली व त्याबद्दल नंगी भाडें देण्याविषयीं सक्ती केली तर त्यांची जी दशा होईल ती दशा सध्यां अकोल्याच्या लोकांची झाली आहे. गरीब लोकांस गांव सोडून जाता येत नाहीं व मुनसिपल करही देण्याची शक्ती नाहीं. असा खरा प्रकार जर आहे तर त्याला काय युक्ती करावी अशाविषयीं मोठा गूढ प्रश्न सध्यां लोकापुढें आहे. पुष्कळ लोकांचे अभिप्राय गोळा करण्याच्या खटपटींत आह्मी आहों ह्मणून आह्मी दोन्ही बाजूंची स्थिति इतक्या स्पष्टतेनें कळविली आहे. मुनसिपालिटीच नको असें ह्मणून कांहीं अर्थ नाहीं. कोणती तरी संस्था आह्मास पत्करावी लागेल. खर्च कमी करावे आणि किंवा तो कमी करण्यासाठीं मुनसिपालिटीनें आपल्याकडील शाळाखातें व इतर असेंच खर्चीचें खातें झुगारून दिलें पाहिजे. सरकारी युक्ती मुनसिपालिट्यावर खर्चाचा बोजा लादण्याची आहे आणि मुनसिपालिटीकडील उत्पन्न काढून घेण्याची व्यवस्था देखील या युक्तीचा परिणाम आहे. खर्च कमी केल्या शिवाय दुसरें गत्यंतर नाहीं. नवीन कर बसविण्याची युक्ति मोठी आहे. काटन व ग्रेन मार्किटा बद्दल नवीन कायदा करून त्यांचें उत्पन्न मुनसिपालिटीच्या हातांतून काढून घेतल्या प्रमाणेंच झालें आहे. उत्पन्न कमी झाल्याबरोबर त्या संबंधी व्यवस्था मुनसिपालिटीनें सोडून खर्च कमी केला पाहिजे. लोकांच्या विचारा प्रमाणें नवीन कर न बसवितां प्रस्तुतच्या उत्पन्ना बाहेरील खर्च बंद करण्यांत यावे. ही गोष्ट उत्तम दिसते. सरकारि नौकरावरील टाऊन फंड निवाळा तर त्या ऐवजीं सरकारी चाकरी वरच निराळा कर बसविण्याची योजना केली पाहिजे. सारांश, खर्च कमी करावा हीच गुरुकिल्ली विद्यमान स्थितीला चांगली लागू पडते.

---

गेल्या सोमवारीं दामोदर हरी चाफेकर याजवर पुण्याच्या सेशन कोर्टासमोर मि. र्‍यांड व लेफटेनंट एअर्स्ट यांच्या खुना संबंधानें खटला सुरू करण्यांत आला आणि अखेरीस त्याच्यावर अपराधाची शाबिती होऊन त्यास फांशीची शिक्षा सांगण्यांत आली. या निकाला संबंधानें कायदे-पंडितांचें मत द्विधा पडतें. कोणी ह्मणतात कीं अपराध स्थापित होण्या इतका पुरावाच नव्हता व कबूली जबाब शिक्षा देण्याला पुरेसे नव्हते. खुनी मनुष्य फांशीवर चढला जाणार आहे तेव्हा मि० र्‍यांड व लेफटेनंट एअर्स्ट यांच्या खूना बद्दलचें वादळ ईश्वर कृपेनें शांत होईल असें आह्मी ह्मणतों. सरदार नातूंची सुटका करण्याची वेळ आतां आली आहे. त्यांच्या वरील बादरायण संबंधाच्या आरोप दूर झाला आहे. तसेंच रा० रा० टिळक व इतर तिघे पत्रकार यांस मुंबई सरकार माफी देईल तर तो दयाळूपणा सरकारास फार भूषणाचा होईल.

---

# The Berar Samachar

MONDAY FEBRUARY 7 1898

An annual report is not always a pleasant reading. The vast array of figures and statistical tables taxes the patience of a general reader. But a change is coming on in the matter of writing out annual reports. Mr. Obbard as the Judicial Commissioner has laid out a new plan altogether. His Civil and Criminal reports are inimitable for his singular manner of dealing with the subject materials of an annual report. He never writes in vague generalities. No gentleman working under him can escape the liberal but scrutinizing eye of the august controller of the Judicial department in Berar. It is equally difficult to point out a single passage as better or worse than the other. Mr. Obbard's remarks and suggestions are interspersed in a strange manner and spread over the whole range of the body of the report. His way of stating plain things in plain language is worth careful study. He is not sparing in his obserations against any officer Native or European but his remarks come home as an agreeable surprise and form the best commentary upon the public life he criticizes. He ever draws sharp lines between the public life and the private life of individuals. He is a moralist of a stern type but has got the singular tact of never mixing the two individualities public and private. He instructs a reader while he writes out his annual reports. The changes he has in view, the demand for a fixed out-turn of work, the quality of the work he expects from his subordinates and similar other minute details of his expectations are well indicated in numerous places and on different occasions in these annual documents. We recommend to our readers to read the civil and criminal reports of the last year and he will see therein the sure signs of an improvement in the inditing of annual reports. We think that these two reports will serve as the best specimen. They are the object—lessons in the matter of framing annual reports. Mr. Obbard has got a large heart and one will be struck with the generous attack he levels against defaulting officers. His judicious mind, his high legal acumen and sound scholarship are almost proverbial in the province and his name is quoted with pride and grace as a house—hold term for justice pure and simple. The annual reports form the least portion of his great work as Judicial Commissioner. We have advertised to the good points of his reports with a specific purpose in view. We wish to check the bad taste that prevails in some other quarters. The reports on Municipalities and Local Boards are instances of the bad lot. They have got every thing that a document of public reference should not contain. An annual report is within its legitimate limits when it registers in a summary from the events of the year under review. It is a retrospect that views the past events as a whole in

all its bearings. In order to prevent introduction of other irrelevant topics in a report, the Government of India have wisely prescribed certain forms and arrangements under specific headings. These rules are however more honored in their breach. We wish that the dictates of a good tone will soon get pre-eminence and a wise and liberal policy will mark a new erra in the writing of annual reports.

We are glad to note that the Sedition-bill is amended in important clauses in the light of the criticisms and memorials that have been submitted to the Government for favour of consideration. The new law retains almost the old law as defined by the Hon'ble Mr. Justice Parsons of the Bombay High Court in the *Pratoda* case. Ill—will is declared to be consistent with genuine loyalty and so that ill—fated term. "Ill—will" has been expunged from the present law. Stirring ill feelings between the different races of the subjects of Her Majesty has been classed as a separate offence not against State but against public tranquility. The word 'Government' has not been used in the vague and wide sense whereas the old phraseology has been retained in *toto*. Let us hope that public opinion as reflected in the 13th Resolution of the National Congress at Amraoti will win the day and the law of sedition will be left as it is to remain a dead-letter within the vast empire The Criminal Procedure amendment bill is still under consideration of the Select Committee. The agitation against the proposed changes in the law of sedition is most intense and we hope that the Government will do well in listening to the voice of prudence and good conscience that comes out from the public mind.

## वऱ्हाड

हवामान— थंडीचें मान अगदींच उतरत चाललें आहे. किरकोळ आजारांचें ठाणें ज बरदस्त बसलें असून प्लेगचा आजार खानदेशांत वाढत आहे ही गोष्ट मोठ्या चिंतेची आहे.

मि० मीडो साहेब डिपुटी कमिशनर यांची स्वारी वार्षिक दवरा पुरा करून अकोल्यास परत आली आहे.

मि० सफदर अल्ली बेग ए० असि० कमिशनर, मेहकर यांनीं तीन महिन्याची रजा घेतल्यामुळें त्यांच्या जागीं रा० रा० जी. सुब्रायलू नायडू ए० असि० कमिशनर यांस मलकापुराहून मेहकरास बदलण्यांत आलें आहे.

रा० रा० त्रिम्बक गणेश परांजपे ए० असि० कमिशनर हे रजेवरून परत येऊन आपल्या मलकापूरच्या कोर्टात दाखल झाले.

धळेकर 'मदक' संगीत नाटककार मंडळीनें परवा रात्रौ संगीत 'वीरसेन मंजरी' नाटकाचा प्रयोग करून दाखविला. ही मंडळी येथून अकोटाकडे जाणार आहे. या कंपनीचीं नाटकें येथील अशिक्षित गुलजार मंडळीस बरीच पसंत पडलीं होतीं.

मि. एच. ए. हीथ पोलीस सुपरिंटेंडेंट वर्ग २ व आफिशिएटींग वर्ग १ हे निवर्तल्यामुळें गेल्या आगष्टच्या २२ वे तारखे पासून खालील बदल्या देण्यांत आल्या आहेतः—

| मि. | सुपरिनटेंडंटचा वर्ग |
|---|---|
| सी. ए. फ्रेजर | १ |
| आर. गोलेवे | २ |
| एफ. सी. क्राफर्ड. | ३ |
| जे. सुवेल | ३ |
| आर. म्यॅगिल्ल | ३ |
| एफ. टी. कूड | ४ |
| जी. राईट | ४ आफि |
| ए. डी. स्पान्सकी | असि. सुपरि. वर्ग १ |

कर्नल मेकंझी पेनशनर रेसिडेंट यांची स्वारी हैदराबादेस 'डेकन खाणीचे डायरेक्टर' या नात्यानें आली आहे. साहेब बहादूर शरीर प्रकृतीनें चांगले असून ते त्या संस्थानांत मोठे अधिकारी होणार आहेत असें ऐकिवांत आहे.

रा० रा० रामचंद्र भास्कर जयवंत हे रजेवरून परत येऊन तेल्हारे येथील क्लार्क आफ कोर्टाचे जागीं रुजूं झाले.

### Notice

Under rule 12 of the Municipal Election Rules, it is hereby published for general information that elections to fill up the vacancies of Members in the Akola Municipal Committee who retire under the operation of Rule 31 of the Municipal Rules and that of Mr. Laxman Krishna Chiplonkar who has resigned, shall take place from 7 A. M. to 5 P. M. on the 25th, 26th and 28th February 1898. The following table gives for each ward, names of outgoing members, date and place of election, name of polling officer, and the dates before which nomination—papers under Rule 13 of the Municipal Rules should be delivered to the polling officer.

Dated Akola 4th February 1898 — K. G. Damle, Secretary Municipal Committee Akola

| Ward | Names of Retiring members | Date of election | Place of Election | Name of Polling officers | Date before which nomination papers to be submitted | Remarks |
|---|---|---|---|---|---|---|
| I | Mr. Ganoba Raghoba<br>" R. J. Thompson | 25th February 1898 | Patels Chowri | Md. Sk. Ismail Esquire Extra Assistant Commissioner | 17th February 1898 | |
| II | " Jaikrishna Bagajee<br>" Md. Abdul Aziz (already resigned) | 26th February 1898 | Grain Market Office | | 18th February 1898 | |
| III | " Hakimoddin<br>" Waman Narayan Kale<br>" Laxman Krishna Chiploukar (already resigned) | 28th February 1898 | Town Hall | | 20th February 1898 | |

Dated Akola 4 February 1898 — K. G. Damle, Secretary Municipal Committee Akola

## जाहिरात.

म्युनिसीपल नियमांतील नियम १२ अन्वयें जाहिर करण्यांत येतें कीं अकोले म्युनिसीपल कमिटींतील तारीख ३१ माहे मार्च सन १८९८ इ. रोजीं ज्या मेंबरांच्या जागा सदर्हू नियमां पैकीं नियम ३१ प्रमाणें खालीं होतील त्या व मिस्तर लक्ष्मण कृष्ण चिपळूणकर यांनीं राजीनामा दिल्यामुळें खालीं झालेली जागा भरण्या करितां तारीख २५।२६।२८ माहे २ सन १८९८ इ. रोजीं सकाळचें सात वाजे पासून सायंकाळचें ५ वाजे पावेतों निवडणूक होणार आहे. खालीं दिलेल्या तक्त्यांत प्रत्येक वार्डा पैकीं मेंबर निघाले त्यांचीं नांवें त्या वार्डा करितां होणाऱ्या निवडणुकीची तारीख, जागा, पोलिंग आफिसरांचें नांव व उमदवारांनीं कोणते तारखे पर्यंत पोलिंग आफिसरकडेस म्युनिसिपल नियम १३ प्रमाणें आपले अर्ज द्यावेत. ही माहिती दिली आहे.

अकोला तारीख ४ माहे फब्रुआरी सन १८९८ — K. G. Damle, सेक्रेटरी अकोला म्यु. क.

| वार्ड | मेंबरांचीं नांवें | निवडणुकीची तारीख | निवडणुकीची जागा. | पोलिंग आफिसराचें नांव | कोणते तारखेचे आंत उमेदवाराचें नांवचा कागद द्यावयाचा. |
|---|---|---|---|---|---|
| १ | मि. गणोबा राघोबा, मि. आर. जे. थॉमसन. | २५ फेब्रुआरी १८९८ | पाटील चावडी | मे० महमद शेख इस्मायल साहेब ए. अ. कमिशनर. | १७ फेब्रुआरीचे आंत |
| २ | मि जैकृष्ण बगाजी, मि. महमद अबदुल अझीस. (यानीं पूर्वींच राजीनामा दिला आहे) | २६ फेब्रुआरी १८९८ | ग्रेन मार्केट आफीस | | १८ फेब्रुआरीचे आंत |
| ३ | मि. मौलवी हकीमुद्दीन. मि. वामन नारायण काळे मि लक्ष्मण कृष्ण चिपळूणकर. (यांनी पूर्वींच राजीनामा दिला आहे. | २८ फेब्रवारी १८९८ | टाऊनहाल | | २० फेब्रवारीचे आंत |

तारीख अकोला ४ माहे फेब्रुआरी सन १८९८ — K. G. Damle. सेक्रेटरी म्युनिसिपल कमिटी अकोला

रा० रा० वऱ्हाडसमाचार कर्ते यांस
हिंदुस्थानवासी राजनिष्ट प्रजाजन सरकारास राजद्रोही दिसावेत हें प्रजेचे दुर्दैव होय. आह्मा हिंदुस्थानवासी प्रजा संबंधानें मागील राजेलोक काय ह्मणतात ते पहाः—
This is what is recorded regarding the character of the Hindoos by the Emperor Akbar:—The Hindoos are religious, affable, cheerful, lovers of Justice, given to retirment, able in business admirers of truth, grateful and of unbounded fidelity. their soldiers know not what it is to fly from the field of battle. अकबरचा आह्मावर चांगला विश्वास असे. आणि ह्मणून त्याला त्याचा मोठा जय मिळाला. त्याच वेळेपासून आह्मी हिंदु तेच आहोंत. व हल्लीं आह्मी इतके राजद्रोही कां दिसतो ह्याचें कारण आह्मास तरी समजत नाहीं. असो. राजद्रोहाचें आरोपा वरून आह्मा पैकीं पुढारी तुरुंगांत पडले ही मोठी दुःखी गोष्ट होय. एवढ्यानेंच जर हा सुरू केलेला राजद्रोहाचा तोफखाना संपता तर त्यांतल्यात्यांत कांहीं तरी सुख मानण्यास जागा झाली असती. परंतु हल्लीं असलेल्या कायद्यांत ही फेरफार करून मुळींच वर्तमानकर्त्यांचें स्वातंत्र्य हिरावून घेण्याचा प्रयत्न चालला आहे! वर्तमानपत्रेंहीं राजा आणि रयत यांच्या मधील नलिकायंत्रें होत. प्रजेस काय वाटतें, राजास काय वाटतें हें एकमेकाचें एकमेकांस कळविण्याचें काम त्यांचें आहे, हें सरकारासही नाकबूल करितां येणार नाहीं मग इंग्रज सरकारा सारख्या परकीय सरकारास तीं नाहींशीं करण्याचें कां वाटतें आहे हें आह्मास तरी निदान समजत नाहीं.

कायद्यांत जो फेरफार होण्याचें घाटत आहे त्याजबद्दल सर्वत्रांनीं आपआपल्यापरीनें ना पसंती दर्शविली आहे. The Englishman सारख्या आंग्लों इंडियन व नेटिव्ह द्रेष्ट्या पत्रकारांनीं ही आपली नापसंती फार जोरदार शब्दांनीं दाखविली आहे या वरून हा होणारा फेरफार सरकार चरणीं लीन होऊन पाठ थापटून घेण्यास नाहीं संमत नाहीं हें उघड आहे.

मुंबई, मद्रास, बंगाल पंजाब वगैरे प्रांतांतून मोठमोठ्या सभा झाल्या व तेथील लोकांनीं सरकारास या बाबतींत विनंती अर्ज पाठविले आहेत. हें सर्वत्रास माहीतच आहे.

आपल्या ह्या वऱ्हाड प्रांतात त्याजबद्दल अजून कांहींच चर्चा चालू नये ही मोठी दुःखाची गोष्ट आहे.

वऱ्हाड प्रांतातील लोक हे विद्येंत मागें आहेत असे नाहीं. त्यांना भाषण स्वातंत्र्य व लेखन स्वातंत्र्य नको आहे असें नाहीं मग त्यांनीं अशा वेळीं स्वस्थ कां बसावें हें समजत नाहीं. कायदेशीर रीतीनें सार्वजनिक हिताकरितां, चळवळ करण्यास कोणचीही हरकत नाहीं. कायद्या संबंधानें सरकाराकडून विचार लौकरच होणार आहे तर आमची मंडळी आपलें मत लौकरच सरकारास दर्शवितील अशी आशा बाळगून हें इतकेंच पत्र पुरें करितो.

वऱ्हाडांतलि सर्वत्र पत्रें हा मजकूर प्रसिद्ध करितील अशी आशा आहे.

"तोष"

## वर्तमानसार

वृद्ध भीष्माचार्य मि. ग्लाडस्टनसाहेब यांची प्रकृती अस्वस्थ असल्याचें समजतें हल्लीं ते आपल्या कुटुंबांतील एकंदर माणसासह केनस शहरीं जाऊन राहिले आहेत.

धरणीकंपाचा धक्का बसून घर वगैरे अंगावर पडलें असतां, त्यापासून मनुष्यास इजा होऊं नये ह्मणून एक आंगरखा तयार झाला आहे. ही आंगरख्याची युक्ति गेल्या सालच्या आरंभीं इंग्लंडांत धरणीकंपाचा धक्का बसला तेव्हां निघाली. हा आंगरखा अंगांत असला ह्मणजे धरणीकंपापासून किंवा ज्वालामुखी पर्वताच्या उद्रेकापासूनही भीति बाळगण्याचें कारण नाहीं. हा आंगरखा डोक्यापासून तो पायापर्यंत लांब असतो व डोकीवर घेण्याची टोपीही त्यालाच जोडलेली असते. तो अतिशय जाड कापडाचा केलेला असतो. वस्तुतः एकावर एक असे दोन आंगरखेच शिवलेले असतात ह्मटलें तरी चालेल. त्यांच्यामधील पोकळी भरून काढलेली असते. हा आंगरखा टोपी यांची जाडी चार इंच असते. त्याला बटना ऐवजीं बंद असतात व त्यामुळें ती अंगांत घालायला उशीर लागत नाहीं. या आंगरख्याला प्रत्येक बाजूला दहा दहा मिळून लहान मोठे वीस खिसे असतात. त्यांत वाटेल ती सामुग्री राहण्याची सोय असते. प्रत्येक खिशाची रचना निरनिराळे जिन्नस ठेवण्या जोगी केलेली असते, व त्यामुळें त्यांतील जिनसांवर कांहीं दिवसपर्यंत निर्वाह करण्यास अडचण नाहीं. आतां कांहींच संरक्षणाचा दुसरा उपाय राहिला नाहीं ह्मणजे या आंगरख्याचा उपयोग करावा. हा आंगरखा अंगांत वसला ह्मणजे अंगावर कांहीं पडलें तरी इजा व्हावयाची नाहीं. एकादें इंजिन फुटलें तरीहि तो उपयोग पडण्यासारखा आहे असें सांगतात.

एका जर्मन रोगजंतूविषयीं माहीतगार मनुष्यानें याकोहामा ( जपान ) येथें एक अत्यंत विलक्षण घर बांधलें आहे. त्या घरांत कोणत्याही रोगाचे जंतू शिरत नाहींत व शिरलें तर जगत नाहींत. मरून जातात या घराची अशी रचना केली आहे. तें सगळे कांचेच्या जाड फळ्यांचें बांधलेलें आहे. त्या घराला खिडक्या नाहींत व दरवाजे आहेत तेही कांचेचे असून बंद केले ह्मणजे आंत वारा देखील येत नाहीं. या घरांत हवा सोडण्यासाठीं एक पंप तयार केला आहे व त्यांच्या तोंडाशीं पिंजरलेला कापूस बसविलेला आहे. हवेंत रोगजंतू असल्यास त्या कापसांत ते अडकून राहतात. त्यांतूनही कांहीं जंतू राहिल्यास ती हवा ग्लिसरीन लावलेल्या भिंगाच्या जाळातून आंत सोडली जाते, व ते जंतू चिकटून राहतात. बाहेरून येणाऱ्या माणसांच्या कपड्यांवरून वगैरे जंतू आंत आल्यास ते सूर्यकिरणांच्या योगानें मरून जातात. या घरांत सूर्याचे किरण सारखे पडत असतात. भिंगाच्या फळ्या सांधायला असें कांहीं क्षारांचें मिश्रण लावलें आहे कीं तें सर्व उष्णता शोषून घेतें, यामुळें तें घर दिवसा थंड राहतें, व रात्रीं तें क्षारमिश्रण ती उष्णता बाहेर टाकीत असल्यामुळें चांगलें ऊबदार असतें. हें विलक्षण घर बनविण्याची युक्ति काढणारा मोठा हुशार असला पाहिजे यांत शंका नाहीं. करमणूक.

अद्भुत युक्ति!—एका जर्मन कल्पकानें अशी एक तिजोरीच्या पेटीची रचना केली आहे ह्मणतात कीं, चोरानें त्या तिजोरीचे कुलूप तोडल्या बरोबर त्या तिजोरीची दोन्ही दारें एकदम फाडदिशीं आपाप उघडी होतात व ती त्या चोराला पकडून, ओढून नेऊन त्या तिजोरींत दडपतात, आणि पुनः फटफट गच्च लागून व आपाप आंत त्या चोराच्या हातांत बिड्या पडून सकाळीं त्याला पोलिसानें माजिस्ट्रेटाच्या पुढें नेऊन उभा करावा, इतक्या तयारींत तो चोर ठेविला जातो!

कामकरी बायकांचा अपूर्व बिछाना!—अमेरिकेंत एकानें " कामकरी बायकांचा अपूर्व बिछाना " ह्मणून एक विलक्षण कल्पनेचा पलंग तयार केला आहे. त्याचा गुण असा आहे कीं, पहाटे एका नियमीत वेळीं त्या पलंगावर निजलेल्या कामकरी बायकाला हालवून जागी करण्यांत व उठविण्यांत येतें, नंतर तिला नीटनेटके कपडे पेहेरण्यांत येतात. पुढे तिला माडीवरून स्वयंपाक घरांत नेण्यांत येऊन चुलीमध्यें विस्तव कसा पेटत घालावा तें दाखविण्यांत येतें!

चंबा ( पंजाब ) संस्थानांत हल्लीं दर रुपयास २९ शेर गहूं आणि ४० शेर सतु मिळतो.

प्राणीशास्त्रवेत्ते असें सांगतात कीं, हंसांना मनुष्याच्या दृष्टीनें दिसणाऱ्या पदार्थांचा आकार त्यांच्या वीस पटीनें मोठा दिसतो.

ह्यापुढें आफ्रिकेंत लष्करी कामावर गुर्खा किंवा शीख या लोकांपैकीं कोणासही न पाठवितां फक्त मुसलमानांस पाठविण्यांत यावें असें ठरलें आहे,

प्रसिद्ध यहूदी नऊकोटनारायण श्रीमान् गृहस्थ राथ्शील्ड ह्यांचा विचार, ईस्टर्न बंगाल रेल्वे स्टेट लाईन नॉर्थवेस्टर्न रेल्वे लाईनमध्यें ज्या प्रमाणें फायदा मिळत आहे त्याप्रमाणें मिळेल ह्मणून सरकारापासून विकत घ्यावा असा आहे. व त्याबद्दलचा प्रश्न विलायत सरकारच्या पुढें आला आहे.

प्रेतात जीव आला!—पेशावर येथें थोडे दिवसांपूर्वी तेथील हास्पिटलमधील प्रेतागारामधल्या एका फरसावर चार प्रेतें आणून ठेविलीं. रात्रीं त्यांतील एक प्रेत उठून बसलेलें तेथें पाहऱ्यावर असलेल्या दोघां शिपायांनीं पाहून तेथील अधिकाऱ्यांस कळविलें, असें सिव्हिल आणि मिलिटरी ग्याझेट पत्रावरून कळतें.

विलक्षण केळ.— कारकान प्रांतांतील कुंडलगयी नांवाच्या गांवी एके बागेंत एक केळ आहे. तिच्या सर्व शाखा तिचे शेवटास फुटल्या असून, ती केळ नुक्तीच व्याली, तो तिचें लोंगर तिच्या शेवटाकडून न निघतां त्या कर्दलीस्तंभाच्या मध्यांतूनच निघालें. अशा प्रकारें केळ भलत्याच ठिकाणून व्याल्याचें उदाहरण इतर कोठें पाहिल्याचें कोणासही माहीत नाहीं. ही केळ तिच्या एकंदर रचनेवरून असाधारणच दिसते. तिच्या शाखाची ठेवण व तिचा प्रसव हीं इतर केळीहून अगदींच वेगळीं आहेत. नाना रत्नानि वसुंधरा.

आजपर्यंत तार व टपाल खात्यांतील नोकरांस मात्र आपल्या आयुष्याचा विमा उतरून सरकारांत पैसे भरण्याची सोय असे परंतु आतां सरकारी रीतीनें विमा उतरण्याची सोय सर्व खात्यांतील सरकारी नौकरांस व्हावी अशी सरकारानें व्यवस्था केली असून ती व्यवस्था येत्या फेब्रुवारी महिन्यापासून अमलांत येणार आहे. हा विमा ४००० रु. पर्यंत उतरण्यांत येईल. व ही रक्कम आपल्या हयातींत आपल्याला मिळेल. अशी ही व्यवस्था करण्याची सोय विमा उतरून घेणारास करितां येईल. अशी सवड सरकारनें ठेविली आहे. येणेंकरून पुष्कळ सरकारी नौकर आपला फायदा करून घेतील ह्यांत शंका नाहीं.

क्यूबा बेटांत जें बंड झालें त्यांत स्पेन सरकारचें फार नुकसान झालें, अशा हकीकती प्रसिद्ध झाल्या आहेत. त्या बेटावर स्पेन देशचा अम्मल असून तिकडे त्या सरकारचें सैन्य १,९२,००० जनरल वेल्ड ह्या सेनापतीचे ताब्यांत सदरचे बंड मोडण्याकरितां दिलें होतें त्यांतील आतां फक्त ८९,००० सैन्य रणांगणीं उभे राहण्यासारखें शिल्लक राहिलें आहे. सुमारें ४०,००० सैन्य दवाखान्यांत जखमी व घायाळ होऊन उपचार घेत पडले आहे; आणि ३६,००० सैन्य बंडखोरांशीं लढतांना मारले गेले किंवा तेथें सुरूं झालेल्या रोगाला बळी पडले ! ऐवढा नाश, स्पेनच्या लष्करानें कोणत्याही प्रकारचा विशेष स्मरणीय व नांवाजण्या सारखा जय मिळवून झाला असेंहि नाहीं बंडखोर लोकांचें सैन्य २०,००० पेक्षां कोठेंहीं अधिक न्हवतें असें असून इतक्या थोड्या लोकांकडून एवढ्या मोठ्या सैन्याचा पराभव व्हावा आणि इतका नाश व्हावा ही मोठ्या सखेदाश्चर्याची गोष्ट आहे. सारांश, स्पॅनिश सरकारला क्यूबा बेट ताब्यांत राखणें बरेंच कठिण झालें आहे असें दिसतें.

बनावट दांत पक्के होऊन वाढूं शकतात—मनुष्यांचे स्वभावतः असलेले मूळचे दांत पडल्य वर दुसरे कृत्रिम दांत बसविण्यांत येतात. परंतु ते मूळच्या दातांच्या जागीं बसविण्यास त्यांची वाढ होईल कीं नाहीं याचा अनुभवप्रयोग पाहण्याचें काम आजपर्यंत अनेक कुशल दंतवैद्यांनीं चालविलें होतें. आणि त्या अनुभव प्रयोगांत यश मिळाल्याचें नुक्तेंच प्रसिद्ध झालें आहे. मॉस्को येथील प्रसिद्ध दंतवैद्य डा. झामेन्स्की यानें कुत्री आणि माणसें यांस कृत्रिम दांत बसवून ते पहिल्या दांतांच्या जागीं उत्तम रीतीनें कायम होऊन ते स्वाभाविक दांतांप्रमाणें बनतात. असे अनुभव पाहिले आहेत. हे कृत्रिम दांत गट्टापर्चा पोर्सिलेन किंवा धातु यांचे बनवलेले असून त्यांच्या मुळांशीं छिद्रें ठेविलीं असतात. त्याप्रमाणें जाभांडानाही छिद्रें पाडण्यांत हे कृत्रिम दांत पहिल्या दातांच्या खांचीतून ठेवण्यांत येऊन त्यांस बांधून टाकतात. थोडेच दिवसांनीं त्या दांतांच्या छिद्रांतून जाभाड्यांतून निघणारे मांसकण शिरतात आणि तेथें वृद्धि पावून ते त्या दांतांस पक्के धरतात. व येणें प्रमाणें ते कृत्रिम दांत मूळच्या दांतांप्रमाणें अगदीं बळकट बसून पक्के होतात. व त्यांची वाढ कायम झाल्यासारखी होऊन ते दांत माणसाच्या जन्माला बहुतकरून पुरेसे होतात. ह्या अनुभवप्रयोगानें जगांत एक नवीन उपयुक्त शोध अंमलांत आल्यासारखें होत आहे !

स्वर्णवर्ण गरुडपक्षी— थोडे दिवसांपूर्वी न्यूयॉर्कपैकीं लॉग ऐलंड मधील सेडरहर्स्ट जवळ एक फार मोठा गरुड पक्षी पकडण्यांत आला. त्याचा रंग अगदीं सोन्यासारखा असून अशा रंगाचा ह्या जातीचा पक्षी कधी कोणी कोठें पाहिला नव्हता. तेथें कोण मि. लॉईड नांवाच्या गृहस्थाचें एक तीन वर्षांचें मूल आपल्या घरापासून जवळच खेळत होतें. त्या मूलाला पकडून उचलून नेण्याकरितां वरील सोन्याच्या रंगाच्या प्रचंड पक्ष्यानें झडप घातली. तितक्यांत तेथें एक कामकरी काम करीत होता. त्याणें मोठ्यानें आरोळी ठोकून त्या मुलाला उचलून घरांत नेलें व मि. लॉईड यांस ती गोष्ट कळविली. तेव्हां लगेंच मि. लाईड आपली बंदुक सज्ज करून बाहेर आला व त्याणें तेथेंच घिरट्या घाली। फिरणाऱ्या त्या प्रचंड पक्ष्यावर नेम धरून छरे झाडले. छऱ्यांतील कांहीं छरे त्यास लागून तो जखमी होऊन खालीं आपटला; तरी तो मेला नाहीं. त्याचेवर मि. लाईड याणें जाळें टाकून मोठ्या श्रमानें त्यास पकडलें आणि आपल्या घराचे बाहेर एका झोंपडींमध्यें कोंडून ठेविलें. त्या जाळ्यांतून सुटून जाण्याविषयीं त्या पक्ष्यानें फार धडपड केली व तें जाळें ठिकठिकाणीं तोडून त्याचे त्याणें तुकडे तुकडे तुकडे केले. तरी त्यास तसेंच मोठ्यां श्रमानें नेऊन वर सांगितल्याप्रमाणें अडकवून टाकिलें व पुढें तो सुवर्ण गरुड न्ययॉर्क येथील सेंट्रल पार्क नामक उपवनांतल्या प्राणिसंग्रहालयांत पाठविण्यांत आला. ज्ञा. च.

---

नमुना नंबर १४३.

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्यास कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटीफिकीट मिळावें ह्मणून त्यानें जिल्हे कोर्टास अर्ज केल्याविषयीं जाहिरात.

सन १८८९ चा अक्ट ७ कलम ६ प्रमाणें

दि० केस १९ मितल नंबर २/१८९८

विद्यमान सिव्हिल ज्यडज्य साहेब जिल्हा अकोला यांचे कोर्टांत

नांव— सैयद हैबूब
बापाचें नांव— सैयद अजम
राहणार— बोरगांव तालुके व जिल्हा अकोला यांस मयत.

सैयद अजम बापाचे नांव राहणार बोरगांव तालुके अकोला व जिल्हा अकोला यांचें कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सर्टीफिकीट मिळावें ह्मणून सदर्हू अर्जदार यानें अर्ज केला आहे त्याजकरितां सदर्हू मयत मनुष्याचे माल मिळकतीवर किंवा तिचे कांहीं भागावर आपला हक्क आहे ह्मणून ज्या मनुष्याचा दावा असेल त्यास जाहिरातीचे द्वारें कळविण्यांत येतें आहे कीं त्यांनीं तारीख १२ माहे फेब्रुवारी सन १८९८ इसवी रोजीं सदर्हू अर्जाची चौकशी होईल त्यावेळीं कोर्टांत हजर होऊन आपआपले हक्का विषयीं लेखी हकीकत दाखल करावी. तारीख ३१ माहे जानेवारी सन १८९८ इसवी.

Sk. Ismail.
सिव्हिल ज्यड्ज.

---

☞ हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे " वऱ्हाडसमाचार " छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

सहामाही „ ३ „ ८८
साल अखेर „ ७ „ १ ८८
किरकोळ अंकास ........................८४

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस........८१ ८६
दुसरे खेपेस .... ........८१

Annual in arrears 7 „ 1 Rs. 8 as
Six monthly......... 3 ............... 8 as
Single copy ................................4as

Advertisement
Below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ......4 as
Repetition Per line...3 as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXXII AKOLA MONDAY 14 FEBRUARY 1898 NO 7

वर्ष ३२ आकोला सोमवार तारीख १४ माहे फेब्रुवारी सन १८९८ इ० अंक ७

NOTICE

Notice is hereby given to the public that the Commission appointed by the Government of India to formulate for future guidance the lessons taught by the famine experience of 1897 have now assemCed at Calcutta and will sit at the place named below on or about the dates mentioned for the purpose of hearing the evidence of witnesses from Berar:—

Nagpur 7th to 10th March 1898.

2. The Commission desire to make it known that they are ready to receive the evidence of witnesses who consider themselves qualified and desire to give evidence touching the subject matter of the commission's inquiry. The points referred to the commission for inquiry and report are those mentioned below and all evidence must be strictly confined to these subjects.

( A ) Departures from the prescriptions of the Bombay Famine code which have occurred in Berar during the famine.

[ B ] The degree of success which has attended the measures adopted, considered primarily with regard to the relief of distress and the saving of human life, and secondarily with regard to economy.

(C) Advice as to the measures and methods of working which seem likely to prove most effective in future in these two respects.

( D ) Other recommendations or opinions thought likely to be useful in future famines.

3. Witnesses offering evidence will be required to confine themselves strictly to these subjects and to send their evidence in written form, and in English, to the Secretary to the Commission as soon as possible. In so doing, the witnesses must give full particulars of their race, age, profession and residence and of the opportunities they have had of forming an opinion on famine and Famine Relief questions.

4. As the time at their disposal is limited the Commission do not bind themselves to invite all such volunteer witnesses to attend and be examined. Witnesses whom the Commission desire to hear will receive notice, by post, and any witnesses appearing in reply to such invitation will be paid his travelling expenses. No witness should attend for examination without an invitation from the Commission. In the case of witnesses who are not invited to attend their evidence will be examined and placed on the record.

Calcutta 12-1-98 } ( Sd. ) Mc. Intosh Secy. Indian Famine Commission.

---

## जाहिरात.

सन १८९८-९९ सालीं बाहेरचे प्रांतांतून गांजा आणण्यासाठीं व तो लायसेन्स मिळालेले किरकोळ विक्रीदारांस विकण्या साठीं प्रत्येक तालुक्या करितां एक ठोक विक्रीदार लायसेन्स देऊन नेमला जाणार आहे.

लायसेन्सा बद्दल फी द्यावी लागणार नाहीं; परंतु त्या ठोक विक्रीदारास काडी कचरा काढून साफ केलेल्या गांजाच्या दर शेरास ३ रुपये प्रमाणें सरकारास कर द्यावा लागेल, व तो किरकोळ विक्रीदारास दर शेरास ४ रुपये प्रमाणें विकण्याचें त्यास लायसेन्स मिळेल.

एखाद्या तालुक्यांत गांजाचे ठोक विक्रीचें लायसेन्स मिळावें अशी ज्याची इच्छा असेल त्यानें त्या जिल्ह्याचे दिपुटी कमिशनर साहेब यांजकडे तारीख २० फेब्रुवारी सन १८९८ चे पूर्वी लेखी अर्ज करावा.

उमरावती
तारीख २७ जानेवारी सन १८९८

R. D. Hare,
Offg. Inspector General of Excise,
H. A. D

---

## जाहिरात.

सर्व लोकांस कळविण्यांत येते कीं, रा० केशव रामचंद्र गढीकर राहणार एलिचपूर यांस तारीख २१ माहे मार्च सन १८९६ इसवी रोजी मीं मुखत्यारपत्र दिलें होतें तें मीं तारीख ८।७।९७ रोजीं वापस घेऊन रद्द केलें. त्या मुखत्यार पत्राचे आधारें त्यांनीं कोणतें ही काम केलें नाहीं व पुढें केल्यास तें व मागील काम रद्द आहे असें समजेंत जाईल. कळावें, तारीख ९ माहे फेब्रवारी सन १८९८ इसवी.

सही.
लक्ष्मीबाई देशमुख.
इलीचपूर.

---

नोटीस.

राजमान्य राजश्री तुळाराम मन्नु श्रावगी राहाणार फैजपूर तालुके यावल जिल्हा खानदेश. यांसः-

नोटीस देणार पन्नाबाई भ्रतार तुळशीराम श्रावगी राहाणार नांदुरे तालुके मलकापूर जिल्हा बुलठाणें. इजकडून.

नोटीस देण्यांत येते कीं रुपये (१७९) पावणें दोनशे रतीराम मन्नालाल तुह्माकडेस आणून देतील ते तुह्मी घेऊनें आमचा गहाण माल त्यांच्या स्वाधीन करावा. कळावे, तारीख ९ माहे फेब्रवारी सन १८९८ इसवी.

( सही. )
सहीची निशाणी. बांगडी पन्नाबाई भ्रतार तुळशीराम श्रावगी हिची असे. दस्तुर-कुलमुखत्यार हेमचंद मन्नालाल राहणार नांदुरे दस्तुर खुद्द.

---

नोटीस.

राजमान्य राजश्री माणकचंद मोतीराम श्रावगी वस्ती फैजपूर तालुके यावल जिल्हा खानदेश. यांसः-

खाली सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं, माझे तुमचेकडे खातेबाकी रुपये ( ६७० ) घेणें. शिवाय तुह्मी माझे येथें गुमास्ते होतें. तुह्मी सुटल्या पासून माझे हिशोब दिले नाहींत व माझ्या वह्यांत सर्व तोडमोड केली आहे. नोटीस पावल्या पासून एक महिन्याचे आंत सर्व निकाल करावा नाहीं तर दिवाणींत फिर्याद करून खर्चासुद्धां रुपये घेईन. कळावें, तारीख ९।२।९८ इसवी.

( सही )
सहीची निशाणी बांगडी. पन्नाबाई भ्रतार तुळशीराम श्रावगी हिची असे. दस्तुर. कुलमुखत्यार हेमचंद मन्नालाल राहणार नांदुरे दस्तुर खुद्द.

---

नोटीस.

रा० रा० विठ्ठललाल व बनसीलाल वल्लद मनुलाल राहणार पंचगव्हान तालुके आकोट. यांसः—

खाली सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं तुमचे बापाचे नावांनें दुकान आहे त्यात आमचा हिस्सा चवथा ह्मणजे ८४ च्यार आण्याचा आहे व तुमचा बाप मैत झाला त्यास दोन महिने झाले त्यांचें मागे त्या दुकानचे कागदपत्र दस्ताऐवच वह्या वगैरे तुमचे ताब्यांत आहे. तुमचा बाप मैत झाले पासून आह्मी आमचा चार आण्याचा हिस्सा मागीत असतां तुह्मी आह्मास आज उद्या करिता. दोन महीने झाले कांहीं हिंशब करून आमचे हिशाचा निकाल करीत नाहीं याजकरितां आह्मास ही नोटीस देणें भाग पडलें तर आतां ही नोटीस पावल्या पासून च्यार दिवसाचे आंत सर्व कागदपत्र पुर्जे व रोख पैसेचा सर्व हिंशेब देऊन निकाल करावा. असें केलें नाहीं तर आह्मी आपल्यावर फिर्याद करून आमचे हिश्याचे सर्व पैसे भरून घेऊ व ह्या नोटीसीचा पुढें जो फिर्यादीस खर्च लागेल तो सर्व तुमचे जवळून घेतला जाईल. हें आपल्यास कळावें, तारीख ९ माहे फेब्रवारी सन १८९८ इसवी.

सही
केशव गोविंद चतुर तर्फे
गणेश मारोती जोध
दस्तुर खुद्द.

---

नोटीस.

सरुबाई जवजे हरसुकदास रतनचंद मारवाडी दुकान अंत्री तालुके बाळापूर जिल्हा अकोलें ईस. रावसाहेब देवराव विनायक हायकोर्ट वकील, अकोले तर्फे मि० केशव गोविंद दामले वकील यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं अकोलें येथील विद्यमान सिव्हिल जज्य साहेबांच्या कोर्टांत तुमचा दि० मु० नं० १८८२ चा दावा तुमचे तर्फे राव साहेब देवराव विनायक यांनीं चालवून त्याचा फैसल सदहू कोर्टांत तुमचे वतीनें झालेला आहे. त्यांत राव साहेब देवराव विनायक यांस तुह्मी कबूल केलेली वकीलीची रक्कम अद्याप दिली नाहीं. तरी ही नोटीस पावल्या पासून ८ आठ दिवसांचे आंत सदहू रक्कम देऊन पावती घेऊन जावें व निकाल करून टाकावा. तुह्मी असें न केल्यास रीतिप्रमाणें तुह्मांवर दावा करण्यांत येईल व या नोटीशी सुद्धां खर्च तुह्मांवर पडेल. कळावें. तारीख ११ फेब्रवारी सन १८९८ इसवी.

( सही )
केशव गोविंद दामले हायकोर्ट वकील अकोलें.

---

## पत्रव्यवहार.

रा० रा० वऱ्हाडसमाचार कर्ते यांस—

मागील महिन्याचे ३१ वे तारखेस येथील नेटीव जनरल लायब्ररीची मेहरबान प्रीडो साहेब बहादूर डेपुटी कमिशनर जिल्हा अकोला यांचे हातानें रात्रौ ८॥ वाजतां सुमुहूर्तावर सुरुवात झाली. प्रेक्षक समुदाय बराच जमला होता; व सभेचो व्यवस्थाही फारच सुरेख ठेविली होती.

रात्रौ ८ वाजतां सर्व मंडळी येऊन दाखल झाली; व साहेब बहादूर हे ८॥ वाजतां आपले प्रियपत्नीसह झाले. ते येताच आतषबाजी— नळे, चद्रंजोती वगैरे दारूकाम उडविण्यास सुरुवात झाली. लायब्ररीचें कांपाउंडाचे भोंवती रोशनाई ही बरीच केली होती; व दरवाजाच्या वरील कमानीचे बाहेरील बाजूस "वेल्कम" ( wel come ) व आंतील बाजूस "गुड्बाय्" (good bye) हीं अक्षरें इंग्रजीत सुरेख रीतीनें काढलीं होतीं. तें सर्व पाहून साहेब बहादूर आपले

पर्जीसह आंत आले, व थोडावेळ तेथील कारंज्याची शोभा पाहून ते उभय.ां व श्री. रा० रा० देवराव जयकृष्ण ए० अ० क० असे वरील दिवाणखान्यांत आले ते येतांच सर्व मंडळीनें मोठ्या आनंदानें महाराणी सरकारचे नांवानें जयघोष करून सर्व दिवाणखाना व ग्यालरी दणाणुन टाकिली. नंतर ते उभयता फार सुंदर अशा उंच सिंहासनावर विराजमान झाले. यांचे समोर दोहो बाजूत खुर्च्यांवर साहूसावकार वकील मंडळी व इतर सभा गृहस्थ बसले होते.

प्रथम येथील शाळेंतील कांहीं मुलांनीं महाराणी सरकारची व मे० श्रीडो साहेबांची मराठींत व इंग्रजींत पद्य रूपानें स्तुती केली. मुलांचे वयाचे मानानें तो भाग बराच चांगल्या रितीनें पार पडला.

नंतर सभेचे चिटणीस रा. रा. कृष्णराव गणेश वकील यांनीं सभेच्या उद्देशा संबंधानें थोडक्यांत सुरस असें भाषण केलें.

नंतर रा. रा. अनंत विष्णु भागवत वकील यांनीं लायब्ररी स्थापन होण्याचीं कारणें, ही इमारत बांधण्या साठी सरासरी किती रक्कम लागली, व ती कशी कोठून जमविली तसेंच इमारती साठीं सोईवार जागा कशी मिळविली, व ती तयार करण्यासाठीं किती गृहस्थांस शरीरद्वारा व द्रव्यद्वारा झटावें लागलें या सर्व गोष्टी बद्दल फारच मनोवेधक रितीनें माहिती सांगितली; व ज्यानां शरीरद्वारा अगर द्रव्यद्वारा या कामासाठीं झिझावें लागलें त्या सर्वांचे आभार मानिले; तसेंच एक वर्षपर्यंत इमारत तयार असतां ही सदर्हूचा सुरुवातसमारंभ कां करण्यांत आला नाहीं याचेंही कारण कळविलें.

नंतर रा. रा. हिरानंदजी शेट यांनीं लायब्ररीस ज्या सद्गृहस्थांनीं द्रव्यद्वारा मदत केली त्यांची नांवनिशीवार यादी सभेस वाचून दाखविली.

अखेर रा. रा. गणेश दाजी वकील यांनीं लायब्ररीस लागलेल्या खर्चाबद्दल थोडक्यांत सभासदांना माहिती कळविली. तसेंच रा. रा. माधवराव रामचंद्र वकील यांनीं अशी सूचना आणिली कीं या लायब्ररी साठीं श्री. रा. रा. देवराव बाबासाहेब यांनीं अतीशय परिश्रम केले आहेत यास्तव या लायब्ररीस "देवराव लायब्ररी" असें नांव द्यावें. त्या प्रमाणें सदर्हू नांव देण्यांत आलें.

सर्व गृहस्थांचीं भाषणें झाल्यावर मेहेरबान श्रीडो साहेब यांनीं फारच चित्तवेधक असें इंग्रजींत भाषण केलें, व त्याचा लाभ तेथें जमलेल्या सर्व गृहस्थांस मिळावा ह्मणोन येथील सिरस्तेदार रा. रा. वामन संतो यांनीं थोडक्यांत व सुलभ भाषेंत त्यांतील सारांश कळविला. त्यांत मुख्य आशय इतकाच होता कीं या गांवांत सर्व बाबतींत जितकी लवकर व जितकी चांगली सुधारणा झाली आहे अशी कोठेंच झालेली दिसत नाहीं याचें कारण हेंच आहे कीं येथें सर्व लोकांची जूट दिसते. नंतर सर्वांचे आभार मानून असा उपदेश केला कीं या लायब्ररींत चांगलीं चांगलीं वर्तमानपत्रें व चांगले चांगले ग्रंथकर्त्यांच्या ग्रंथांचा संग्रह करावा व यांचा लाभ सर्वत्रांस द्यावा ह्मणजे समाजस्थिती सुधारेल. ते असेंहि ह्मणाले कीं सर्व वर्तमानपत्रें एकाच मताचीं नसतात. या करितां निरनिराळे मतांचीं वर्तमानपत्रें घ्यावीं.

त्यांचें भाषण आटोपल्यावर श्री. रा. रा. देवरावबाबा यांनीं मे. श्रीडो साहेब व त्यांची पत्नी यांचे गळ्यांत पुष्पांचे हार घातले व सुगंधी द्रव्यें त्यांस अर्पण केलीं. नंतर सर्व मंडळीस हार, तुरे, अत्तर गुलाब देऊन सभा विसर्जन झाली. जातांनांहि साहेब बहादुरासाठीं थोडीशी आतषबाजी उडाविली. तारीख ६ माहे फेब्रवारी सन १८९७ इसवी. मु. तेल्हारें ता. अकोट.

आपला
जुना स्नेही

---

वऱ्हाडसमाचार

मिती माघ वद्य ८ शके १८१९

---

रक्तपितीचा आजार संसर्गजन्य नाहीं तथापि संसर्गानें तो वाढतो. हा आजार ज्याला होतो तो मनुष्य मोठा अभागी खरा! अशा रोग्या पासून इतरांस बाधा होऊं नये किंवा त्याच्या केविलवाण्या किळसानें दुसऱ्याचें मन उद्विग्न होऊन विटू नये ह्मणून एक नवीन कायदा करण्यांत आला आहे. ज्याला रक्तपिती होऊन क्षत, व्रण किंवा फापर पडतील अशा रोग्याला हा कायदा लागूं करण्यांत आला आहे. अशा रोग्यानें सार्वजनिक जागीं आपल्या रोगाची किळस दाखवून धर्मादाय किंवा भीक मागूं नये आणि तसेंच निराश्रितपणानें रस्तोरस्तीं भटकूं नये. रक्तपिती जडलेल्या मनुष्यानें खाद्य किंवा पदार्थ विक्री साठीं तयार करूं नये किंवा त्या पदार्थांचा विक्रय करूं नये; तसेंच त्यानें प्रावरणाच्या कपड्याचें कांहीं काम करू नये किंवा ते कपडे विकूं नये. या शिवाय जो अन्य धंदा करण्या विषयीं सरकार मनाई करील तो धंदा या रोग्यानें करिता कामा नये. सारांश, जर कोणी रक्तपितीवाला भीक मागत भटकेल किंवा खाण्यापिण्याच्या व कपड्यालत्याच्या -पदार्थांशी प्रत्यक्ष संसर्ग पाडणारा रोजगार धंदा करील तर त्याला पोलीस मार्फत पकडण्यांत येईल, त्याच्या वर फौजदारी मोकद्दमा चालेल, आणि त्याला रक्तपितीच्या दवाखान्यांत बंदिवास करावा लागेल. त्या दवाखान्यांत त्याला औषध पाणी देण्यांत येऊन त्याच्या राहण्याची सोय ही फुकट होईल. जर कोणी रोगी बरचा सुखवस्तु असेल किंवा त्याचें पालन पोषण करणारा सुखवस्तु इष्टमित्र असेल तर निषिद्ध गोष्टी पुन्हा न करण्याच्या शरारतीवर त्याला घरीं राहण्याची परवानगी देण्यांत येईल. या कायद्याचा मुख्य हेतु असा कीं गरीब निराश्रित रोग्याचा योग्य परामर्ष घेण्यांत यावा आणि त्याचा संसर्ग जेथें घातुक होण्याचा संभव मोठा असतो तेथें तो संसर्ग होऊं देऊं नये. हा कायदा फार चांगला आहे, आणि त्याची अंमलबजावणी योग्य प्रकारें होतांना तो कडक होण्याचा प्रसंग येऊं नये ह्मणून या अभागी रोग्यांनीं व त्यांच्या आप्तमित्रांनीं मोठी काळजी घ्यावी. रोगग्रस्त मनुष्यानें ईश्वरी कोपाचें क्षालन स्वतांच मोठ्या समजूतदारीनें करावें आणि आपल्या रोगाची छाया दुसऱ्यावर पडूं नये व दुसऱ्यास त्याची काडीमात्र बाधा होऊं नये ह्मणून त्यानें जितकी दक्षता ठेवावी तितकी थोडीच आहे.

---

राव बहादूर सीताराम विश्वनाथ पटवर्धन बी. ए. डायरेक्टर, यांचा शाळाखात्याचा १८९६-९७ वार्षिक रिपोर्ट फार नामी आहे. वऱ्हाडचें शाळाखातें नेटिव डायरेक्टराच्या अंमलाखालीं उत्कृष्ट प्रकारें सुधारत आहे ही मोठी आनंदाची गोष्ट होय. रावबहादुर नारायण भाई व जठार यांच्या कारकिर्दी जशा वर्णनीय व संतोषकारक झाल्या तशीच कारकीर्द रावबहादूर पटवर्धन यांची चिर स्मरणीय व वर्णनीय होईल असें आश्वासन विद्यमान स्थितीवरून कोणी ही सूज्ञ देऊं शकेल. व्यक्ती तितक्या प्रकृती हा नियम ध्यानांत धरला ह्मणजे जो विशिष्ट भिन्नपणा किंवा निराळेपणा प्रत्येकाच्या कारकिर्दींत आढळतो त्या विषयीं कांहीं नवल वाटणार नाहीं. अनुकरणाचा मनोधर्म रावबहादूर पटवर्धनांत थोडा आहे ह्मणून त्यांची कारकीर्द निराळ्या धर्तीवर सुखकारक व अभिनंदनीय होईल हें उघड आहे. रावबहादूर पटवर्धनांच्या मनाचा ग्रह असा दिसतो कीं या प्रांताच्या शाळाखात्यामध्यें अंधःकार पुष्कळ बाबतींत आहे आणि ह्मणूनच ते आपल्या अनुभवाचा प्रकाश सर्वत्र सारखा पाडीत आहेत. वऱ्हाडांत चोहीकडे मुंबई भासविण्याचा त्यांचा विचार दिसतो- कांहीं कांहीं सुधारणा ह्मणून त्यांनीं इयत्तांची संख्यावारी बदलली किंवा असेच कांहीं फरक केले आहेत. अशा सुधारणेबद्दल आह्मी त्यांचा धन्यवाद गाणार नाहीं किंवा नूतन गोष्टींचा भास करणाऱ्या त्यांच्या प्रकारांनीं कोणालाहि मोहनी पडणार नाहीं हें खरें तथापि राव बहादूर पटवर्धन यांनी मोठ्या आस्थेनें, कळकळीनें व ईर्षेनें काम चालविलें आहे हें अत्यंत आनंदकारक होय. शाळाखातें सुधारण्याची महत्वाकांक्षा त्यांच्या कारकिर्दीचें मूळ लक्षण आहे. आणि त्या योगानें सर्वत्र चळवळ क्रांती चालू असतात. या खात्याला एका प्रकारची वेगवान गती मिळाली असून कार्यतत्परता विशेष आढळून येते. आह्मी ज्या गोष्टी ह्मणतों त्यांचें साधार दिग्दर्शन गेल्या सालच्या वार्षिक रिपोर्टांत उत्तम होतें. शाळाखात्याची अभिवृद्धी संतोषप्रद होत असल्या विषयीं राव बहादूर पटवर्धन यांचा गौरव व वाहवा सरकारी रिपोर्टांत यथायोग्य झाली आहे; ती त्या खात्यांतील लोक अवश्य वाचतील आणि असा उत्कृष्ट अधिकारी लाभला आहे ह्मणून धन्यता मानतील असें आह्मी इच्छितों.

---

कालेजांत शिकणाऱ्या वऱ्हाडच्या विद्यार्थ्यांसाठीं तीन स्कालरशिपा २०।२० रुपयांच्या दरवर्षी देत असतात. प्रत्येक स्कालरशीप एकवेळ मिळाली कीं चार वर्षे चालते. डाक्टर सिल्केर साहेबांनीं प्रथम अशा ६ स्कालरशिपा ठेविल्या होत्या. त्यापैकीं ३ बंद करण्यांत आल्या व तीनच स्कालरशिपा वर्तमान आहेत. म्याट्रीक्युलेशन परीक्षेंत दोन्ही हायस्कूला पैकीं जे पहिले तीन विद्यार्थी येतील त्यास. या स्कालरशिपा देण्यांत येतात. वऱ्हाड प्रांतातील विद्यार्थ्यांस स्कालरशिपाचा फायदा मोठा आहे; तथापि तिच्या संबंधानें जितकी चढाओढ असावी तितकी दिसुन येत नाहीं. दिवसेंदिवस विद्येची अभिरुची वाढत चालली आहे आणि त्यामुळें स्कालरशिप न मिळाली तरी पर्वा न ठेवितां बरेच विद्यार्थी कालेजांत शिकूं लागले आहेत, आणि अलिकडे असें ही निदर्शनास आलें आहे कीं स्कालरशिप मिळविणारे विद्यार्थी कालेजांत जसे चमकावे तसे चमकत नाहींत; किंबहुना कित्येक स्कालरशिपवाले इतर वऱ्हाडच्या विद्यार्थ्यांशी बरोबरी करूं शकत नाहींत. गेल्या पांच वर्षांचे निकाल या गोष्टीस चांगले प्रमाणभूत आहेत: ते असे:

युनिव्हरसिटीच्या परीक्षेंत पसार झालेले.

| साल | स्कालर | इतर |
|---|---|---|
| १८९२-९३ | १ | १० |
| ९३-९४ | ५ | १७ |
| ९४-९५ | ४ | १७ |
| ९५-९६ | २ | ५ |
| ९६-९७ | ७ | १२ |
| | १९ | ६१ |

स्कालरशिपवाल्या पेक्षां इतर विद्यार्थी पुष्कळ असतात ह्मणून त्यांची संख्या मोठी असते हें खरें; तथापि स्कालर्स त्यांच्या मानानें थोडे पसार होतात आणि त्यांची छाप इतर विद्यार्थ्यां वर चांगलीशी पडत नाहीं. अलिशान रेसिडेंट साहेबांस वाटतें कीं स्कालरशिप मिळविणारे विद्यार्थी नेहमी पुढें पाहिजेत आणि त्यांनीं आपला उत्कृष्टपणा सालोसालच्या परीक्षेंत दाखविला नाहीं तर त्यांच्या स्कालरशिपा निरर्थक होतात, आणि दुसऱ्या अधिक योग्य विद्यार्थ्यांसही त्यांचा लाभ होत नाहीं. ही गोष्ट कांहीं अंशीं खरी आहे तथापि ती नड दूर करण्या साठीं म्याट्रीक्युलेशन पास झालेल्या विद्यार्थ्यांपैकीं हेड मास्तरांनीं पसंत केलेल्या विद्यार्थ्यांस स्कालरशिप द्यावी असा नियम डायरेक्टर साहेबांनीं केला आहे. ही पसंती ठरवितांना विद्यार्थ्यांचे "सद्गुण, बुद्धि, अवधारणाशक्ति इत्यादि गोष्टीकडे लक्ष्य पुरविण्यांत येईल. हा अखेरचा नियम देखील कित्येक प्रसंगीं वाईट ठरतो पण तो सरासरीनें चांगला उपयुक्त ठरण्याचा संभव आहे.

स्कालरशिपीचा सदुपयोग व्हावा ह्मणून आलिशान रेसिडेंट साहेबांची काळजी फार दिसते. परंतु त्यांचा पांडित्यप्रकर्ष भलतीकडे जाऊन मूलच्छेदी होण्याचा संभव दिसतो. अलिशान साहेब ह्मणतात कीं जर स्कालरशिपवाला नापास झाला किंवा दुर्वर्तनी निघाला तर त्या पासून उपयुक्त स्कालरशिपीचा पैसा परत घेण्याची योजना करण्यांत यावी. दुर्वर्तना बद्दलची गोष्ट आह्मी कबूल करूं परंतु नापास झाल्याबद्दल स्कालरशिप बंद करण्याची शिक्षा फार मोठी आहे. विद्यार्थ्यांस मिळालेला पैसा परत घेण्याची युक्ति मात्र अगदीं वाईट होय. अशा योगानें स्कालरशिपच कोणी गरीब विद्यार्थी पतकरणार नाहीं. युनिव्हरसिटीच्या परीक्षेंत

मी मी ह्मणणारे बुद्धिमान विद्यार्थी गटकळी खातात ही गोष्ट अलिशान साहेबांस काढून कळावी? इंडियन विद्यार्थ्यांच्या वंशाला गोऱ्यां शिवाय मनाचा संशय फिटणार नाहीं. ही युक्ति ह्मणजे स्कालरशिपा बंद करण्याची रामबाण गोळी दिसते. सध्यां पासूनच हा ध्वनित अर्थ लोकांनीं ध्यानांत वागविला पाहिजे.

The Berar Samachar

MONDAY FEBRUARY 14 1898

On Friday next, the law of sedition will be enacted anew. The bill as amended by the Select Committee is not an improvement upon the old law though it is so upon the proposal in its original form. Feelings of 'hatred, contempt and enmity' constitute the elements of the offence and hence the new law is as dangerous as a gagging act in plain terms. These feelings intermingle in a peculiar manner and are often synonyms for each other. The terms are vague, misleading and obscure. There will be cases in which the nicer shades of these feelings will continue to exist without any the least tinge of political hatred which the law should punish. The danger to public speakers and journalists is as great as before and is mostly forbidding and prohibitive in regard to the privileges of the press and the platform. The memorable Tilak—trial will ever be fresh in the minds of our rulers. In this age of repression and imperialism there will be in full play the oppressive engine of muzzing a free expression of public opinion. The Hon'ble members of the Council have not yet realized the great significance of defining 'disaffection' as shown by Messrs Ananda Charlu and Laxmiswar Sing. They both have submitted their separate notes of dissent. Unless the legislature does away with the minor feelings of contempt, hatred and enmity the bill with all its amendments will still be dangerous to penalize political hatred as well as other loyal phases of the public mind in a mood of discontent and fault—finding with the rulers of the land.

The piece of sedition—law was, at the beinning, introduced to give a comprehensive and scientific completeness to the Penal Code. It remained a dead letter because the loyalty of the Indians is proverbial. Recent unfortunate occurrences raised an alarm and the panic led to triumphs in prosecuting native gentlemen the prince of whom (we mean Mr. Tilak) is hurled into a prison—cell from his seat in the legislative Council. The unwisdom of these Bombay prosecutions is now being immortalized in the statute—book with the sum-total of the discussions on the meaning of the law of sedition. Unnecessary legislation perpetuates—rather than buries down the heart—rending penal provisions at the command of a world—wide sovereignty. We hope the bill will fail and will not be a law passed in haste.

---

We are glad to congratulate our officiating Deputy Commissioner Mr. F. W. A. Prideaux upon the success he has achieved in his short career extending over a most trying and painful period in the history of this province. Famine was most intense in this district and the great energy, masterly tact and devotion to duty with which Mr. Prideaux grappled so eminently with the difficult situation have won him golden opinions in private and official circles. Though new to the work of a district he worked very well and in full harmony and sympathy with the native public opinion. He is fond of sports and Shikar but he could hardly attend to any of his favourite pastimes. The press of business left him little leisure and duty is always first and foremost in his programme. The Commissioner writes an appreciative note in his last Revenue report about the excellent work done by officials in regard to the last famine. Messrs Prideaux, Rustomji and Colomb merit the special thanks of the Government and Mr. Bullock gives Mr. Prideaux the first rank in the order of merit. Now he is to give his evidence before the Famine Commission and we hope that he will give a full and free scope to the views he has often expressed in this connection. We wish to see him a *pucca* Deputy Commissioner in no distant future and hope that his carreer will be a source of pride to himself and the people under him.

---

The Grand old man of India has written a pamphlet on the Civil Service question. He summarizes his arguments in the following manner:—

"In 1833 a noble clause was passed by Parliament—everything that the Indians could desire. Had the Executives loyally and faithfully carried out that clause, India would have been in the course of more than sixty years a prosperous and contented and deeply loyal country, and a strength and a benefit to the British Empire to an an extent hardly to be conceived or realised at present, when, by an opposite course, India is afflicted with all the horrors and misery to which humanity can possibly be exposed. After 1833, twenty years passed but nothing done. Fresh efforts were made in Parliament to put the Indians on the same footing as British subjects, by simultaneous examinations in this country and India. Stanley, Bright, Rich and others protested to no purpose; the violation of the Act of 1833 continued.

Then came the great and glorious proclamation of the Queen in 1858, and a new bright hope to the Indians; but not fulfilled up to the present day. In 1860 a Committee of five members of the Council of the Secretary of State pointed out the dishonour of the British name, and reported that simultaneous examinations were the best method to do justice to the Act of 1833—to no purpose; the Report was suppressed and the public knew nothing about it. In 1867 the East India Association petitioned for the admission into the Convenanted Civil Service of a small proportion of Indians. Sir Stafford Northcote admitted the justice of the prayer, and proposed a clause to give a partial fulfilment of the Act of 1833. The Duke of Argyll passed it. Lord Salisbury approved of it, but pointed out how the jealousy of the Anglo Indians would wreck it—a prophecy which was not long to be fulfilled.

The Government of India resisted tooth and nail, and made some outrageous proposals in the despatch of 2nd May, 1878. It was then that Lord Lytton, in a minute, admitted the ignoble policy of subterfuges and dishonour upon which the executives had all along acted since 1833.

A strong and justly inclined Secretary (Lord Cranbrook) persisted, brushed aside all resistance and plausibilities, and compelled the Government of India to give effect to the clause. The Government of India, with bad grace and very reluctantly, made the rules—cleverly drawn up to throw discredit upon service—the worst part was rejected by Lord Cranbrook; but an insidious device remained, and the appointments were begun to be made. The Anglo Indians boiled with rage, and the explosion on the Ilbert Bill was the open declaration of war. Lord Salisbury on that occasion confessed that the conduct of the Executive all along was merely "political hypocrisy."

The agitation subsided, but the appointments having remained to be continued, the boiling under the crater continued, and, instead of exploding, the Government resorted to other devices and gained their settled object with a vengeance—the report of the Public Service Commission Confirmed the foregone conclusions against the Statutory Service and simultaneous examinations.

The statutory service of full eligibility and of about 200 employments in the course of thirty years in the whole Convenanted Service abolished, and the wretched scheme of May 2nn, 1878, established instead.

The whole position has been thrown back worse than it ever was before."

---

## वऱ्हाड

हवामान—गेल्या गुरुवारीं अर्धा पाऊण इंच पाऊस पडला. कित्येक ठिकाणीं गाराही पडल्या हवा रोगट असून गारठा अतिशय पडला आहे. रब्बीचीं पीकें मध्यम आहेत. पाण्याचा बोभाटा सर्वत्र आहे.

मे. प्रीडो साहेब हे फ्यामिन कमिशनापुढें साक्ष देण्यासाठीं जाणार असल्यामुळें ते त्या साक्षीच्या तयारीला लागले असून येत्या शनिवारपासून ६ आठवड्यांच्या रजेवर जाणार आहेत.

मे. आर. डी. हेअर साहेब हे सहा आठवडे पर्यंत या जिल्ह्याच्या डिपुटी कमिशनरचें काम पहाण्यासाठीं आकोल्यास लवकरच येऊन दाखल होतील.

मे० आबडे साहेब जुडिशिअल कमिशनर हे येत्या बुधवारा पासून १॥ महिन्याच्या रजेवर जातील.

येत्या १ ले एप्रिल पासून मे० इलियट साहेब हे फर्लो रजेवर जाऊन नंतर पेनशन घेणार आहेत.

मे० बुलक कमिशनर साहेब हे येत्या एप्रिल पासून मोठ्या फर्लो रजेवर जाणार आहेत. त्यांचा विचार ही त्या रजे नंतर पेनशन घेणार आहेत. मध्यंतरी रेसिडेंटाची जागा मिळेल तर कदाचित् सर्व बेत फिरेल असें लोक बोलतात.

सहामाही डिपार्ट मेंटल लोअर व हायर परीक्षा येत्या मार्चच्या १४ वे तारखेला उमरावतीस होणार आहेत,

मुंबई युनिव्हरसिटीचे १२ नवीन फेलो नेमण्यांत आले त्या पैकीं वऱ्हाड कडील दोन गृहस्थ आहेतः—

राव बहादूर श्रीराम भिकाजी जठार, बी. ए. सी. आय. इ.

दामोदर गणेश पाध्ये एम. ए.

राव साहेब देवराव विनायक हे आपल्या वडीलधाऱ्या मंडळीसह काशी यात्रेला काल रवाना झाले. परमार्थाकडे यांची बुद्धि अलिकडे पुष्कळ वर्षापासून लागली आहे. गृहस्थ मोठे बाणीदार, करारी व हिंमतबहादर आहेत. पादचारी होऊन काशीची कावड आणण्याचा त्यांचा दृढ संकल्प आहे

---

नोटीस.

चिरंजीव राजमान्य राजश्री राणू व कान्हू वल्लद नागू जात पंचाळ राहणार उमरावती हल्लीं मुक्काम भिलटेक, यांसी.

नोटीस देणार किसन वल्लद नागू पंचाळ राहणार वानोसें तालुके दर्यापूर जिल्हा एलिचपूर नोटीशीनें असें कळवितो कीं तुमची माय नामे धोंडूबाई (मयत) हिने आमची बहीण नामे सावित्री इजला कान्हूला नवरी करण्याचे ठरविले व जातीरीती प्रमाणें साखरपुडाही झाला. साखरपुड्याचे वेळीं जातभाई प्राणसें पुष्कळ हजर होतीं त्यापैकीं दोघांची नांवे हजर करितों. १ राजाराम वल्लद अमृता पंचाळ व राणू वल्लद विठू पंचाळ सदरहू प्रमाणें लग्नाचे ठरल्यास आज सुमारें अडीच वर्षे झालीं या अवकाशांत दोनचार वेळां आह्मी तुह्मास कार्य करण्यास विचारिले परंतु तुह्मी नुसत्या गोल गोल गोष्टी सांगता परंतु कार्य कांहीं करीत नाही. यावरून तुमचें मनांत आह्मांस व आमचे बहिणीस विनाकारण सतविण्याचे आहे हे उघड दिसेंत. या करितां तुह्मांस नोटीशीनें असें कळवितों कीं नोटीस पावल्या पासून चार दिवसाचे आंत ठरल्या प्रमाणें कार्य करणें असल्यास दिवस मुकर करून कळविणें. नकल्यास करीत नाहीं असे स्पष्ट कळविणे ह्मणजे आह्मांस आमचे बहिणीचें लग्न इतर ठिकाणीं करण्यास चालीरीती प्रमाणें ठीक पडेल. सदरहू बद्दल तुह्मी कांहीच न कळविल्यास आह्मांस आमच्या बहिणीचें लग्न दुसऱ्या इतर इसमाशी करणें भाग पडेल व तसें करण्यास तुह्मा उभयता बंधूचा रूकार आहे असे आह्मी समजू. नंतर कोणत्याही प्रकारें आह्मांस आमचे बहिणीचे लग्नासंबधानें विचारण्यास तुह्मांस अधिकार राहिला नाहीं. कळावे. तारीख १२ फेब्रुवारी सन १८९८ इसवी.

सही
निशाणी हातोडी किसन
वल्लद नागू पंचाळ

---

## आकोला बाजारभाव

| | दर खंडीस |
|---|---|
| आळशी | ८२ रुपये |
| जवारी | ४२ पासून ४८ रु० |
| गहूं ( कांठे ) | ११० रु० |
| ,, ( बनशी ) | १३० रु० |
| चणे | ७६ रु० |
| तेल | ९ रु० मण |
| तूप | ७॥ मण |
| मीठ | ३॥।– मण |
| सोनें | २४ तोळा |
| चांदी | ८० |
| कपाशी | ३९ |
| रुई | ४३ |

---

## वर्तमानसार

खैबरखिंड बंद झाल्यामुळें अफगाणिस्थान व हिंदुस्थान यांच्या दरम्यान व्यापार बंद झाल्यामुळें अफगाण व्यापाऱ्यांची फारच गैरसोय झाली आहे असें अमिरानें वरिष्ठ सरकाराकडे लिहून कळविलें आहे.

युरोपांतील रशिया व जर्मनी या दोन प्रचंड राष्ट्रांनीं चीन देशाचीं मुख्य बंदरें व व्यापाराचीं मुख्य नाकीं हळूच अंगाखालीं घेऊन वशांत टाकण्याचा संकल्प केला आहे असें तिकडील हकीकतीवरून कळतें. रशियाच्या व जर्मनीच्या ह्या कौटिल्यामुळें इंग्लंडची तळपायाची आग मस्तकास जाऊन भिडली; कारण, एकदां रशिया व जर्मनी यांनीं चीनई बंदरांतून आपला व्यापार जारानें सुरू केला ह्मणजे, ह्या पीत देशांतील इंग्लंडच्या व्यापारास मोठा धक्का बसेल हें इंग्लंड जाणून होतें. रशियाची व जर्मनीची ही लबाडी जाणून, इंग्लंडनें जपानशीं मैत्रीचा घाट घातला. इंग्लंड व जपान यांनीं एक होऊन, युरोपांतील इतर राष्ट्रांचें घोडें चीनव्यापारसंबंधांत पुढें जाऊं द्यावयाचें नाहीं, असा पूर्ण निश्चय केला आहे. जपानचा चीनवर डोळा आहेच. चीनला जपानानें चांगलाच हात दाखविला आहे. व युरोपांतील बलाढ्य राष्ट्रांप्रमाणें, पूर्वीत्य राष्ट्रांत सर्वश्रेष्ठ होण्यासाठीं चीनला पादाक्रांत करून टाकावें, अशी जपानची महत्वाकांक्षा आहे. हल्लींच्या प्रकारावरून आह्मांस असें दिसतें कीं, रशिया, जर्मनी आणि जपान हीं राष्ट्रें चीन देशाचे तीन तुकडे गिळंकृत करून, इंग्लंडची समजुत करण्याकरितां एक लहानसा चौथा तुकडा इंग्लंडचे अंगावर टाकतील.

विवेकानंद स्वामींचीं व्याख्यानें निरनिराळ्या देशी भाषांमधून सर्वांस समजावीं, ह्मणून त्यांच्या व्याख्यानांचें भाषांतर करण्यासाठीं हुशार पदवीधरांची एक मंडळी मद्रास इलाख्यांत स्थापन झाली आहे. स्वामींचें मत असें आहे कीं प्रत्येकास, त्याच्या जन्म भाषेच्या द्वारें धर्मतत्वें व वेदान्त तत्वें समजावीं व हेंच काम सदरील मंडळी बजावणार. स्वामींचे बंधु शारदानंद स्वामी ह्यांचे बरोबर अमेरिकेंत गेले होते; ते येत्या १४ वीचे सुमारास मुंबईस येऊन दाखल होणार असून तेथून पुढें मद्रासेकडे जातील असें समजतें.

कमींत कमी निदान पांच धूमकेतु यंदा दृष्टिगोचर होतील असें खगोलवेत्त्यांचें अनुमान आहे ते एप्रिल, मे, जुन, सप्टेंबर व नोव्हेंबरमध्यें दिसतील. नोव्हेंबर महिन्यांत दिसेल ह्मणून वर्तविलेल्या धूमकेतूची दुसऱ्या एका ताऱ्याशीं टक्कर झाल्यामुळें त्याचे तुकडे तुकडे झाले आहेत. ह्मणून ही स्वारी त्या महिन्यांत प्रगट न होतां त्याच महिन्याचे २६ व २७ तारखेस उल्कावृष्टीचा मनोरम देखावा दृष्टीस पडेल.

स. वि.

चवदा फेबरवारीला कायदे कौन्सिल भरावयाचें असून त्या बैठकीला पोलीस आक्ट पास होणार आहे. हा मसूदा सिलेक्ट कमीटीकडून परत आला. फक्त दोघां नेटीव्ह मेंबरांचा त्यांत थोडासा मतभेद झाला आहे.

एरंडोलचा एक खुनी मोकदमा सेशनांत गेला होता त्यावेळीं सरकार तर्फेच्या साक्षीदारांनीं आपणाला मारून पुसून साक्षीला उभे केलें, आपण कांहीं जाणत नाहीं ह्मणून सांगितल्यावरून आरोपी सुटले असें त्रैमीक पत्रांत लिहिलें आहे ! ही गोष्ट खरी असेल तर याबद्दल पोलीसला जबाबदार धरणें अवश्य नाहीं काय ?

निजाम सरकारानें ग्रहणाचें वेळीं पन्नास कैदी बंधमुक्त केले इतकेंच नाहीं, त्यांना अन्नदान, वस्त्रदान आणि द्रव्यदान केल्याचें एका पत्रांत लिहिलें आहे. हें खरें असेल काय? मुसलमान लोक ग्रहण पाळीत नाहींत मग हें कसें झालें.

सरहद्द— सिनकमारपासांत आमच्या लष्करावर जंगली लोक तुटून पडून त्यांनीं आमचे पांच गोरे लष्करी सरदार ठार मारले आणि तीन जखमी केले असें तारायंत्रावरून कळतें. जंगली लोक आह्माला ओळखीत नाहींत.

इजिप्त देशांत दर्वेशी लोकांची कांहीं गडबड सुरू झाल्यामुळें इंग्रजी फौजेची जय्यत तयारी चालली आहे.

विलायतेस यंदा चवसष्ट ब्यारिष्टर तयार झाले त्या पैकीं पंधरा आपल्या इकडले आहेत.

विलायतेत एका इसमानें एक तुटकी फुटकी पेटी लिलावांत खरीदी केली पण घरीं गेल्या वर पाहतो तों तींतें दोन लाख रुपयांच्या नोटा निघाल्या. दैव त्याचें!

प्लेग आलेल्या मनुष्यास सपाटून काफी पाजावी ह्मणजे तो सहसा मरत नाहीं असें एका डाक्टराचें ह्मणणें आहे. धा०

सर रिचर्ड टेंपल साहेब हे गेल्या सन १८७७ चे दुष्काळांत मुंबई इलाख्याचे गव्हरनर होते. ते असे ह्मणतात कीं:—

हिंदुस्थानच्या लोकांस ओळखून त्यांस मान देणारा त्यांच्यांतून निघून गेल्यावर त्यांच्या वर्तणुकी कडे पाहूं लागलें तर, त्यांच्यांत जरी कित्येक दोष असले तरी घेण्यासारखे व वर्णन करण्या सारखे कांहीं गुण यांच्यांत आहेत असेंच त्यास आढळेल. त्यांच्यात कृतज्ञता नाहीं हें ह्मणणें अगदीं चुकीचें आहे. त्यांच्यांत कृतज्ञता नाहीं असें ह्मणणारे जे लोक असतील त्यांस माझें असें सांगणें आहे कीं. यांच्यावर ममतबुद्धीनें राजसत्ता चालवा, त्यांच्या हिताकारितां झटा, त्यांचीं दुःखें निवारण करा, त्यांच्या जीवात्म्याचें रक्षण करा, त्यांची योग्यता व संपत्ती वाढवा, एकंदरीनें तुह्मी त्यांच्याकरितांच झटत आहां अशी यांची समजूत होईल असें करा, ह्मणजे त्यांच्यांत कृतज्ञता भरपूर आहे असें तुह्मांस आढळून येईल.

सध्यां जे लोक इकडे राजसत्ता चालविण्यास येतात, त्यांना वरील सर रिचर्ड टेम्पल साहेबांच्या लेखांत पुष्कळच घेण्यासारखा भाग आहे; व तो त्यांनीं घेतल्यास त्यांना व प्रजेलाही अप्रतिम सुख मिळेल यांत संशय नाहीं! मो० वृ०

नरभक्षक वृक्ष—हा वृक्ष सुरूच्या झाडा प्रमाणें वाढत जातो. याची उंची सुमारें ११।१२ फूट असते. याचीं पानें मोठीं फळ्यासारखीं असतात. हीं पानें १० पासून १२ फूट ह्मणजे अगदीं लहान व १६ पासून २० फूट पर्यंत मोठीं असतात. ही जमिनीच्या बाजूला वळलेली असून १४० पौंड वजनाचा माणसाचा भार सहज त्यांस साहतो. प्राचीनकाळीं या झाडास सैतानझाड असें नांव देऊन त्याची अर्चा रानटी लोक करीत असत. आणि वार्षिक अर्चेच्या वेळीं एका मनुष्याचा बळी या झाडास देत. तो असा. ज्या माणसास बळी द्यावयाचा, त्या माणसास झाडाच्या अगदीं वरच्या टोंकाशीं नेऊन सोडावयाचा. त्या ठिकाणीं त्या झाडाचे झेंड्याच्या तंतूंना त्या माणसाच्या अंगाचा स्पर्श होताच एकदम एखाद्या विचित्र सांपळ्याच्या फळ्याप्रमाणें सर्व पानें थडाथड वर होऊन चोहों बाजूंनीं जुळून जायचीं. आणि त्या आंतल्या माणसास चेंगरून त्याचा प्राण नाहींसा करून टाकावयाचीं. इतकेंच नव्हे, तर त्याच्या अंगांतील मांसाचा टिपूस सुद्धां आतां राहिला नाहीं असें होईपर्यंत तीं पानें उघडावयाचीं नाहींत.

मृत्युवृक्ष ह्मणण्या पेक्षां या दक्षिण आफ्रिकेंतल्या विचित्र वनस्पतीला लता ह्मटलें असतांच विशेष शोभणारा आहे. ह्या लतेचीं फुलें तांबडीं लाल असतात आणि याच्या फळांना हूक असतात. ते हूक जाणाऱ्यायेणाऱ्यांच्या पायांस पकडतात. एकदां हें अंगांत शिरलें ह्मणजे निघणें फार कठिण असतें. याच्या त्रासानें बैल, सिंह वगैरे प्राणी तडफडून मरतात सुद्धां.

भुजंग किंवा अजगरवृक्ष— या वृक्षाचें काम इतर झाडांना विळखा घालून जिवें मारावयाचें. याचीं फळें पक्ष्यांस फार आवडतात आणि तीं तें खाऊन दुसऱ्या झाडांवर फांद्यावर नेतात तेथें त्याचा प्रसार तावडतोब होतो पानें ज्याला येतात तो भाग हलके हलके वर वाढत असतो, परंतु मुळांचा भाग खालीं खालीं वाढत जाऊन जमिनींत शिरतो. मध्यें जर कांहीं अडथळा आला, तर त्यांच्या योगानें त्यांची गति काय निराळ्या दिशेला गति काय निराळ्या दिशेला जाईल तेवढीच. शिवाय या मूळांनाही पानें फुटतात. हीं पानें वर वर जाऊन तिकडूनही त्यांची वाढ होत जाते. नंतर एकदम त्या वृक्षाचे चमत्कारिक रूपांतर होतें. आतांपर्यंत अगदीं मृदु अशीं जीं मुळें होतीं तीं आतां कठिण होत जाऊन आणि लंब लांबपर्यंत पसरत जातात इतक्या त्याच्या शाखा वाढत जातात, व एकमेकांत गुरफटू लागतात कीं, जणूं काय त्या पहिल्या मधल्या झाडाच्या भोंवती असंख्य फांस तयार होतात. आणि मग त्या दोन झाडांचें जीवनासाठीं युद्ध होऊं लागतें. एखाद्या मल्लाप्रमाणें तें मूळ झाड फुगून फुगून तो फांस सोडूं पाहतें. त्या ज्या ठिकाणीं ह्मणून त्या फांसांतून बाहेर निघाला सांपडेल तेथें तेथें साल फुगून बाहेर निघूं लागते. परंतु वाटेल तितकी खटपट झाली तरी त्या बंदींत पडलेल्या झाडाची सुटका होणें अशक्य असतें. कारण त्याला ग्रासूं पाहणाऱ्या त्या भुजग वृक्षाचे राक्षसी बाहू असंख्य असतात. मूळ झाडाला वाढण्याला मुळींच अवकाश राहिला नसल्यामुळें तें झाड आंतल्या आंत खुरटूं लागतें आणि मरतें. व ज्या भुजंगवृक्षानें त्याची अशी अवस्था करून टाकलेली असते, तो वृक्ष लवकरच अतिशय विस्तीर्ण होऊन त्याची एक जाळी बनते.

सीलोन ( लंका ) मध्यें जीं पाळींव जनावरें आहेत, त्यांत सगळ्यांत फार चमत्कार वाटण्याजोगें ह्मणजे तेथले विलक्षण ठेंगणे बैल होत. या बैलांस " धांवणारे पवित्र बैल " असे प्राणिशास्त्रांत ह्मणतात. बैलांच्या जातींत सगळ्यांत हे अतिशय लहान ठेंगू असतात. या जातींत अगदीं उंचींतला उंच खोंड ह्मणजे तीस इंच असावयाचा. इ. स. १८९१ सालीं मार्किस आफ् क्वांटरबरी यांस एकानें असा एक बैल पाठविला तो आज दहा बारा वर्षांचा आहे. पण त्याची उंची अवघी बावीस इंच आहे. त्याचें वजन सगळें ५४⅞ शेर आहे! अगदीं जलद पोंचविला पाहिजे असा माल आणि हलकींसलकीं ओझीं, थोड्या वेळांत थोड्या खर्चांत लांब अंतरावर पोंचवून द्यावयाचीं असलीं, किंवा थोड्या वेळांत बरेचसे मैल जाऊन यायचें असलें, तर या बैलांच्या गाड्यांचा उपयोग करितात एका दिवसांत एक माणूस व सुमारें अडीच मण ओझें घातलेली अशी दुचाकी गाडी ओढून हे बैल सुमारें सत्तर पाऊणशें मैल चालतात. त्यांची चाल एकसारखी राहते आणि अन्नाचे टिपूस किंवा पाण्याचा थेंबही न मिळतां एक दिवस अहोरात्र हे बैल चालून चांगला शंभर मैलांचा प्रवास केल्याचीं उदाहरणें आहेत. ही ठेंगण्या बैलांची जात कुठून आली, आणि कोणी कशी पैदा केली याचा कांहीं पत्ता लागलेला नाहीं. लंकेंत व बुद्धधर्मीच्या देशांत आज सुमारें हजार दीड हजार वर्षें ही जात आहे असें ह्मणतात.

डेली मेल नांवाच्या पत्रांत थोडे दिवसांपूर्वी लिहिलें होतें: "अमेरिकेंत सॅन् फ्रान्सिस्को शहरचे डा० बेंजामिन् हे आज कित्येक वर्षेंपर्यंत एखादें सुंदर हवायान—होडीतारूं—खें तारूं-तयार करावें ह्मणून खटपटींत आहेत. त्यांनीं हजारों डॉलर आजपर्यंत खर्च केले. शेवटीं एकदांचें त्यांना त्यांत यश आलें असून त्यांनीं हवेंतून चालवितां येण्याजोगी सुंदर होडी बनविली आहे. आणि तींत बसून त्यांनीं शहरावर व आजूबाजूच्या खेड्यापाड्यांवरून हवेंतून सफरीही केल्या! या होडीचा वेग दर मिनिटास १ मैल प्रमाणें आहे. ही यांत्रिक होडी १५० फूट लांब आहे. चटकन् वर चढते व खालीं येते व तिला तरटाचे शिवलेले दोन पंख केलेले आहेत. त्या होडीचें सुकाणूही पंख्याच्याच आकाराचें आहे. अद्यापि त्या यंत्राची योजना काय आहे तें त्यांनीं कोणासच सांगितलें नाहीं. एकदां पेटंट मिळविलें ह्मणजे मग त्याची प्रसिद्धि करावी असा त्यांचा हेतु आहे.

मेंढ्यांची वाढ—आस्ट्रेलियांत लोक प्रथम वसाहतीस गेले, तेव्हां ह्मणजे इ. स. १७८८ त, तेथें २९ मेंढ्या होत्या. आणि आज त्याच ठिकाणीं १२०००००० मेंढ्या आहेत.

समुद्रांतलें मीठ—सगळा समुद्र आटून जर मीठ हातीं आलें. आणि त्याचा एक मैल जाडीचा थर पसरविला, तर तो ७०००००० मैल पसरेल.

विलक्षण सुर्वंट—आस्ट्रेलिआंतील एका प्रदेशांत अर्ध्या फुटापासून एका फुटापर्यंत लांबीचे असे सुर्वंट आहेत. करमणूक

☞ हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

किरकोळ अंकास ......................८४
नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस........ ८१ ०६
दुसरे खेपेस .... .......८१

Single copy ............................4as

Advertisement
Below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ......4 as
Repetition Per line...3 as

# वऱ्हाडसमाचार.

# THE BERAR SAMACHAR

VOL XXXII AKOLA MONDAY 21 FEBRUARY 1898 NO 8

वर्ष ३२ आकोला सोमवार तारीख १४ माहे फेब्रुवारी सन १८९८ इ० अंक ७

## जाहिरात.

### वऱ्हाड हायस्कूल माजी विद्यार्थी समाज

वऱ्हाड हायस्कूलांतील सर्व माजी विद्यार्थी मंडळीस कळविण्यात येते कीं सन १८९८ सालचा समाज दर्यापूर येथें तारीख ६ व ७ मार्च ( रविवार व सोमवार ) रोजीं भरविण्याचें सर्वानुमतें ठरलें आहे. वर्गणीचे दर नेहमींप्रमाणें रु० १, रु० २, रु० ५, असे आहेत तर मंडळींनीं कृपा करून आपल्या योग्यते प्रमाणें वर्गणी देऊन समारंभास येण्याची मेहेरबानी करावी.

मुर्तिजापूर पासून दर्यापूर पर्यंत जाण्यासाठीं बैल गाड्याची चांगली तजवीज केली आहे.

दर्यापूर ता. १४ जानेवारी १८९८ } गोविंद कृष्ण पर्वते. गंगाधर नारायण जगदळे सेक्रेटरी

## जाहिरात

अकोलें गोरक्षण सभेस गोरक्षणाच्या अवश्यकतेबद्दल व उपयुक्तते बद्दल लोकांस सतत व्याख्यानें देणारा हुशार उपदेशक पाहिजे आहे. ज्यांची इच्छा असेल त्यांनीं खालीं सही करणाराकडे ता० २१।२।९८ चे आंत अर्ज पाठवावेत. ज्या गृहस्थाची नेमणूक केली जाईल त्याचे योग्यतेप्रमाणें पगार ठरविण्यात येईल कळावें तारीख २४।१।९८

केशव गोविंद दामले.
सेक्रेटरी गोरक्षण सभा अकोलें
प्रांत वऱ्हाड

## जाहिरात.

### जादू ! जादू !! जादू !!!

फक्त १। रुपयांत १२ खेळ करून मित्र मंडळीस खुषी करा !!

अल्पमोलि व बहू गुणी अपूर्व करामत !
प्रो. जी. एम्. कार्लेकर कृत.
भानामती तंत्र !!!

खासगी कुटुंबांत, मित्र मंडळींत व हरएक प्रसंगीं अद्भूत जादूचे खेळ करावयास हें पुस्तक फारच उपयोगीं आहे. शोकी व गुणग्राही लोकांकरिता हें फक्त दोन पुण्याचें तंत्र आह्मी मुद्दाम खास रीतीनें तयार केलें आहे. यावर पुढील प्रमाणें खेळ होतात. १ कोणाच्याही हातें यांत गंजिफाचा ठेवलेला पत्ता गुप्त होतो व पुनः येतो. २ यांत ठेवलेला पत्ता एकास दिसतो व दुसऱ्यास दिसत नाहीं. ३ पत्ता फाडून त्याचे तुकडे यांत ठेविलें असतां तोच पत्ता अखा होतो. ४ ज्या पत्याची जाळून राख यांत टाकावी तोच पत्ता पुनः अखा होतो. ५ दुसऱ्याच्या हातून ठेवलेले पान गुप्त होंते. ६ सर्वां समक्ष ठेवलेला पत्ता एकास एका जातीचा व दुसऱ्यास दुसर जातीचा दिसतो. ७ यांत दुसऱ्याच्या हातून ठेवलेला रुपया गुप्त होतो व पुनः येतो. ८ यांत ठेवलेला रुपया एकास दिसतो व दुसऱ्यास दिसत नाहीं. ९ यांत पैसा ठेविला असतां तात्काळ त्याचा रुपया होतो. १० चवली, पावलीचा तात्काळ रुपया होतो. ११ एकाला रुपया दिसतो व दुसऱ्यास तोच पैसा दिसतो. १२ कोणच्याही सहीची चिठ्ठी यांत ठेविली असतां गुप्त होते ती दुसऱ्या ठिकाणाहून काढणें, या प्रमाणें मनुष्यांची अक्कल गुंग करून सोडणारें फारच अद्भुत व आश्चर्यकारक नजरबंदीचे १२ खेळ या एकाच तंत्रावर कोणीही मनुष्यास सहज व तावडतोब करतां येतात! हे सर्व खेळ खरेच अनुभवसिद्ध आहेत. सबब या वस्तुपासून वरील खेळ न झाल्यास आह्मी दुप्पट पैसे भरून देऊ. हें केवळ छापील पुस्तक नव्हे तर खेळ करण्याची एक तयार वस्तु आहे. यावर होणारे वरील खेळ कसकेस करावे त्याच्या माहितीचे पुस्तक सोबत निराळें देण्यांत येते. याची किंमत या मार्च अखेर पर्यंत घेणारांस मात्र फक्त १। ( सवा ) रुपया. बाहेर गांवीं व्हा. पी. टपालसह १।ज आणे. या मुदती नंतर याची शिल्लक राहिल्यास २ रुपये किंमत पडेल. या शिवाय अनेक प्रकारच्या जादूच्या खेळाचे तयार सामान आह्माकडे विकत मिळते. त्याचा मोठा सचित्र क्याटलाग ४ आणे किंमतीस आह्माकडे मिळतो. वरील तंत्र खालील पत्यावर विक्रीस तयार आहे.

नारायण गोविंदजी आणि कंपनी
जादूच्या खेळाचे तयार सामान व
पुस्तके विकणार.

पत्ता—माधवबाग पांजरापोळच्या १ ल्या गल्लीचा नाका कोळशेवाल्याचे दुकानावरील माडी गिरगांव पोष्ट, मुंबई.

## NOTICE

The annual fair held in March at Wun will not be held this year.

Yeotmal 13th February 1898 } (Sd) F. R. M. Mandnit Deputy Commissioner Wun District.

## नोटीस.

चुनीलाल गुलाबचंद मारवाडी मुक्काम दोनवाडे तालुके अकोला जिल्हा आकोला पोष्ट केळीवेळी यासी नोटीस देणार सदाशीव वल्लद लक्ष्मण पाटील राहणार कासली बुद्रुक तालुके आकोला पोष्ट केळीवेळी.

नोटीशीनें असें कळवितों कीं अजमासे आमच्या खात्याचीं शेतें चार किंवा पांच या सर्वांतील कांहीं कांहीं हिस्से तुह्माकडे तारण गहाण देऊन आह्मी तुह्मा पासून कर्ज रुपये काढिले ती रक्कम रुपये ( ३२५ ) अक्षरी तीनशें पंचवीस यासी व्याज दरमहा दरशेकडा दीड रुपया प्रमाणें सदरहू रकम व तिचें ठरल्या प्रमाणें व्याज आह्मी स्वतः दोनचार वेळां तुह्माकडे घेऊन आलों असतां तुह्मी सदरहू गहाणा बद्दलची रक्कम घेऊन आमचा गहाणाचा दस्तांऐवज परत करीत नाहीं यावरून सदरहू जमीन जी आह्मी तुह्मास गहाण दिली ती अभिलाष करण्याचा उघड उघड तुमचा हेतु दिसतो याजकरितां तुह्मास या नोटीशीनें असें कळवितों कीं सदरहू गहाणा बद्दलचे रुपये शिरस्त्या प्रमाणें वाटेल तेव्हां तुह्मी घेऊन जावें. असें न केल्यास आगे मागे तुह्मी फिर्याद वगैरे केल्यास त्या बद्दलचा कोणत्याही प्रकारचा खर्च आह्मी देणार नाहीं व तुमच्या गहाणाची रकम जी आजपावेतों आह्मी तयार ठेविली आहे तिचे व्याज गाहाण मालास व्याजाचा दर आहे त्या दरा प्रमाणें आह्मी व्याज घेऊं. तुमच्या दंडेली मुळें आह्मांस नोटीस देणें भाग पडलें तरी सदरहू नोटीशीचा खर्च तुह्मा पासून घेतला जाईल. या सर्व गोष्टी तुह्मास अगोदर कळविल्या आहेत ह्मणून दिली नोटीस. तारीख १४ फेब्रुआरी सन १८९८ इसवी.

सही
सदाशिव वल्लद लक्ष्मण पाटील नि. नांगर दस्तूर प्रसादगीर विठ्ठलगीर गोसावीं.

## पत्रव्यवहार

### चांद्रसेनीय कायस्थ प्रभु मंडळीनो

आपल्यांत झालेल्या पुनर्विवाहाबद्दल इतका वितंडवाद माजून एकाही पक्षानें समंजसपणा दाखवूं नये हें अत्यंत खेदजनक आहे. अहो, समाजांत उत्तरपक्ष पूर्वपक्ष हे नेहमींच असावयाचे. आजपर्यंत विधुरावस्थेंत दिवस कंठून वैधव्यपंकांत रुतलेल्या एका गरीब अबलेला मुक्त करण्यांत जयवंतांनीं मोठा गुन्हा केला असें गतभर्तृकासंबंधी ज्यांचें अंतःकरणांत किमपीही दया नाहीं अशांना जर वाटत असेल तर खुशाल वाटो, बाकी त्यांचे अंगीं वसत असलेलें नैतिक धार्ष्ट्य अनुकरणीय आहे किंवा नाहीं हें सुशिक्षित वर्गास सांगणेंच नको. आतां त्यांतलें त्यांत "भिन्नरुचेर्हि जनस्य ........" या कव्युक्ति प्रमाणें मतवैचित्र्य होणें हें सार्वत्रिक आहे. पण आजपावेतों तिघांनीं तीन ठिकाणीं लेख प्रसिद्ध केले त्यांत एक तरी 'शत्रोरपि गुणा वाच्या दोषा वाच्या गुरोरपि'। या उक्तीला अनुसरला काय? वस्तुस्थितिच अशी आहे कीं 'खलः सर्षपमात्राणि परच्छिद्राणि पश्यति। आत्मनो बिल्वमात्राणि पश्यन्नपि न पश्यति.'

मुंबईस्थ ज्ञातिबांधवांनीं जयवंताना बहिष्कृत करण्यांत मोठा समंजसपणा त्यांनीं दाखविला असें मला तरी निदान वाटत नाहीं. ते व त्यांचें अनुकरण करा ह्मणून सांगणारे माझें खालील प्रश्नास कृपा करून उत्तर देतील काय. 'सुरादेवीला वश होऊन गटरांत लोळणारे, वारयोषितेचे उम्बरठे झिजविणारे, इतकेंच नव्हे तर यवनकुलांत जन्मास आलेल्या वारांगनेचें अधरोष्टपान करणारे— तसेंच एकाच हलवायाच्या दुकानची मिठाई दहाजण गुप्तपणें चाखणारे व फिरून संभावितीचा टेंभा पाजळणारे सखींचे भक्त कैक आहेत; यांच्या करितां कोणचीं बंधनें आहेत. तर सत्यानें वागणें व परोपकार करणें हाच ज्याचा बाणा अशा जयवंतास आपण कोणत्या आधारावर जाती बाहेर टाकतां ?

तसेंच रा. गुप्ते वकील यांनीं जें अविचारानें विधान ठोकिलें कीं 'झालेला पुनर्विवाह सशास्त्र झाला' व एवढ्या वरूनच रा. नारायणराव गुप्ते यांचें पत्र प्रसिद्ध झालें असावें. होय. उघड आहे आह्मी सुधारक ह्मणणार 'आह्माला शंकराचार्यांची अनुमति मिळो वा न मिळो, समाजाला इष्ट वाटो वा न वाटो आह्माला 'जें करावयाचें तें करणार' व त्याप्रमाणें करतोंहि. मग विवाहाला सशास्त्रतेचें शेपूट हो कोठून लावतां. शास्त्र तर हवे आणि शास्त्राचरण नको मग दोहोची सांगड आपणाला कशी घालतां येईल ? त्यापेक्षां आह्माला तें धर्माचें बंधनही नको व शास्त्राची भानगडही नको, आमचा आपला पंथच निराळा असें ह्मटलें ह्मणजे वादच आटोपला. नाहीं कां !

दुसरें, वैदर्भ पत्रांत आमचे बंधु चिटणीस यांनीं नाना साहेब गुप्ते यांचे वर तिर्गलप्रलापयुक्त भडिमार करण्यांत जें आपलें बुद्धिचापल्य खर्चीं घातलें व जी मनाची अनुदारता प्रगट केली तेवढ्यावरूनच त्यांचें पत्रास उत्तर न देणें हें योग्य असें कोणीही सांगेल. तथापि त्यांना एवढेंच सांगणें आहे कीं नानासाहेब गुप्ते यांस 'गीता' वाचून दाखविण्यास जे आपण तयार आहांत त्यापेक्षां आपणच आपल्या हृत्पटलावर हे गीतेंतील पुढील वाक्य 'अद्वेष्टा सर्व भूतानां मैत्रः करुण एवच' Hating none, friendly and kind to all ) लिहून घेतल्यास बराच फायदा होईल.

आपला एक
'सुधारणेच्छु'

वऱ्हाडसमाचार

मित्ती फाल्गुन शुद्ध १ शके १८१९

दुष्काळ कमिशनाची बैठक नागपुरास तारीख ७ मार्च पासून १० तारखेपर्यंत होणार आहे. त्यावेळीं वऱ्हाड प्रांतांतील साक्षीदारांच्या जबान्या घेतल्या जातील. ज्यांस या दुष्काळ कमिशनास सूचना करावयाच्या असतील त्यांनीं आपल्या सूचना मुद्देसूत रितीनें इंग्रजींत प्रतिपादित कराव्या आणि तो निबंध कमिशनाकडे रवाना करावा

या कमिशनापुढे तीन प्रश्न आहेत:—

( अ ) फ्यामिनकोडामध्यें वऱ्हाडांत काय फेरबदल केला होता.

( ब ) प्रथम दुष्काळाच्या दुःखाचे निवारण व प्राणरक्षण आणि दुसरें खर्चाचा मितपणा या संबंधानें येथील उपायास कितपत यश आलें.

( क ) वरील दोन्ही गोष्टी संबंधानें नवीन सूचना व उपाय काय काय सांगावयाचे आहेत.

( ड ) पुढील दुष्काळाच्या उपयोगी पडणाऱ्या सूचना.

कमिशना पुढील चौकशीचा विषय इतका संकोचित व मर्यादित आहे कीं त्या पासून मोठासा फायदा होईल असें आह्मास वाटत नाहीं.

---

इंडियन प्रजेच्या वचनस्वातंत्र्याची पायमल्ली नवीन पिनलकोडानें अगदीं बिनचूकपणें केली आहे. सरकारानें इंडियनांच्या राजनिष्ठेवर मोठासा भरंवसा न ठेविता हत्याराचा कायदा करून त्यांस निःशस्त्र करून सोडलें. राजनिष्ठ प्रजेला हत्यारें नकोच होतीं. लेखणीचा प्रभाव तलवारी पेक्षां मोठा आहे असें ह्मणतात. ती ह्मण इंडियनांच्या वर्तनांत खरोखरीनें बाणू लागली. इंग्रजी राज्य उदार विद्यादानानें या देशांत चिरायु झालें आहे; आणि या राज्याच्या उदार राजनीतीनें वचनस्वातंत्र्य पूर्णपणें इंडियन प्रजेला देण्यांत आलें. राज्यकर्त्यांशी या स्वातंत्र्यानें सलगी व निकट संबंध जडला आणि राजभक्तीच्या दिशेनें या स्वातंत्र्याचा परिणामकार नामी होत चालला परंतु या देशाच्या दुर्भाग्यानें या सुस्थितीचा विपर्यास होऊं पहात आहे. भलत्याच गोष्टी ला काल्पनिक बंडाचें स्वरूप देऊन सव देशा विषयीं अराजनिष्ठेचा वहिम सरकारच्या मनानें घेतला आहे. अलिकडे राजनीतीचें सुकाणूच भलत्या दिशेनें ही राष्ट्रनौका चालवीत आहे आणि राजद्रोहाच्या तुफानानें ही राष्टनौका उलथीपालथी करून सोडली आहे.

इंडियन प्रजेच्या वचनस्वातंत्र्यावर पिनल कोडाचा भडिमार कसा होतो असें निदर्शनास आल्या कारणानें नवीन पिनलकोड रचण्यांत आलें आहे. या नव्या कायद्याची स्थापना गेल्या शुक्रवारीं झाली. कायदे कौंसिलांत सरकारचा पक्ष बहुमतानें वरचढ आहेच आणि लोकपक्षाला बहुमताची बळकटी मिळणार नाहीं त्या अर्थी नवा कायदा पसार होण्याची दहशत मोठी होती. कायदा बहुमतानें पसार होत असतो आणि सरकार तर्फेच सभासद लोकपक्षाला दडपून टाकण्या इतके पुष्कळ आहेत. या नव्या कायद्यानें सरकारला पिनलकोड ह्मणजे मोठें शस्त्र मिळेल. या सुधारणेच्या काळांत पिनल कोडाचा तोफखाना सरकाराला मोठा उपयोगी होईल. सरकारची तयारी राजभक्त प्रजेच्या हक्का विरुद्ध मोठी भक्कम दिसती. हा लेख कदाचित् या नव्या कायद्या खालीं येईल या भितीनें आपली लेखणी फार जपून पण कशी तरी निराशेनें चालवीत आहों. पिनलकोड आणि क्रिमिनल प्रोसिजर यां दोहोंमध्यें नवीन फेरफारांचें एक मोठें विचित्र जाळें पसरलें आहे. कोणत्या फेरफाराचा आगापिच्छा किती लांबवर पोंचतो याचें यथातथ्य व पूर्ण ज्ञान होण्याची देखील मोठी मारामार पडली आहे पिनलकोडच सध्यां निराळें आणिलें आहे आणि तें पसार झाल्यावर मागाहून क्रिमिनल प्रोसिजर पसार करण्यांत येईल दोन्ही कायदे परस्परांशी समवाय संबंधानें आहेत आणि यांचा एकीभूत परिणाम फार भयंकर होईल असा अंदाज आहे. कोणताही देशभक्त सार्वजनिक कार्यक्रमांच्या ओघानें या नव्या जाळ्यामध्यें अचानक सांपडेल अशी मोठी भिती आहे. इंडियन राष्ट्रभक्तानें सरकारा विरुद्ध इंडियांत कांहीं बोलुं नये इतकेंच नाहीं तर इतर देशांतल्या किंबहुना इंग्लंडांतल्या कायद्याला संभाळून जरी नेटिवानें इंडियाच्या बाहेर आपल्या विचाराचें प्रकाशन केलें तरी त्याला इंडियन पिनलकोडा खालीं आणून शिक्षा करण्याचा अधिकार सरकारानें मोठ्या युक्तीनें आपल्या हातीं घेतला आहे.

पिनल कोडांत सापाचें पिलु नवीन घातलें आहे. त्याची विषबाधा फार जालीम असून त्याच्या छायेनेंच विष भिनतें. जनें ४ थें कलम रद्द करून नवीन कलम असें घातलें आहे:—

( १ ) नेटिव इंडियन प्रजेनें ब्रिटिश इंडियाच्या बाहेर कोठेंही

( २ ) दुसऱ्या ब्रिटिश प्रजेनें नेटिव संस्थानांत कोठेंही.

( ३ ) महाराणीच्या नोकरानें मग तो ब्रिटिश प्रजा असो किंवा नसो—नेटिव संस्थानात कोठेंही.

अपराध केला तर त्या अपराधाला पिनल कोडचाच कायदा लागू होईल.

'अपराध' ह्मणजे पिनल कोडाच्या व्याख्येखालीं येणारा अपराध होय, मग तो अपराध ब्रिटिश इंडियांत घडो किंवा अन्यत्र कोठेंही घडो.

या फेरफारांत केवढी विषमता ठेविली आहे बरें! इंडियन प्रजनें अपराध कोठेंही दुनियेंत केला तरी त्याला शिक्षा इंडियांत करावयाची असा ठराव केला पण इतर ब्रिटिश प्रजेला हा नियम लागू नाहीं. त्यांनीं इंडियांत व नेटिव संस्थानात पिनल कोडाखालील अपराध करितां कामा नये इतरत्र तसा अपराध केल्यास त्यांस शिक्षा देण्याचा अधिकार इंडियन सरकारास नाहीं.

या कलमाचा जोर अगदीं विलक्षण आहे. मि० दादाभाई किंवा बाबू रोमेशचंद्र दत्त यांच्या सारख्या इंडियनांनीं इंग्लंडांत राजकीय विषयावर बोलूं नये, इंडियन सरकारच्या विरुद्ध त्यांनीं ब्रिटिश सरकारच्या माहेरघरीं देखील ब्र, किंवा चकार काढूं नये ह्मणून हें कलम असेंच चमत्कारिक बनविलें आहे इंडिया सरकारच्या विरुद्ध राजद्रोहात्मक भाषण केलें, इंडियन जातीमध्यें वैमनस्य उत्पन्न केलें किंवा भलभलत्या बातम्या छापिल्या तरी त्यांच्यावर इंडियन सरकारची गदा कांहीं चालणार नाहीं.

नवा राजद्रोहाचा कायदा पसार झाल्या नंतर मि. दादाभाइ विलायतेंत कांहीं बोलले किंवा त्यांनीं कांहीं लेख लिहिला तर त्यांस या कायद्या खालीं शिक्षा करण्याचा अधिकार सरकारनें नवीन आपल्या हातीं घेतला आहे. इंडियांत भाषणस्वातंत्र्य किंवा लेखनस्वातंत्र्य काढून घेतलें तर कदाचित् ब्रिटनमध्यें सर्व राजकीय सुधारणेची चळवळ इंडियन चालूं करितील. ही गोष्ट बंद करण्या साठींच हा नवीन कायदा होत आहे असें ह्मटलें तर अन्यथा वाटणार नाहीं. नामदार चामर्स यांनीं रज्जू ह्मणून इंडियनांच्या गळ्यांत सर्प अडकविला आहे. कडक कायद्यानें राजा अधिक प्रिय होत नाहीं किंवा प्रजा अधीक राजनिष्ठ सद्गुणी होणार नाहीं तेव्हां अशा कायद्या पासून लाभा पेक्षां हानी मोठी होईल असा सर्व सुज्ञ लोकांचा समज आहे.

---

नवें पिनल कोड व क्रिमिनल प्रोसिजर या संबंधानें सर वुलियम मार्केबी ह्मणतात कीं दोन मुख्य गोष्टी ध्यानांत धरल्या पाहिजेत. माजिस्ट्रेट ह्मणजे पोलीसचा मुख्य अंमलदार होय. सरकार व विरुद्धपक्षीय राजद्रोहाखालीं दडपून आणिलेले वर्तमान पत्रकर्ते यांची तरफदारीही माजिस्ट्रेटांसच करावी लागते. सर मार्केबी निक्षून ह्मणतात कीं राजकीय बाबदींत तट व पक्ष असावयाचेच आणि एका पक्षाला प्रतिपक्षाची चर्चा आवडावयाची नाहींच हें उघड आहे. विरुद्ध पक्षीयांच्या चर्चेला मोठा मान देऊं असें लार्ड एलजिन ह्मणतात तें खोट्या विनयाचें दर्शक होय. न्यायाधीश पक्का निस्पृही व निष्पक्षपाती असेल तर ठीक, नाहीं तर, पिनल कोडाची भाषा इतकी साधी आहे कीं त्याच्या शब्दाखालीं अपराध ह्मणून वाटेल ती गोष्ट प्रतिपादित करितां येईल चर्चा खरोखर चांगली जोरदार असली तर त्या चर्चेनें प्रेमभाव कमी व्हावा हा नैसर्गिक मनोधर्म होय; आणि तशा चर्चेचा पुनरावृत्ती केली तर प्रेमभावाचा विरोधी भाव उत्पन्नच झालाच पाहिजे. राजद्रोहाच्या नव्या व्याख्येखालीं सरकारच्या विरुद्ध असलेला प्रत्येक लेख किंवा भाषण येईल हें उघड आहे. हायकोर्टा मध्यें काहीं दाद मिळण्याचा संभव आहे, परंतु हा संभव देखील लोकांच्या कल्पनेंतून नष्ट होत चालला आहे. नवा कायदा अप्रयोजक असून प्रजेला मोठा छळकारक होईल सर मार्केबी यांच्या मताला तरी सध्यां कोण मान देणार बरें?

---

आकोल्यास बहुत वर्षा पासून दररोज दिवसा बारा वाजता एक तोफ वाजत असेत. या तोफेचा उपयोग पूर्वी जितका उपयोग होता तितका अलिकडे नाहीं प्रस्तुत पुष्कळ लोक घड्याळें वापरतात तेव्हां त्यांस तोफेच्या आवाजानें वेळ कळण्याची मोठीशी गरज नाहीं. पूर्वी मोलमजूरदारांस दिवस बारा वाजतां सुटी देण्याचा वेळ बरोबर कळविण्यासाठीं या तोफेचा फार उपयोग होत असे. गांवातील लोक आपापलीं घड्याळें या तोफेच्या आवाजाला बरोबर करून घेत असतात. दररोज तोफ उडविण्या संबंधानें सालिना १२५।१५० रुपये येतो. या खर्चाच्या मानानें तोफेच्या आवाजाचें महत्व लोकांस राहिलें नाहीं ही गोष्ट आमच्या प्रमाणें पुष्कळांस कबूल असेल.

गेल्या गुरुवारीं मुनसी अजिजुद्दीन खामगांवाहून साक्ष देण्यासाठीं आकोल्यास आले होते त्यांचें लक्ष येथील मुनसिपालिटीच्या कामांत विशष आस्थेचें आहे जी गोष्ट अकोलेकरांच्या नित्याच्या उपयोगांतली होती ती गोष्ट निरुपयोगी किंवा कमी कमी उपयोगाची होत चालली आहे हें मुनशी अजीजुद्दीन यांच्या लक्ष्यांत लवकर आलें. सहजी बोलता चालतांना त्यांनीं वरील तोफेचा खर्च बंद करण्याविषयीं खानगी सूचना केली. ते ह्मणाले कीं गेल्या १०।१२ वर्षा पूर्वी ही गोष्ट बंद झाली असती तर तितक्या वर्षाच्या खर्चांत एक मोठें टोलजंग घड्याळ या शहरच्या अती उच्च स्थानीं ठेवितां आलें असतें. ही सूचना मे० शेख इस्मायल साहेब व मे० केशवराव दामले सेक्रेटरी यांसही पसंत वाटली. आह्मास आशा आहे कीं या सूचनेचा योग्य विचार होऊन दररोज तोफ वाजविण्याचा सालीना १२५ रुपयांचा खर्च बंद करण्यांत येईल. मुनसिपालिटीला सध्या खर्च कमी करावयाचा आहे तेव्हां हा खर्च चटकन बंद होईल पण नव्या सार्वजनिक घड्याळाची व्यवस्था पुढें मार्गे होईल अशी मात्र आह्मास खात्री वाटत नाहीं.

---

आकोलें शहराला दोन सार्वजनिक बगीचे आहेत. त्यांत 'टेंपल' बगीचा मोठा आहे. त्याची रचना, विस्तार, व व्यवस्था या शहराला शोभण्या सारखी आहे. सार्वजनिक बागबगीचा उत्पन्नासाठीं नसतो हें तत्व आह्मा प्रमाणें येथील मुनसिपालिटीस ही कबूल असेल. शहराला अशीं स्थळें शोभादायक असतात इतकेंच नाहीं तर त्या रम्य आरामस्थानाचा उपयोगही लोकांस मोठा असतो द्रव्याची प्राप्ती अशा सर्वोपयोगी उपवना सारख्या ठिकाणापासून होतच नाहीं. उत्पन्न बेताबाताचेंच किंवा नांवा पुरतेंच असावयाचें असा सर्वत्र अनुभव आहे. खर्च उत्पन्नापेक्षा अधीक होतच असतो तसा 'टेंपल' बगीचा 'बहिमनजी' बगीचा उत्तम स्थितींत ठेवून लोकांस आरामाचीं व विश्रांतीची स्थळें करून देणें हें मुनसिपालिटीचें काम आहे. तें काम आमच्या मुनसिपालिटीच्या हातून होतच नाहीं पण कमिटीच्या वहिवाटीला आलेला बगीचा देखील नीट चालूं ठेवण्यास मुनसिपालिटीस कठीण वाटत आहे. खर्च कमी करण्याच्या नादानें 'टेंपल' बगीचा पट्यानें लावून काढणार आहे. पट्यानें दिल्या नंतर सध्या प्रमाणें देखील तो बगीचा राहणार नाहीं. अलिकडे रा० रा० लक्ष्मण गोविंद ओक गार्डन-सुपरिंटेंडेंट यांनीं दोन्ही बागेचे चालूं खर्चांतच मोठ्या काटकसरीनें व उत्तम पैरवीनें सुस्थितींत आणिले आहेत. अशांत बगीच्या माडेपट्यानें देण्यांत आला

तर त्याची काय दशा होईल हें निराळें सांगण्याची जरूरी नाहीं. मुनसिपालिटीचा हा विषय आहे आणि मुनसिपालिटीचे सभासद आमच्या गरजा ओळखणारे आहेत अशा स्थितींत जर 'टेंपल' बगीच्या मोडण्यालाच पत्याच्या द्वारानें प्रारंभ होत आहे तेव्हां तसेंच कांहीं विशिष्ट कारण असेल असें मानणें अधीक चांगलें होईल.

आम्ही आकोल्याच्या मुनसिपालिटी सारख्या निरुपद्रवी संस्थेलाच बगीच्या संबंधानें दोष लावावा यांत कांहीं हांशील नाहीं. आमच्या सरकारचा मूळ कित्ताही या पेक्षां वाईट वळणाचा आहे. आग्रा येथें यमुनच्या पूर्व किनाऱ्यावर 'आराम बाग' ह्मणून एक सुंदर अप्रतिम बगीचा आहे हा जुना असून इतिहासांत प्रसिद्ध आहे. बाबर,नूरजहान इत्यादि मोंगलाच्या वेळेपासून हा बगीचा नामांकित आहे. हा बगीचा चालूं ठेवण्याचा खर्च सोसवत नाहीं ह्मणून सरकार त्याचा हरास करणार आहे इंडियांतील उत्तम बगीच्यांतील हा एक आहे. त्याच्या विक्रीचा हुकूम आज ऐकूं आला व कदाचित् 'ताजमहाल' ही अप्रतिम इमारत विकून लक्षावधी रुपये उत्पन्न करण्याची पाळी न येवो ह्मणजे झालें. नगाऱ्यापुढें तुणतुणा तसा आकोल्याचा 'टेंपल' बगीचा. तेव्हां तो मोडून ती जागा भाड्यानें राहण्यास देऊन आकोला मुनसिपालिटीनें आपलें उत्पन्न वाढविलें तर मोठें नवल नाहीं. पण अलिकडील नव्या नियमा प्रमाणें हें भाड्याचें उत्पन्न देखील सरकारच्या इंपिरिअल खजिन्यांत भरावें लागेल.

—○○○—

राव बहादूर सिताराम विश्वनाथ पटवर्धन डायरेक्टर यांनीं मुलींच्या शिक्षणा संबंधानें फार काळजी घेतली आहे. स्त्रीशिक्षण वाढवावें असा त्यांचा मोठा आग्रह आहे. पैशाच्या बाबतींत त्यांस पुष्कळ अडचणी येतात आणि त्यामुळें त्यांचे उपायही चालत नाहींत. या गोष्टीचा खुलासा रा० रा० विष्णु मोरेश्वर महाजनी एम. ए. यानीं गेल्या राष्ट्रीय सामाजिक परिषदेच्यावेळीं चांगला केला होता. सरकारांतून पैशाची मदत मिळत नाहीं तेव्हां स्त्रीशिक्षणाविषयीं इतर खानगी उपाय कोणते आहेत याचा त्यांनीं उल्लेख केला होता. स्त्रीशिक्षण वऱ्हाडात नाहीं ह्मटलें तरी चालेल. उमरावतीस राष्ट्रीय सभेच्या वेळीं कांहीं सभ्य स्त्रियानीं जो स्त्रीशिक्षणाचा उत्कर्ष ध्वनित केला व सर्व राष्ट्रांस आनंदित केलें त्या गोष्टीला भुलुन खरी स्त्रीशिक्षणाची सामान्य स्थिती विसरता कामा नये. पहिल्या प्राथमिक चार इयत्ता ह्मणजे प्रांतस्थ स्त्रीशिक्षणाचा अथ पासून इति पर्यंतचा बहुतेक इतिहास होय. तथापि रावबहादूर पटवर्धन साहेबांनीं मुलींच्या शिक्षणा बद्दल कांहीं विशेष सोयी केल्या आहेत. प्राथमिक शाळांतून मुलांच्या शाळांतून मुली घेण्याची चाल यांनीं सुरू केली आणि ती पुष्कळ प्रकारें फायद्याची होत आहे. कन्याशाळा अधीक स्थापिता येत नाहींत तर या नव्या युक्तीनें मुलांच्या प्राथमिक शाळांचा मुलींसही फायदा मोठा होत आहे. रावबहादुरांनीं केलेल्या या सुधारणे बद्दल आह्मी त्यांचें अभिनंदन करितों आणि त्या सुधारणेची उपयुक्तता सक्तीनें वाढविण्या विषयीं साहेब बहादूर व त्यांचे हाता खालील गृहस्थ चांगला मेहनत करितील असें आह्मी इच्छितों या नव्या पध्दतीला चांगलें यश येत आहे ही गोष्ट मुलींच्या प्राथमिक शिक्षणा विषयीं विशेष आनंदाची होय. आमच्या ह्मणण्याच्या प्रत्यन्तराला आह्मी गेल्या पांच वर्षांचे आंकडे खालीं देतोः—

| सन | मुलींची संख्या | |
|---|---|---|
| | मुलांची शाळा | कन्याशाळा |
| १८९२ ९३ | २७० | १८९४ |
| ९३-९४ | ३९२ | १९०३ |
| ९४-९५ | १०४२ | १९१९ |
| ९५ ९६ | १५०८ | १९३३ |
| ९६ ९७ | १७०९ | १९९८ |

या आंकड्यावरून दिसेल की कन्याशाळांतून जितक्या मुली शिकतात त्यांच्या संख्येच्या खालोखाल मुलांच्या शाळांतून मुली शिकतात गेल्या पांच वर्षांत राव बहादूर पटवर्धन साहेबांनीं स्त्रीशिक्षणाला चांगलें महत्व आणिलें आणि त्याचा प्रसारही चांगला केला याबद्दल लोकांच्या आदरास ते विशेष पात्र आहेत.

## The Berar Samachar

MONDAY FEBRUARY 21 1898

The Sedition bill becomes at last the law of the land. The non—official members of the Viceregal Council presented a bold front and proposed in the interests of public weal and safety, a number of sound, moderate and weighty amendments. But they are lost to the utter disappointment of the nation. This fact proves however the supreme hand of the Government in the *settled* majority. The public opinion should naturally be indignant at the *predetermined* fall of their representatives in the Legislation Council. If public bodies and meetings under the auspicies of the eminent citizens of the Nation are of no weight, dignity, and significance and their representations count for little more than waste papers it is really high time to pause and to bring to a dead—lock all our activities in political matters. The new law is now strongly against sedition and let us hope that the Government will succeed well to check down sedition real or imaginary.

The question is whether we shall unlearn the political lessons of western education and allow ourselves to run a downward course in the paths beset with the evils of imperialism of the Government or whether we shall cherish a hope of fighting an onward battle in England and proceed to awaken the English nation to do their righteous duty towards the people of this country. Even such an attempt will now be an offence of sedition. Silence and despair rule supreme in our mind and we do not know how to settle ourselves to welcome the new measure of law. Let us not be mistaken as to the exact obedience which the Government require of us all as loyal subjects of Her Majesty the Queen Empress. The Viceroy ordains the Indian people to look at the law in the most humble manner. His Excellency's remarks we hasten to publish in the telegraphic summary which is now at hand:—

"His Excellency said the mass of criticism, hostile and otherwise, with which the measure had been greeted, had been most patiently considered, and he was glad to find the Government were so much in accord with those who critisised it, since the points in dispute related almost entirely to the meaning of the expressions used. The Government had not taken up any domineering attitude, and had been ready patiently to listen to objections, but the responsibility of the framing of the law must remain with the Government, which also had the power Hence it has been necessary beyond certain point to resist alteration in the proposals. In conclusion Lord Elgin hoped that when the heat of moment has passed all ranks will unite in giving the measure a fair trial."

Lord Sandhurst presided at the last Convocation of the Bombay University on Tuesday last. As Chancellor His Excellency delivered able address on the utility of University education. The aim and object of the higher education are set in a clear and eloquent language which we are almost apt to quote. Lord Sandhurst proceeds to remark thus:—

"What we do expect, or at least what, if our educational system is what it should be, we have a right to expect, is that its most finished product should be a man of trained intelligence and formed character, ready to undertake any duty which his position and work in life may impose upon him. The education which we set before us as an ideal should be "regular," that is, systematic and well ordered; and "liberal," *i. e*, such as to fit its recipients for the citizenship of a civilized community. In order that it may be systematic it must be directed by experienced teachers, and its various stages must be so co ordinated that the pupil may pass through the whole course without repetition or waste of power. If, again, the education we give is to be "liberal" in the sense I have already explained we must provide for the training of the character as well as of the intellect. For the will requires discipline no less than the mind, and the development of the intellect without strengthening of the character is more dangerous than ignorance itself. This general training of the whole man is the discipline that our educational system has to aim at and it includes far more than keeping order in the school room. Life in a civilized society requires an amount of self control and self—denial which, we do not recognize only because they have become habitual, and if we are to train up the young to be good citizens we must exercise them also in the practice of these virtues. No successful system of education has neglected or can afford to neglect such training. Under the ancient Hindu system the young Brahmin had to undergo a severe and long continued discipline of the mind before he was permitted to enter upon the duties of secular life. Some of us may think that system expected too much of ordinary human nature. But the ideal it set before itself with its reverence for the aged, its rules of self—denial, and its minutely prescribed duties, shows at least that to the men who established it education meant more than the imparting of knowledge. But, if discipline and restraint are necessary even when the social and the intellectual impulses are in harmony and not in conflict, they are more especially needed where the young scholar is exposed to the influence of two divergent civilizations. The new learning of the West may act either as a stimulant or as a poison; it may either broaden and deepen the mind and the character, or it may dissolve the old beliefs and the old morality without creating any thing in their place."

However we do not well understand the full significance of his remarks about politics as a subject for students. Politics should be a forbidden fruits according to the Chancellor. We do not subscribe to such a theory. Students should not dabble with politics. This fact we shall admit but that they should admit all side lights to prepare their next scheme of future life is equally welcome to us. But the latter phase of education should neither be denied to students as well as to their teachers.

## वऱ्हाड

हवामान—अंगाला झोंबणारा गार वारा अतिशय सुटतो. किरकोळ दुखणीं जोरावर आहेत. पाण्याची कमताई सर्व प्रांतभर झाली आहे.

मे. आवर्ड साहेब जुडिशीअल कमिशनर हे गेल्या बुधवारीं आपलें कामाचा चार्ज देऊन उमरावतीहून मेलगाडीनें मुंबईस रवाना झाले त्यांची रजा ३ महिना २० दिवसांची आहे आणि या थोड्या मुदतींतच ते विलायतची सफर करून येणार आहेत.

मे ब्रीडो साहेब यांनीं अफू, गांजा, व शिंदी यांच्या अबकारी मक्त्याचा हराम गेल्या गुरुवारीं केला आणि कामाचा चार्ज मे. हेअर साहेब बहादूर यांस दिला.

डायरेक्टर आफ लांड रेकार्डस मि. फ्रान्सिस हे रजेवरून परत येऊन आपल्या कामीं दाखल झाले आणि क्याप्टन ग्यारेट साहेब रजेवर जात आहेत ह्मणून त्यांच्या सन्मानार्थ त्यांस गेल्या शुक्रवारीं येथील टौनहालांत पानसुपारी देण्यांत आली.

रा. रा. रामचंद्र अंबादास नायब तहशीलदार, मंगरूळ पीर, यांची बदली खामगांवास होऊन तेथील ना. तहशीलदार रा. रा. विठ्ठल सदाशिव करकरे यांस मंगरूळपीरास बदललें.

### NOTICE

The annual fair at Warha Taluk Kelapur Wun District held at end of February will not take place this year.

16th February 1898 Yeotmal } (Sd.) F. R. Mauduit offg. Deputy Commissioner Wun District.

### नोटीस

रा. रा. अमृता वल्लद लक्ष्मण राहणार दिवठाणें ता० आकोट आणि महमदबेग राहणार आकोट यांस.

माझ्या मालकीचें आणि माझ्या ताब्यांतलें शेत मौजे दिवठाणें ( तालुके आकोट ) येथील सर्व्हे नंबर ४ पैकीं यांत सन १८९६ च्या उन्हाळ्यांत तुह्मी येऊन आंब्या संबंधानें दाडगाई केली. त्या बाबतींत फौजदारी काम चालून महमदबेग यास दंड झाला आहे गुदस्ता आंब्याला मोहर नव्हता. यंदा तुह्मी किंवा तुमच्या वतीनें कोणी इसम आंब्या संबंधानें माझ्या शेतांत येऊं नये. माझ्या शेतांतील आंबराईसुद्धा सर्व शेतावर कोणाची ही मालकी नाहीं. या नोटीशी नंतर तुह्मी याल तर तुह्मावर फौजदारी केली जाईल. तुमची कांहीं तक्रार असल्यास तुह्मास दिवाणी कोर्ट खुलें आहे. पुढें फौजदारीचा प्रकार होऊं नये ह्मणून या जाहिर लेखानें तुह्मास कळविलें आहे तारीख १९ फेब्रवारी सन १८९८ इसवी.

सही
ईश्वरसिंग फत्तेसिंग दस्तूर खुद्द.
बर्तमानसार.

वऱ्हाडसमाचार

मित्ती फाल्गुन शुद्ध १ शके १८१९

दुष्काळ कमिशनाची बैठक नागपुरास तारीख ७ मार्च पासून १० तारखेपर्यंत होणार आहे. त्यावेळीं वऱ्हाड प्रांतांतील साक्षीदारांच्या जबान्या घेतल्या जातील. ज्यांस या दुष्काळ कमिशनास सूचना करावयाच्या असतील त्यांनीं आपल्या सूचना मुद्देसूत रितीनें इंग्रजींत प्रतिपादित कराव्या आणि तो निबंध कमिशनाकडे रवाना करावा या कमिशनापुढे तीन प्रश्न आहेत:—

( अ ) फ्यामिनकोडामध्यें वऱ्हाडांत काय फेरबद्दल केला होता.

( ब ) प्रथम दुष्काळाच्या दुःखाचे निवारण व प्राणरक्षण आणि दुसरे खर्चाचा मितपणा या संबंधानें येथील उपायास कितपत यश आलें.

( क ) वरील दोन्ही गोष्टी संबंधानें नवीन सूचना व उपाय काय काय सांगावयाचे आहेत.

( ड ) पुढील दुष्काळाच्या उपयोगी पडणाऱ्या सूचना.

कमिशना पुढील चौकशीचा विषय इतका संकोचित व मर्यादित आहे कीं त्या पासून मोठासा फायदा होईल असें आह्मास वाटत नाहीं.

---

इंडियन प्रजेच्या वचनस्वातंत्र्याची पायमल्ली नवीन पिनल कोडानें अगदीं बिनचूकपणें केली आहे. सरकारानें इंडियनांच्या राजनिष्ठेवर मोठासा भरंवसा न ठेविता हत्याराचा कायदा करून त्यांस निःशस्त्र करून सोडलें. राजनिष्ठ प्रजेला हत्यारें नकोच होतीं. लेखणीचा प्रभाव तलवारी पेक्षा मोठा आहे असें ह्मणतात. ती ह्मण इंडियनांच्या वर्तनांत खरोखरीनें बाणू लागली. इंग्रजी राज्य उदार विद्यादानानें या देशांत चिरायु झालें आहे; आणि या राज्याच्या उदार राजनीतीनें वचनस्वातंत्र्यच पूर्णपणें इंडियन प्रजेला देण्यांत आलें. राज्यकर्त्यांशी या स्वातंत्र्यानें सलगी व निकट संबंध जडला आणि राजभक्तीच्या दिशेनें या स्वातंत्र्याचा परिणाम फार नामी होत चालला परंतु या देशाच्या दुर्भाग्यानें या सुस्थितीचा विपर्यास होऊं पहात आहे. भलत्याच गोष्टीला काल्पनिक बंडाचें स्वरूप देऊन सब देशा विषयीं अराजनिष्ठेचा वहिम सरकारच्या मनानें घेतला आहे. अलिकडे राजनीतीचें सुकाणूच भलत्या दिशेनें ही राष्ट्रनौका चालवीत आहे आणि राजद्रोहाच्या तुफानानें ही राष्ट्रनौका उलथीपालथी करून सोडली आहे.

इंडियन प्रजेच्या वचनस्वातंत्र्यावर पिनल कोडाचा भडिमार कसा होतो असें निदर्शनास आल्या कारणानें नवीन पिनलकोड रचण्यांत आलें आहे. या नव्या कायद्याची स्थापना गेल्या शुक्रवारीं झाली. कायदे कौंसिलांत सरकारचा पक्ष बहुमतानें बरचढ आहेच आणि लोकपक्षाला बहुमताची बळकटी मिळणार नाहीं त्या अर्थी नवा कायदा पसार होण्याची दहशत मोठी होती. कायदा बहुमतानें पसार होत असतो आणि सरकार तर्फेच सभासद लोकपक्षाला दडपून टाकण्या इतके पुष्कळ आहेत. या नव्या कायद्यानें सरकारला पिनलकोड ह्मणजे मोठें शस्त्र मिळेल. या सुधारणेच्या काळांत पिनल कोडाचा तोफखाना सरकाराला मोठा उपयोगी होईल. सरकारची तयारी राजभक्त प्रजेच्या हक्का विरुद्ध मोठी भक्कम दिसती. हा लेख कदाचित् या नव्या कायद्या खालीं येईल या भितीनें आपली लेखणी फार जपून पण कशी तरी निश्चयानें चालवीत आहों. पिनलकोड आणि क्रिमिनल प्रोसिजर यां दोहोंमध्यें नवीन फेरफारांचें एक मोठें विचित्र जाळें पसरलें आहे. कोणत्या फेरफाराचा आगापिच्छा किती लांबवर पोंचतो याचें यथातथ्य व पूर्ण ज्ञान होण्याची देखील मोठी मारामार पडली आहे पिनलकोडच सध्यां निराळें आणिलें आहे आणि तें पसार झाल्यावर मागाहून क्रिमिनल प्रोसिजर पसार करण्यांत येईल दोन्ही कायदे परस्परांशी समवाय संबंधानें आहेत आणि यांचा एकीभूत परिणाम फार भयंकर होईल असा अंदाज आहे. कोणताही देशभक्त सार्वजनिक कार्यक्रमांच्या ओघानें या नव्या जाळ्यामध्यें अचानक सांपडेल अशी मोठी भिती आहे. इंडियन राष्ट्रभक्तानें सरकारा विरुद्ध इंडियांत कांहीं बोलूं नये इतकेंच नाहीं तर इतर देशांतल्या किंबहुना इंग्लंडांतल्या कायद्याला संभाळून जरी नेटिवानें इंडियाच्या बाहेर आपल्या विचाराचें प्रकाशन केलें तरी त्याला इंडियन पिनलकोडा खालीं आणून शिक्षा करण्याचा अधिकार सरकारानें मोठ्या युक्तीनें आपल्या हातीं घेतला आहे.

पिनल कोडांत सापाचें पिलूं नवीन घातलें आहे. त्याची विषबाधा फार जालीम असून त्याच्या छायेनेंच विष भिनतें. जसें ४ थे कलम रद्द करून नवीन कलम असें घातलें आहे:—

( १ ) नेटिव इंडियन प्रजेनें ब्रिटिश इंडियाच्या बाहेर कोठेंही

( २ ) दुसऱ्या ब्रिटिश प्रजेनें नेटिव संस्थानांत कोठेंही.

( ३ ) महाराणीच्या नोकरानें मग तो ब्रिटिश प्रजा असो किंवा नसो—नेटिव संस्थानात कोठेंही.

अपराध केला तर त्या अपराधाला पिनल कोडचाच कायदा लागू होईल.

'अपराध' ह्मणजे पिनल कोडाच्या व्याख्येखाली येणारा अपराध होय, मग तो अपराध ब्रिटिश इंडियांत घडो किंवा अन्यत्र कोठेंही घडो.

या फेरफारांत केवढी विषमता ठेविली आहे बरें! इंडियन प्रजनें अपराध कोठेंही दुनियेंत केला तरी त्याला शिक्षा इंडियांत करावयाची असा ठराव केला पण इतर ब्रिटिश प्रजेला हा नियम लागू नाहीं. त्यांनीं इंडियांत व नेटिव संस्थानात पिनल कोडाखालील अपराध करितां कामा नये इतरत्र तसा अपराध केल्यास त्यांस शिक्षा देण्याचा अधिकार इंडियन सरकारास नाहीं.

या कलमाचा जोर अगदीं विलक्षण आहे. मि० दादाभाई किंवा बाबू रोमेशचंद्र दत्त यांच्या सारख्या इंडियनांनीं इंग्लंडांत राजकीय विषयावर बोलूं नये, इंडियन सरकारच्या विरुद्ध त्यांनीं ब्रिटिश सरकारच्या माहेरघरीं देखील ब्र, किंवा चकार काढूं नये ह्मणून हें कलम असेंच चमत्कारिक बनविलें आहे इंडिया सरकारच्या विरुद्ध राजद्रोहात्मक भाषण केलें, इंडियन जातीमध्यें वैमनस्य उत्पन्न केलें किंवा भलभलत्या बातम्या छापिल्या तरी त्यांच्यावर इंडियन सरकारची गदा कांहीं चालणार नाहीं.

नवा राजद्रोहाचा कायदा पसार झाल्या नंतर मि. दादाभाई विलायतेंत कांहीं बोलले किंवा त्यांनीं कांहीं लेख लिहिला तर त्यांस या कायद्या खालीं शिक्षा करण्याचा अधिकार सरकारनें नवीन आपल्या हातीं घेतला आहे. इंडियांत भाषणस्वातंत्र्य किंवा लेखनस्वातंत्र्य काढून घेतलें तर कदाचित् ब्रिटनमध्यें सर्व राजकीय सुधारणेची चळवळ इंडियन चालूं करितील. ही गोष्ट बंद करण्या साठींच हा नवीन कायदा होत आहे असें ह्मटलें तर अन्यथा वाटणार नाहीं. नामदार चामर्स यांनीं रज्जू ह्मणून इंडियनांच्या गळ्यांत सर्प अडकविला आहे. कडक कायद्यानें राजा अधिक प्रिय होत नाहीं किंवा प्रजा अधीक राजनिष्ठ सद्गुणी होणार नाहीं तेव्हां अशा कायद्या पासून लाभा पेक्षां हानी मोठी होईल असा सर्व सूज्ञ लोकांचा समज आहे.

---

नवें पिनल कोड व क्रिमिनल प्रोसिजर या संबंधानें सर वुलियम मार्केबी ह्मणतात कीं दोन मुख्य गोष्टी ध्यानात धरल्या पाहिजेत. माजिस्ट्रेट ह्मणजे पोलीसचा मुख्य अंमलदार होय. सरकार व विरुद्धपक्षीय राजद्रोहाखालीं दडपून आणिलेले वर्तमान पत्रकर्ते याची तरफदारीही माजिस्ट्रेटांसच करावी लागते. सर मार्केबी निक्षून ह्मणतात कीं राजकीय वादवादींत तट व पक्ष असावयाचेच आणि एका पक्षाला प्रतिपक्षाची चर्चा आवडावयाची नाहींच हें उघड आहे. विरुद्ध पक्षीयांच्या चर्चेला मोठा मान देऊं असें लार्ड एलजिन ह्मणतात तें खोट्या विनयाचें दर्शक होय. न्यायाधीश पक्का निस्पृही व निष्पक्षपाती असेल तर ठीक, नाहीं तर, पिनल कोडाची भाषा इतकी साधी आहे कीं त्याच्या शब्दाखालीं अपराध ह्मणून वाटेल ती गोष्ट प्रतिपादित करितां येईल चर्चा खरोखर चांगली जोरदार असली तर त्या चर्चेनें प्रेमभाव कमी व्हावा हा नैसर्गिक मनोधर्म होय; आणि तशा चर्चेची पुनरावृत्ती केली तर प्रेमभावाचा विरोधी भाव उत्पन्नच झालाच पाहिजे. राजद्रोहाच्या नव्या व्याख्ये खालीं सरकारच्या विरुद्ध असलेला प्रत्येक लेख किंवा भाषण येईल हें उघड आहे. हायकोर्टा मध्यें कांहीं दाद मिळण्याचा संभव आहे, परंतु हा संभव देखील लोकांच्या कल्पनेंतून नष्ट होत चालला आहे. नवा कायदा अप्रयोजक असून प्रजेला मोठा छळकारक होईल सर मार्केबी यांच्या मताला तरी सध्यां कोण मान देणार बरें?

---

आकोल्यास बहुत वर्षा पासून दररोज दिवसा बारा वाजता एक तोफ वाजत असते. या तोफेचा उपयोग पूर्वी जितका उपयोग होता तितका अलिकडे नाहीं प्रस्तुत पुष्कळ लोक घड्याळें वापरतात तेव्हा त्यांस तोफेच्या आवाजानें वेळ कळण्याची मोठीशी गरज नाहीं. पूर्वी मोलमजूरदारांस दिवस बारा वाजतां सुटी देण्याचा वेळ बरोबर कळविण्यासाठीं या तोफेचा फार उपयोग होत असे. गांवातील लोक आपापलीं घड्याळें या तोफेच्या आवाजाला बरोबर करून घेत असतात. दररोज तोफ उडविण्या संबंधानें सालिना १२९।१९० रुपये येतो. या खर्चाच्या मानानें तोफेच्या आवाजाचें महत्व लोकांस राहिलें नाहीं ही गोष्ट आमच्या प्रमाणें पुष्कळांस कबूल असेल.

गेल्या गुरुवारीं मुनसी अजिजुद्दीन खामगांवाहून साक्ष देण्यासाठीं आकोल्यास आले होते त्यांचें लक्ष येथील मुनसिपालिटीच्या कामांत विशष आस्थेचें आहे जी गोष्ट अकोलेकरांच्या नित्याच्या उपयोगांतली होती ती गोष्ट निरुपयोगी किंवा कमी कमी उपयोगाची होत चालली आहे हें मुनशी अजीजुद्दिन यांच्या लक्ष्यांत लवकर आलें. सहजी बोलता चालतांना त्यांनीं वरील तोफेचा खर्च बंद करण्याविषयीं खानगी सूचना केली. ते ह्मणाले कीं गेल्या १०।१२ वर्षा पूर्वी ही गोष्ट बंद झाली असती तर तितक्या वर्षाच्या खर्चात एक मोठें टोलजंग घड्याळ या शहरच्या अती उच्च स्थानीं ठेवितां आलें असतें. ही सूचना मे० शेख इस्मायल साहेब व मे० केशवराव दामले सेक्रटरी यांसही पसंत वाटली. आह्मास आशा आहे कीं या सूचनेचा योग्य विचार होऊन दररोज तोफ वाजविण्याचा सालीना १२९ रुपयांचा खर्च बंद करण्यांत येईल. मुनसिपालिटीला सध्या खर्च कमी करावयाचा आहे तेव्हां हा खर्च चटकन बंद होईल पण नव्या सार्वजनिक घड्याळाची व्यवस्था पुढें मार्गे होईल अशी मात्र आह्मास खात्री वाटत नाहीं.

---

आकोलें शहराला दोन सार्वजनिक बगीचे आहेत. त्यांत 'टेंपल' बगीचा मोठा आहे. त्याची रचना, विस्तार, व व्यवस्था या शहराला शोभण्या सारखी आहे. सार्वजनिक बागबगीचा उत्पन्नासाठीं नसतो हें तत्व आह्मा प्रमाणें येथील मुनसिपालिटीस ही कबूल असेल. शहराला अशीं स्थळें शोभादायक असतात इतकेंच नाहीं तर त्या रम्य आरामस्थानाचा उपयोगही लोकांस मोठा असतो द्रव्याची प्राप्ती अशा सर्वोपयोगी उपवना सारख्या ठिकाणापासून होतच नाहीं. उत्पन्न बेताबाताचेंच किंवा नांवा पुरतेंच असावयाचें असा सर्वत्र अनुभव आहे. खर्च उत्पन्नापेक्षा अधीक होतच असतो तसा 'टेंपल'बगीचा 'बहिमनजी' बगीचा उत्तम स्थितींत ठेवून लोकांस आरामाचीं व विश्रांतीचीं स्थळें करून देणें हें मुनसिपालिटीचें काम आहे. तें काम आमच्या मुनसिपालिटीच्या हातून होतच नाहीं पण कमिटीच्या वहिवाटील आलेला बगीचा देखील नीट चालूं ठेवण्यास मुनसिपालिटीस कठीण वाटत आहे. खर्च कमी करण्याच्या नादानें 'टेंपल' बगीचा पट्ट्यानें लावून काढणार आहे. पट्ट्यानें दिल्या नंतर सध्या प्रमाणें देखील तो बगीचा राहणार नाहीं. अलिकडे रा० रा० लक्ष्मण गोविंद ओक गार्डन-सुपरिंटेंडेंट यांनीं दोन्ही बागेचे चालूं खर्चांतच मोठ्या काटकसरीनें व उत्तम पैरवीनें सुस्थितींत आणिले आहेत. असांत बगीच्या माडेपट्ट्यानें देण्यांत आला

तर त्याची काय दशा होईल हें निराळें सांगण्याची जरूरी नाहीं. मुनसिपाल्टिीचा हा विषय आहे आणि मुनसिपालिटीचे सभासद आमच्या गरजा ओळखणारे आहेत अशा स्थितींत जर 'टेंपल' बगीच्या मोडण्यालाच पब्लिकच्या द्वारानें प्रारंभ होत आहे तेव्हां तसेंच कांहीं विशिष्ट कारण असेल असें मानणें अधीक चांगलें होईल.

आम्ही आकोल्याच्या मुनसिपालिटी सारख्या निरुपद्रवी संस्थेलाच बगीच्या संबंधानें दोष देण्या यांत कांहीं हांशील नाहीं. आमच्या सरकारचा मूळ कित्ताहि या पेक्षां वाईट वळणाचा आहे. आग्रा येथें यमुनेच्या पूर्व किनाऱ्यावर 'आराम बाग' ह्मणून एक सुंदर अप्रतिम बगीचा आहे हा जुना असून इतिहासांत प्रसिद्ध आहे. बाबर, नूरजहान इत्यादि मोंगलाच्या वेळेपासून हा बगीचा नामांकित आहे. हा बगीचा चालूं ठेवण्याचा खर्च सोसवत नाहीं ह्मणून सरकार त्याचा हरास करणार आहे इंडियांतील उत्तम बगीच्यांतील हा एक आहे. त्याच्या विक्रीचा हुकूम आज ऐकूं आला व कदाचित् 'ताजमहाल' ही अप्रतिम इमारत विकून लक्षावधी रुपये उत्पन्न करण्याची पाळी न येवो ह्मणजे झालें. नगाऱ्यापुढें तुणतुणा तसा आकोल्याचा 'टेंपल' बगीचा. तेव्हां तो मोडून ता जागा भाड्यानें राहण्यास देऊन आकोला मुनसिपालिटीनें आपलें उत्पन्न वाढविलें तर मोठें नवल नाहीं. पण अलिकडील नव्या नियमा प्रमाणें हें भाड्याचें उत्पन्न देखील सरकारच्या इंपिरिअल खजिन्यांत भरावें लागेल.

---

राव बहादूर सिताराम विश्वनाथ पटवर्धन डायरेक्टर यांनीं मुलींच्या शिक्षणा संबंधानें फार काळजी घेतली आहे. स्त्रीशिक्षण वाढवावें असा त्यांचा मोठा आग्रह आहे. पैशाच्या बाबदींत त्यांस पुष्कळ अडचणी येतात आणि त्यामुळें त्यांचे उपायही चालत नाहींत. या गोष्टीचा खुलासा रा० रा० विष्णु मोरेश्वर महाजनी एम. ए. यांनीं गेल्या राष्ट्रीय सामाजिक परिषदेच्यावेळीं चांगला केला होता. सरकारांतून पैशाची मदत मिळत नाहीं तेव्हां स्त्रीशिक्षणाविषयीं इतर खानगी उपाय कोणते आहेत याचा त्यांनीं उल्लेख केला होता. स्त्रीशिक्षण वऱ्हाडात नाहीं ह्मटलें तरी चालेल. उमरावतीस राष्ट्रीय सभेच्या वेळीं कांहीं सभ्य स्त्रियांनीं जो स्त्रीशिक्षणाचा उत्कर्ष ध्वनित केला व सर्व राष्ट्रांस आनंदित केलें त्या गोष्टीला भुलन खरी स्त्रीशिक्षणाची सामान्य स्थिती विसरता कामा नये. पहिल्या प्राथमिक चार इयत्ता ह्मणजे प्रांतस्थ स्त्रीशिक्षणाचा अथ पासून इति पर्यंतचा बहुतेक इतिहास होय. तथापि रावबहादूर पटवर्धन साहेब नीं मुलींच्या शिक्षणा बद्दल कांहीं विशेष सोयी केल्या आहेत. प्राथमिक शाळांतून मुलांच्या शाळांतून मुली घेण्याची चाल यांनीं सुरू केली आणि ती पुष्कळ प्रकारें फायद्याची होत आहे. कन्याशाळा अधीक स्थापिता येत नाहींत तर या नव्या युक्तीनें मुलांच्या प्राथमिक शाळांचा मुलींसही फायदा मोठा होत आहे रावबहादुरांनीं केलेल्या या सुधारणे बद्दल आह्मी त्यांचें अभिनंदन करितों आणि त्या सुधारणेची उपयुक्तता युक्तीनें वाढविण्या विषयीं साहेब बहादूर व त्यांचे हाता खालील गृहस्थ चांगला मेहनत करितील असें आह्मी इच्छितों या नव्या पद्धतीला चांगलें यश येत आहे ही गोष्ट मुलींच्या प्राथमिक शिक्षणा विषयीं विशेष आनंदाची होय. आमच्या ह्मणण्याच्या प्रत्यन्तराला आह्मी गेल्या पांच वर्षांचे आंकडे खालीं देतोः—

| सन | मुलींची संख्या मुलांची शाळा | कन्याशाळा |
|---|---|---|
| १८९२-९३ | २७० | १८९४ |
| ९३-९४ | ३९२ | १९०३ |
| ९४-९५ | १०४२ | १९१५ |
| ९५-९६ | १५०८ | १९३३ |
| ९६-९७ | १७०९ | १९९८ |

या आंकड्यावरून दिसेल कीं कन्याशाळांतून जितक्या मुली शिकतात त्यांच्या संख्येच्या खालोखाल मुलांच्या शाळांतून मुली शिकतात गेल्या पांच वर्षांत राव बहादूर पटवर्धन साहेबांनीं स्त्रीशिक्षणाला चांगलें महत्व आणिलें आणि त्याचा प्रसारही चांगला केला या बद्दल लोकांच्या आदरास ते विशेष पात्र आहेत.

---

## The Berar Samachar

MONDAY FEBRUARY 21 1898

The Sedition bill becomes at last the law of the land. The non—official members of the Vic-regal Council presented a bold front and proposed in the interests of public weal and safety, a number of sound, moderate and weighty amendments. But they are lost to the utter disappointment of the nation. This fact proves however the supreme hand of the Government in the *settled* majority. The public opinion should naturally be indignant at the *prede—termined* fall of their representatives in the Legislation Council. If public bodies and meetings under the auspicies of tho eminent citizens of the Nation are of no weight, dignity, and signi— ficance and their representations count for little more than waste papers it is really high time to pause and to bring to a dead—lock all our activities in political matters. The new law is now strongly against sedition and let us hope that the Government will suc—ceed well to check down sedition real or imaginary.

The question is whether we shall unlearn the political lessons of western education and allow ourselves to run a downward course in the paths beset with the evils of imperialism of the Government or whether we shall cherish a hope of fighting an onward battle in England and proceed to awaken the English nation to do their righteous duty towards the people of this country. Even such an attempt will now be an offence of sedition. Silence and despair rule supreme in our mind and we do not know how to settle ourselves to welcome the new measure of law. Let us not be mistaken as to the exact obedience which the Government require of us all as loyal subjects of Her Majesty the Queen Empress. The Viceroy ordains the Indian people to look at the law in the most humble manner. His Excellency's remarks we hasten to publish in the telegraphic summary which is now at hand:—

"His Excellency said the mass of criticism, hostile and otherwise, with which the measure had been greeted, had been most patiently considered, and he was glad to find the Government were so much in accord with those who critisised it, since the points in dispute related almost entirely to the meaning of the expressions used. The Government had not taken up any domineering attitude, and had been ready patiently to listen to objections, but the responsibility of the framing of the law must remain with the Go—vernment, which also had the power Hence it has been necessary beyond certain point to resist alteration in the proposals. In conclusion Lord Elgin hoped that when the heat of moment has passed all ranks will unite in giving the measure a fair trial."

---

Lord Sandhurst presided at the last Convocation of the Bombay University on Tuesday last. As Chancellor His Excellency delivered able address on the utility of University education. The aim and object of the higher education are set in a clear and eloquent language which we are almost apt to quote. Lord Sandhurst proceeds to remark thus:—

"What we do expect, or at least what, if our educational system is what it should be, we have a right to expect, is that its most finished product should be a man of trained intelligence and formed character, ready to undertake any duty which his position and work in life may impose upon him. The education which we set before us as an ideal should be "regular," that is, systematic and well ordered; and "liberal," *i. e*, such as to fit its recipients for the citizenship of a civilized community. In order that it may be systematic it must be directed by experienced teachers, and its various stages must be so co ordinated that the pupil may pass through the whole course without repetition or waste of power. If, again, the education we give is to be "liberal" in the sense I have already explained we must provide for the training of the character as well as of the intellect. For the will requires discipline no less than the mind, and the development of the intellect without strengthening of the character is more dangerous than ignorance itself. This general training of the whole man is the discipline that our educational system has to aim at and it includes far more than keeping order in the school room. Life in a civilized society requires an amount of self control and self—denial which, we do not recognize only because they have become habitual, and if we are to train up the young to be good citizens we must exercise them also in the practice of these virtues. No successful system of education has neglected or can afford to neglect such training. Under the ancient Hindu system the young Brahmin had to undergo a severe and long continued discipline of the mind before he was permitted to enter upon the duties of secular life. Some of us may think that system expected too much of ordinary human nature. But the ideal it set before itself with its reverence for the aged, its rules of self—denial, and its minutely pre-scribed duties, shows at least that to the men who established it education meant more than the imparting of knowledge. But, if discipline and restraint are necessary even when the social and the intellectual impulses are in harmony and not in conflict, they are more especially needed where the young scholar is exposed to the influence of two divergent civiliza-tions. The new learning of the West may act either as a stimulant or as a poison; it may either broaden and deepen the mind and the character, or it may dissolve the old beliefs and the old morality without creating any thing in their place."

However we do not well understand the full significance of his remarks about politics as a subject for students. Politics should be a forbidden fruits according to the Chancellor. We do not subscribe to such a theory. Students should not dabble with politics. This fact we shall admit but that they should admit all side lights to prepare their next scheme of future life is equally welcome to us. But the latter phase of education should neither be denied to students as well as to their teachers.

---

## वऱ्हाड

हवामान—अंगाला झोंबणारा गार वारा अतिशय सुटतो. किरकोळ दुखणीं जोरावर आहेत. पाण्याची कमताई सर्व प्रांतभर झाली आहे.

मे. आबर्ड साहेब ज्युडिशीअल कमिशनर हे गेल्या बुधवारीं आपलें कामाचा चार्ज देऊन उमरावतीहून मेलगाडीनें मुंबईस रवाना झाले त्यांची रजा १ महिना २० दिवसांची आहे आणि या थोड्या मुदतींतच ते विलायतची सफर करून येणार आहेत.

मे फ्रीडो साहेब यांनीं अफू, गांजा, व शिंदी यांच्या अबकारी मक्त्याचा हरास गेल्या गुरुवारीं केला आणि कामाचा चार्ज मे. हेअर साहेब बहादूर यांस दिला.

डायरेक्टर आफ लांड रेकार्डस मि. फ्रान्सिस हे रजेवरून परत येऊन आपल्या कामीं दाखल झाले आणि क्याप्टन ग्यारेट साहेब रजेवर जात आहेत ह्मणून त्यांच्या सन्मानार्थ त्यांस गेल्या शुक्रवारीं येथील टौनहालांत पानसुपारी देण्यांत आली.

रा. रा. रामचंद्र अंबादास नायब तहशीलदार, मंगरूळ पीर, यांची बदली खामगांवास होऊन तेथील ना. तहशीलदार रा. रा. विठ्ठल सदाशिव करकरे यांस मंगरूळपीरास बदललें.

---

### NOTICE

The annual fair at Warha Taluk Kelapur Wun District held at end of February will not take place this year.

16th February 1898 Yeotmal } (Sd.) F. R. Mauduit ofig. Deputy Commissioner Wun District.

---

### नोटीस

रा. रा. अमृता वल्लद लक्ष्मण राहणार दिवठाणें ता० आकोट आणि महमदबेग राहणार आकोट यांस.

माझ्या मालकीचें आणि माझ्या ताब्यांतलें शेत मौजे दिवठाणें ( तालुके आकोट ) येथील सर्व्हे नंबर ४ पैकीं यांत सन १८९६ च्या उन्हाळ्यांत तुह्मी येऊन आंब्या संबंधानें दाडगाई केली. त्या बाबदींत फौजदारी काम चालून महमदबेग यास दंड झाला आहे गुदस्ता आंब्याला मोहर नव्हता. यंदा तुह्मी किंवा तुमच्या वतीनें कोणी इसम आंब्या संबंधानें माझ्या शेतांत येऊं नये. माझ्या शेतांतील आंबराईसुद्धा सर्व शेतावर कोणाची ही मालकी नाहीं. या नोटीशी नंतर तुह्मी याल तर तुह्मावर फौजदारी केली जाईल. तुमची कांहीं तक्रार असल्यास तुह्मास दिवाणी कोर्ट खुलें आहे. पुढें फौजदारीचा प्रकार होऊं नये ह्मणून या जाहिर लेखानें तुह्मास कळविलें आहे तारीख १९ फेब्रवारी सन १८९८ इसवी.

सही
ईश्वरसिंग फत्तेसिंग दस्तूर खुद्द.
वर्तमानसार.

आमच्या लढाईच्या खर्चाचा दुसरा हप्ता लांबणीवर टाकण्यास आह्मी तयार नाहीं असें जपाननें चीनला कळविलें आहे.

चीनचें कोणतेंही बंदर आह्मी घेतलें तरी तें व्यापारास सर्वांस खुलें राहील असें रशियाचें सांगणें आहे.

गेल्या लढाईबद्दल लढाईच्या खर्चाची रक्कम ह्मणून जी रक्कम ग्रीसनें टर्कीस देण्याचें ठरलें त्या रकमेची हमी घेण्याचें इंग्लंड, फ्रान्स व रशिया यानीं कबूल केलें आहे.

निझामाच्या राज्यांत दुष्ट प्लेग रोगाचा शिरकाव झाला. बेदर जिल्ह्यांत कासासारसी गांवांत दोन केसी झाल्या. साटटी गावांत २३ लागून २० मेले. काशी गावांत ३९ लागून १७ मेले. धोत्रीं गावांत ९९ लागून ४८ मेले. दार्लीगांव येथें १९ लागून १४ मेले. हीं सर्व गावें निजामाच्या राज्यांतलीं असून अगदी सरहद्दीवर आहेत.

गंगोत्री व उमरत्री हीं दोन गांवें सर कुर्शेदजा यांच्या ताब्यांत असून त्यांत अनुक्रमें १२९ व १९० केसी झाल्या. हल्लीं रोज दहा मरत आहेत. या रोगाचा आपल्या राज्यांत जास्त फैलाव होऊं नये ह्मणून निजामाचे डाक्तर व कामदार फार मेहनत घेत आहेत.

भुसावळ व इंदूर इकडून येणाऱ्या रेल्वे उतारूंची तपासणी खांडव्यास होत असत्ये. एका काळ्या पलटणीतील शिपायांचीं मुलें माणसें मागच्या आठवड्यांत इंदुराहून पुण्यास जातांना खांडव्यास आली. रीती प्रमाणें प्लेग डाक्तर तपासणीस गेले. इतक्यांत बायकांची तपासणी करूं देणार नाहीं असें एका सुभेदारानें बजावलें. प्लेग आफिसर व सुभेदार यांचे कांहीं भाषण झालें. व शेवटीं सुभेदारानें आपल्या लोकांस नागव्या तरवारी हातांत घेऊन आपल्या सर्व डब्यांच्या दारांत उभे केलें. अर्थात डाक्तर व पोलीस यांचा नाईलाज झाला. गोष्ट मुख्य दाक्तरास कळली. लोक निमचहून आलेले असल्या कारणानें तपासण्याचें कारण नाहीं असें मुख्य डाक्तरानें ठरवून निकाल केला, असें खांडव्याच्या पत्रांत लिहिलें आहे.

हिंदुस्थानांतून विलायतेस नेलेल्या एका हत्तीचा इतिहास फार मजेचा असल्यावरून तो इंग्लिश पत्रावरून आह्मी आपल्या वाचकांस कळवितो. प्रिन्स आफ वेल्स साहेबांची स्वारी हिंदुस्थानांत आली होती त्यावेळेस त्यांस बसून फिरण्याकरितां हा हत्ती शृंगारून तयार केलेला होता. पुढें त्या हत्तीनें प्रिन्स आफ वेल्स साहेबांची नोकरी उत्तम रितीनें बजाविल्यावरून साहेब बहादूर त्यावर प्रसन्न झाले आणि त्यांनीं तो हत्ती विलायतेस आपल्या बरोबर नेला या हत्तीचें वय हल्लीं साठ वर्षांवर झालें आहे, आणि प्राणिशास्त्रवेत्ते लोकांचें लक्ष त्याकडे वळलें आहे. हा हत्ती त्याच्या जातीच्या उत्तम कुळापैकीं असून यानें हल्लीं शिक्षणपद्धतीनें असंख्य लोकोत्तर गुण संपादन केले आहेत, त्याचे दांत सांप्रत ४ फूट लांबीचे आहेत व त्याच्या शेवटास पितळेचीं टोपणें अखेरीर वजनाचीं बसविलीं आहेत. जरी तो आपल्या दातांनीं कोणास इजा करणार नाहीं अशी खातरी झाली आहे, तथापि सांप्रत शोभेकरितां तीं ठेविलीं आहेत. या हत्तीच माहूत थानिओ नांवाचा हिंदु होता, आणि कांहीं कारणानें त्यास बडतर्फ केल्यावरून त्या हत्तीनें चारापाणी वर्ज केलें. शेवटीं हत्ती मरतो असें प्रिन्स साहेबांस वाटल्यावरून त्यांनीं त्या माहूताची समजूत करून पुनः नोकरीवर बोलाविलें. थानिओस पहातां बरोबर हत्ती चारा खाऊं लागला. व आनंदयुक्त राहूं लागला. एके दिवशीं तो हत्ती दोर तोडून मोकळा झाला होता, आणि अत्यंत मस्ती करूं लागला. जवळच्या एका बवर्जीखान्याचा सत्यानास केला व कोणास मानीना. शेवटी थानिओ बाहेर गेला होता तो आला आणि त्यानें त्याची सोंड धरून ओढीत त्यास तबेल्यांत नेलें. त्यांच्या अंकित तो इतका झाला आहे कीं, आईबापांच्या अंकित त्यांचा पुत्रही राहत नाहीं. अशी हत्तीची कृतज्ञता पाहून प्रिन्स साहेब व इतर युरोपांतील लोक फार आश्चर्य पावले.

पेशावर येथील दवाखान्यांत मुरदे चीरफाड करण्याकरितां कोठून आले होते एका मुर्दास चिरण्याच्या प्रसंगीं जणूं काय तो घाबरलाच आहे असा भास होऊन तो खडबडून उठला आणि माझी चिरफाड करूं नका असें बोलला. हल्लीं तो मनुष्य खूप धट्टा कट्टा झाला आहे असें ह्मणतात.

कसबे महंदाधबाद जिल्हा सितापूर या ठिकाणीं लालासाहेब नांवाच्या एका गृहस्थाजवळ एक घोडें आहे. तें घोडें असें विचित्र आहे कीं, त्यास घोडा किंवा घोडी असें कांहींच ह्मणता येत नाहीं. त्या घोड्यास घोडीचे आणि घोड्याचें अशी दोन्हीही इंद्रियें असून ते दिवसा नर जातीच्या इंद्रियानें मूत्रत्याग करिते आणि रात्रीच्या समयीं स्त्री जातीच्या इंद्रियानें मूत्र सोडिते. हें घोडे पाहण्याकरितां पुष्कळ लोक दररोज जमतात. व हें त्या लालासाहेबाजवळ ४ वर्षांपासून आहे. हें दिसण्यांत छानदार असून चालण्यांतही अति उत्तम आहे.

लाहोर या ठिकाणीं मागें एक वेळ एका साधूनें आपली जीभ कापून एका देवीस अर्पण केली होती, व देवीनें त्या साधूवर दया करून त्याची जीभ जशीच्या तशी दोन तीन दिवसांत करून दिली होती. त्यावरून त्यानंतर कित्येक लोक आपल्या जिभी कापून देवीस अर्पण करूं लागले आहेत परंतु कोणाचीही जीभ पुन्हा येत नाहीं असा अनुभव आला आहे. असें असून ईश्वरी प्रसाद नांवाच्या एका दुकानदारानें आपली जीभ कापून देवीस अर्पण केली. ठा० अ०

फार मोठा टोळांचा थवाः— गेल्या तारीख ३ जानेवारी रोजीं दामादिन ह्या भागांत पूर्वीं कधींही कोणी कोठें पाहिला नाहीं अथवा ऐकिला नाहीं, असा २० मैल लांबीचा टोळांचा थवा गेला. ह्या थव्यानें तो सर्व प्रांत अगदीं आच्छादून टाकला होता. ही धाद पुढें कोठें गेली आणि तिणें काय काय नाश केला तें समजलें नाहीं.

भयंकर दुष्काळः— केप कॉलनी (दक्षिण आफ्रिका) येथें हल्लीं मोठा दुष्काळ पडला असून असा दुष्काळ त्या भागात ह्या पूर्वीं दुष्काळ पडल्याचें कोणास आठवत नाहीं. लोकांच्या जवळची धान्यसामग्री संपत चालली, आणि ह्या पुढें अतिशय कठीण प्रसंग ओढवणार व सर्वत्र उध्वस्त होणार अशी शेतकरी लोकांस भीति वाटत आहे. तिकडचे मूळचे रहिवासी सिद्धी लोक तर निखालस उपाशी मरूं लागले आहेत.

लाहोराकडे आगगाड्या चालू असतां मध्येंच चोरटे त्यांवर चढून उतारूंचा मोलवान माल लुटतात असें ह्मणतात. अशा एका चोरट्यास नुकतेच पोलिसांनीं पकडलें आहे. त्यानें एका मडमेच्या डब्यांत जाऊन तिची ब्याग जबरीनें हातांतून हिसकावून घेतली. तींत हजार रुपयांचा ऐवज होता त्या मडम बाईनें या चोरास ओळखलें. दी. बं.

कलकत्त्यास एल्जिन कॉलेज या नांवाचें विद्यालय लौकरच सुरू होणार आहे. यांत जे विद्यार्थी घ्यावयाचे ते सर्व राजे, महाराज, बडेबडे जमीनदार व सरदार यांचे मुलगे असून त्यांनीं बोर्डस या नात्यानें सदोदित कालेजांत राहिलें पाहिजे. अभ्यास लंडन युनिव्हर्सिटीच्या पद्धतीवर चालेल. ने ना. लार्ड एल्जिन यांनीं या विद्यालयाचे अध्यक्ष होण्याचे कबूल केलें असून सर ऍलेक्झांडर मॅकेंझी बंगालचे लेफ्टनंट गव्हरनर हे उपाध्यक्ष होणार आहेत ही योजना काढणारांत कुचबिहारचे महाराज, दरभंग्याचे महाराज, महाराजा सर जोतींद्र मोहन टागोर; महाराजा सूर्यकांत आचार्य बहादूर ताजा प्यारी मोहन मुकरजी, वगैरे बडीबडी मंडळी आहेत. या नवीन संस्थेच्या योगानें बंगाल्यांतील लक्ष्मीपुत्र मंडळी विद्याभूषित होऊन देशसेवेकरितां तयार होवोत असें आह्मी इच्छितो.

√ आज बरेंच दिवस हैद्राबादच्या निजामासंबंधानें कुवार्ता बाहेर येत आहेत. नवाब साहेबांच्या तिजोरीची स्थिति वाईट असून एकंदर राज्यकारभार त्यांच्या हातून बरोबर निभत नाहीं अशी रेसिडेंट मि. फ्लोडन यांची तकरार आहे. मि. फ्लौडन हे हल्लीं कलकत्यास व्हाइसरॉय साहेबांशीं कांहीं खलबतें करण्यांत गुंतले असल्यामुळें हैद्राबादे संबंधानें लोकांस विशेष काळजी वाटूं लागावी हें साहजिक आहे. खुद्द निजाम साहेबांचें ह्मणणें असें आहे कीं, रेसिडेंटाच्या वशील्यानें अधिकारापन्न झालेले आपले प्रधान राज्यकारभारांत आपलें कांहींएक चालू देत नाहींत, व मनसोक्त व्यवस्था ठेवतात, यामुळें कारभारांत सर्वत्र घोटाळा माजला आहे; व तो नाहींसा करण्यास हल्लींच्या प्रधानजीस स्वस्थ घरीं बसण्यास सांगून आपणावर धनीपणा न गाजविणारा मनुष्य कारभारी नेमला पाहिजे. रेसिडेंट साहेबांस आपल्या मनुष्यास रजा मिळालेली पाहवणार नाहीं; व त्यांच्या कृपेतल्या गृहस्थास कारभार नीट चालवतां येत नाहीं. अशा स्थितींत राज्याचें नफानुकसान मतांत आणून वरिष्ठ सरकारानें पोक्त विचारानें निजाम साहेबांस त्यांच्या मर्जीप्रमाणें व्यवस्था करण्याची परवानगी द्यावी हें रास्त आहे. निजामासारख्या अव्वल दर्जाच्या संस्थानिकांस आपली मुख्य प्रधानकी आपल्या विश्वासाच्या लायक मनुष्यास देण्याचा अधिकार असणें अवश्य आहे. निजामसाहेब गादीचे मालक असून राज्य व्यवस्थेबद्दल जरे जबाबदार आहेत, तर त्यांच्या कह्यांत न राहणारा मनुष्य त्यांच्या हाताखालीं प्रधानकीसारख्या महत्वाच्या जागीं देणें ह्मणजे त्यांजवर जुलूम करून त्यांच्या प्रजेचें अहित करणें होय. या गोष्टीचा हिंदुस्थान सरकार नीट विचार करतील आणि निजामावर व त्यांच्या प्रजेवर एकतर्फी न्याय करून जुलूम करणार नाहीं, अशी आह्मी आशा करितों.

टिकिटें बंद—चालू जानेवारी आणि येत्या फेब्रुवारी ह्या दोन महिन्यांत उत्तर हिंदुस्थानांतील कोणत्याही क्षेत्रीं मुंबई इलाख्यांतील लोक यात्रार्थ जाऊं नयेत असा मुंबई सरकारचा हुकूम फिरला असून, ह्या इलाख्यांतील कोणत्याही रेल्वेवरून अयोध्या, फैजाबाद, अलाहाबाद, मथुरा, वृंदावन, काशी, मोगलसराई, विंध्याचल, मिर्झापूर, व हरिद्वार ह्या ठिकाणीं टिकिटे मुळींच काढूं नयेत असे ठराव प्रसिद्ध झाले आहेत. ह्या इलाख्यांत जो प्लेग पसरला आहे त्याचा प्रसार जास्त वाढूं नये ह्याकरितां सरकारचा हा यत्न आहे हें उघड आहे.

गतवर्षीं फ्रान्समध्यें एका प्रदर्शनांत एक खिशांतील घड्याळ (वॉच) दाखविण्यांत आलें होतें. त्या घड्याळाला तास, मिनिटें किंवा सेकंड दाखविणारे कांटे अथवा आंकडे दाखविणारें तकट वगैरे कांहींच नव्हतें. त्याला एक टांचणी ठेविली होती, ती दाखविली ह्मणजे त्याच्या आंत ठेविलेल्या चिमुकल्या फोनोग्राफ यंत्राकडून त्यावेळीं किती वाजून किती मिनिटें व सेकंड झालीं तें सांगण्यांत येत असे. युरोपियन कौशल्याचें करावें तितकें कौतुक थोडेंच होणार आहे. स० वि०

हें सरहद्द प्रकरण तिकडील लढाई लवकर संपून आटपेल असें वाटत होतें, जनरल सर लाकहार्ट साहेब विलायतेस जाण्यास निघाले होते, परंतु गेल्या आठवड्यांत आफ्रिडी लोकांनीं तिकडे जी गडबड चालविली आहे तिचें स्वरूप जरा भयंकरसें वाटल्यावरून त्यानीं तो बेत रहित करून पुनः सरहद्दीकडे मोर्चा फिरविला आहे. नुकत्याच झालेल्या चकमकींत आफ्रिडी लोकांनीं आम या सरकारच्या सैन्यापैकीं पांच सहा अंमलदार व पन्नास साठ सोल्जर मारले असें कळतें. ही लढाई चालू असतांच बलुचिस्थान व इराण या मधील मेक्रान नामक किनाऱ्यावर पहाडी लोकांनीं गडबड चालविली आहे. या लोकांचा पुढारी एक बलुची सरदार आहे व तो आमच्या सरकाराबरोबर सामना करण्यासाठीं लोक जमवीत असून त्यास आणखी कित्येक बलुची सरदार येऊन मिळत आहेत असें ही बाहेर आलें आहे. यावरून हें सरहद्द प्रकरण लवकर मिटण्याचा रंग मुळींच दिसत नाहीं. या लढाईत आमच्या सरकारचें किती सैन्य जाया होणार व हिंदुस्थानच्या खजिन्यांतील किती थैल्या रित्या होणार याचा कांहींच अदमास लागत नाहीं. तूर्त हिंदुस्थानच्या सर्व बाजूंनें संकटें आणून परमेश्वर छल करीत आहे एवढें खरें. शु० सू०

---

☞ हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाससमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

साल अखेर „ ७ „ १ ८८
किरकोळ अंकास ........................८४

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस........८१ ०६
दुसरे खेपेस .... ........८१

Six monthly......... 3 .............. 8 as
Single copy ............................ 4as

Advertisemen
Below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ......4 as
Repetition Per line...3 as

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

VOL XXXII — AKOLA MONDAY 28 FEBRUARY 1898 — NO 9

वर्ष ३२ — आकोला सोमवार तारीख २८ माहे फेब्रुवारी सन १८९८ इ० — अंक ९

## जाहिरात.

जादू ! जादू !! जादू !!!

फक्त १। रुपयांत १२ खेळ करून मित्र मंडळीस खुषी करा!!

अल्पमोलि व बहु गुणी अपूर्व करामत!

प्रो. जी. एम्. कार्लेकर कृत.

भानामती तंत्र!!!

खासगी कुटुंबांत, मित्र मंडळींत व हरएक प्रसंगीं अद्भूत जादूचे खेळ करावयास हें पुस्तक फारच उपयोगीं आहे. शाकी व गुणग्राही लोकांकरिता हें फक्त दोन पुण्याचें तंत्र आह्मी मुद्दाम खास रीतीनें तयार केलें आहे. यावर पुढील प्रमाणें खेळ होतात. १ कोणाच्याही हातें यांत गंजिफाचा ठेवलेला पत्ता गुप्त होतो व पुनः येतो. २ यांत ठेवलेला पत्ता एकास दिसतो व दुसऱ्यास दिसत नाहीं. ३ पत्ता फाडून त्याचे तुकडे यांत ठेविलें असतां तोच पत्ता अखा होतो. ४ ज्या पत्याची जाळून राख यांत टाकावी तोच पत्ता पुनः अखा होतो. ५ दुसऱ्याच्या हातून ठेवलेले पान गुप्त होंते. ६ सर्वां समक्ष ठेवलेला पत्ता एकास एका जातीचा व दुसऱ्यास दुसरे जातीचा दिसतो. ७ यांत दुसऱ्याच्या हातून ठेवलेला रुपया गुप्त होतो व पुनः येतो. ८ यांत ठेवलेला रुपया एकास दिसतो व दुसऱ्यास दिसत नाहीं. ९ यांत पैसा ठेविला असतां तात्काळ त्याचा रुपया होतो. १० चवली, पावलीचा तात्काळ रुपया होतो. ११ एकाला रुपया दिसतो व दुसऱ्यास तोच पैसा दिसतो १२ कोणच्याही सहीची चिठ्ठी यांत ठेविली असतां गुप्त होते ती दुसऱ्या ठिकाणाहून काढणें, या प्रमाणें मनुष्यांची अक्कल गुंग करून सोडणारें फारच अद्भुत व आश्चर्यकारक नजरबंदीचे १२ खेळ या एकाच तंत्रावर कोणीही मनुष्यास सहज व तावडतोब करतां येतात! हे सर्व खेळ खरेच अनुभवसिद्ध आहेत. सबब या वस्तुपासून वरील खेळ न झाल्यास आह्मी दुप्पट पैसे भरून देऊ. हें केवळ छापील पुस्तक नव्हे तर खेळ करण्याची एक तयार वस्तु आहे यावर होणारे वरील खेळ कसकसे करावे त्याच्या माहितीचे पुस्तक सोबत निराळें देण्यांत येते. याची किंमत या मार्च अखेर पर्यंत घेणारांस मात्र फक्त १। (सवा) रुपया. बाहेर गांवीं व्ही. पी. टपालसह १।≈ आणे. या मुदती नंतर याची शिल्लक राहिल्यास २ रुपये किंमत पडेल. या शिवाय अनेक प्रकारच्या जादूच्या खेळाचे तयार सामान आह्माकडे विकत मिळते. त्याचा मोठा सचित्र क्याटलाग ४ आणे किंमतीस आह्माकडे मिळतो. वरील तंत्र खालील पत्यावर विक्रीस तयार आहे.

नारायण गोविंदजी आणि कंपनी
जादूच्या खेळाचे तयार सामान व
पुस्तके विकणार.

पत्ता—माधवबाग पांजरापोळच्या १ ल्य गल्लीचा नाका कोळशेवाल्याचे दुकानावरील माडी गिरगांव पोष्ट, मुंबई.

## नोटीस

रा. रा. गंगाराम वल्लद धनाजी ह्माली रहाणार वडगांव ता० इलिचपूर जि० इलिचपूर यांसः—

नोटीस देणार गिरजी मर्द गंगाराम ह्माली राहणार काटल ता० जळगांव जिल्हा अकोले नोटिशीनें असें कळविते कीं तूं माझा लग्नाचा नवरा असून आज सुमारें १० दहा वर्षे होत आलीं मजला तुह्मी मोहरपणा करितां ४ दिवस पोहोंचती केली. तेव्हां पासून सुरू आज पावेतों मी माहेरीच आहे या अवकाशांत तुह्मी मधेच येऊन माझ्या आंगावरील डागिनें— गुंडाळे पायातले, कोपरवाळ्या, हातची पोलट, अशी डागिनें घेऊन गेला. त्या वेळे पासून माझ्या पोटा पाण्याची ह्या वेळ पावेतो कोणच्याही प्रकारची वेवस्था नाहीं माझ्या आई बापानी तरास केला व त्यास असें पक्के समजून आले कीं तू इतर जातीची अवरत जवळ ठेऊन घेऊन प्रपंच संसार करीत आहे. याजकरितां तू मजला आक्षयींची काढून टाकलीस त्या वेळपासून मी माझ्या पोटापाण्या करिता कांहीं मजुरी करणें व कांहीं कर्ज काढून अशा प्रकारानें मी माझा निर्वाह करित आहे. आता माझे हातून मजुरी होत नाहीं व माझे आईबाप मजला पोटास घालण्यास जितके असावे तितके ताकददार नाहींत. मजला आता कर्जही मिळत नाहीं व मजुरीही होत नाहीं व आईबाप पोटासही घालीत नाहीं व तुझा पत्ताही नाहीं. याजकरिता ह्या नोटीशिनें असें कळवितें कीं नोटीस दिल्या पासून पंधरा दिवसाचे आंत आजपावेतो कर्ज काढून खालेले रुपये ३०० तीनशे व मजला तू तर पुढें चांगली वागवितील याजबद्दल पंचाची खात्री करून देऊन मजला घेऊन जावे. असे न केल्यास मी हीच सोडचिठ्ठी तुझी समजून दुसरा घरठाव करीन. मग तुझा कोणचेही प्रकारचा नवरेपणाचा हक्क राहिला नाहीं. हे तुजला अगोदर कळविले आहे. ह्मणून दिली नोटीस सही तारीख २२।२।९८ इसवी.

सही
सहीची निशाणी बांगडी गिर्जी मर्द गंगाराम म्हालीन
निशाणी खुद्द.

## जाहिरात.

सर्वत्र लोकांस व जातभाई सर्वांच वगैरे यांसः—

असें जाहिर करीते कीं माझा नवरा गंगाराम वल्लद धनाजी ह्माली राहणार वडगांव तालुके व जिल्हे एलिचपूर हा आज सुमारें १० दाहा वर्षे जाहलीं बेपत्यामध्यें आहे. जर याचा कोणी बरोबर ठाव ठिकाण १५ पंधरा दिवसाचे आंत लाऊन देईल तर त्यास पांच रुपये इनाम देईन.

सदरहू मुदतींत त्याचा बरोबर ठाव ठिकाण नाहीं लागला तर माझा जन्म वाया जात आहे याजकरितां मी दुसरा घरठाव चाली रिती प्रमाणें करीन. हे आगोदर सर्वांस ह्या जाहिरातीनें कळविलें आहे ह्मणून दिली जाहिरात ता. २२।२।९८ इसवी.

सही.
सहीची निशानी बांगडी गिरजी
मर्द गंगाराम ह्मालीन निशानी
हातची बांगडी खुद्द.

## नोटीस

रा. रा. गणपत वल्लद चहादू कुणबी शेळके निसबत तहशील कचेरी राहणार खामगांव यांस नोटीस देणार पुंजी मर्द गणपत राहणार खामगांव नोटीशीनें असे कळविते कीं मी तुमची लग्नाची बायको असून घरांत तुमची आई गंगाबाई व तुमची आजी सकारबाई व तुमचा मामा नामे दामू वल्लद रामजी ह्मसके असे एकंदर एका घरात राहत असून दामू हा नेहमी निषा घेत असतो व तुमची आई व आजी विनाकारण खोटे कुभांड रचून मारहाण व शिवीगाळ करून विनाकारण त्रास देत असतात हें सर्व तुह्माला माहीत आहे. यावरून आपण दुसरें घर घेण्यात व तिथे वेगळे राहण्यास नेहमी सांगते परंतु अद्यापपर्यंत कांहीं बंदोबस्त झाला नाहीं. मी आईंचे घरीं कोठपर्यंत राहावे? तरी ही नोटीस पावल्या पासून एका आठवड्याचे आंत वेगळे घराचा व माझे अन्नवस्त्राचा बंदोबस्त करून मजला घेऊन जावे अगर याप्रमाणें तुह्माकडून होत नसल्यास मजला दुसरे घरठाव करण्यास परवानगी द्यावी. नंतर आपला कोणतेही प्रकारचा मजवर हक्क संबंध राहणार नाहीं. कळावे ता. २३।२।९८.

सही
सहीची निशाणी बांगडी पुंजी मर्द गणपत शेळके राहणार खामगांव ठिकाणा
दोबाड वेस.

## नोटीस

रामदत्त किसनदयाळ या नांवच्या दुकानचे मालक रा. रा. किसन दयाळ रहाणार अकोट यांसः—

तुह्मास या नोटिशीनें कळविण्यांत येते कीं तुह्माकडे आमची धरवर रुपये ३८६ची होती. त्या पैकीं आह्मी १८६ रुपये मागून नेले. बाकीचे २०० रुपये रा. रा. गबुसिंग जमादार, अकोट यांच्या कडे जमा करावे. हे रुपये नोटीस पोचल्या तारखे पासून ३ दिवसांचे आंत पोचते करावे. तसे न होईल तर तुह्मास दरमहा दर शेकडा २ रुपये प्रमाणें व्याज द्यावें लागेल. कळावें तारीख २३।२।९८ इ०

( सही )
व्यंकटसिंग लोकमनसिंग अकोटकर.
आत्मारामसिंग वल्लद केशरसिंग
अकोटकर द० खु०

## नोटीस.

रा० रा० जयनारायण मारवाडी राहणार पातुरनंदापूर तालुके अकोले व जिल्हे अकोले यांसः—

नोटीस देणार गणपती वल्लद व्यंकटी पाटील राहाणार पातुरनंदापूर तालुके व जिल्हे अकोले यांजकडून.

नोटीसीनें असें कळविते कीं तुमचे आह्मी कर्ज देणें दस्ताऐवज ३ तीन व खातेवर एक सही असे मिळून तुमचे एकंदर व्याजासुद्धां सर्व प्रकारचा हिशेब होऊन तुमचे नक्की देणें ठरलें ते रुपये (२००) दोनशे. या दोनशे रुपयाबद्दल तुह्मी माझ्या दोन शेतांचा वायदा सरकार देणें रुपये १०० शंभर हे व सदरील लिहिलेले तुमचे कर्ज हे सर्व भरून पावल्याबद्दल व सरकारच्या दोन्ही शेताच्या रुपयाबद्दल पावती व माझे सदरील लिहिलेल्या कर्जाबद्दलचे तीन दस्ताऐवज व खातेबाकीबद्दल सर्व भरपाई कायदेशीर करून देण्याचे ठरून माझ्या शेतातीस माल तुह्मी नेला तो खालीं लिहिल्या प्रमाणें;—

जवारी खंडी ४ चार व कापूस खंडी ४ चार असा माल अदमासे रुपये किंमत ३०० तीनशे सवातीनशेचा नेऊन सदरील लिहिलेल्या करारा प्रमाणें आज पावेतो तुह्मी सदरील लिहिल्या प्रमाणें सरकारचा मजबद्दलचा शेतसारा ही भरला नाहीं व माझे दस्तैवजही मजला परत दिला नाहीं व खातेबाकी व सदरील दस्तैवज या सर्वांबद्दल रीतशीर ठरल्या प्रमाणें पावती देण्याचे एकीकडे ठेऊन मन पासून सदरील लिहिलेला माल तुह्मी उडान खात्यावर जमा केला आहे. याजवरून व ठरल्याप्रमाणें तुह्मी निकालाची पावती देत नाहीं ह्मणून वगैरे कारणामुळें तुमच्या मनांत कपट आहे हे उघड दिसतें. याज करितां तुह्मांस या नोटिशीनें असें कळविते कीं तुह्मी पुढें मागें सरकारात फिर्याद वगैरे केल्यास मी कोणच्याही प्रकारचा जबाबदार नाहीं व तुमचे जवळ माझे जे दस्तैवज व उडान खाते याजवर माझ्या नांवें जी कांहीं रकम असेल ती पोकळ आहे. मी तुमची फुटकी कवडी सुद्धा देणें नाहीं.

तुह्मी मजपासून ता० १४ फेब्रुवारी सन १८९८ इ० एक पावती ह्मणून ५जपासून ३५० रुपयाचा एक कागद साधे कागदावर पावतीचे टिकिट लावून घेतला आहे. याजबद्दल तुह्मी मजला निखालस बुडवून टाकणार हे उघड दिसते मजला लिहितां वाचतां कांहीं येत नाहीं. मी शेतीचा

मनुष्य आहे. हे सर्व कृत्य दगलबाजीचें आहे. हें तुह्मांस या नोटिशीनें अगोदरच कळविले आहे.

माझ्या सेताबदलचे सरकारचा पैसा तुह्मी देणेचा सदरील लिहिल्या प्रमाणे जर तुह्मी सरकारांत दिल्हा नाहीं व मजला त्याजबद्दल सरकारचे मागणें वगैरे झाल्यास सर्व प्रकारचे जबाबदार तुह्मास धरून रीतीप्रमाणें तुह्मावर कलम चालवून अखेर निकाल होई तो पर्यंत सर्व कोर्ट खर्च व ह्या नोटीसीचा खर्च व माझे जे दिवस ह्या कामाचा निकाल लागल्यास खर्च होतील वगैरे सर्व प्रकारची नुकसानी तुह्मापासून रीतशीर भरून घेतली जाईल. ह्मणून दिली नोटीस सही तारीख २३।२।९८ इसवी.

सही

सहीची निशाणी वखर गणपती वलद व्यंकटी पाटील पातूर नंदापूरकर निशाणी खुद्द हातची.

---

नोटीस.

मेहरबान फरीदखा वलद बनेखा मुसलमान राहणार पिंपळखुट तालुके बाळापूर जिल्हें अकोला. यांस:-

खाली सही करणार इजकडून या नोटीसीनें असें कळविले जातें कीं माझे लग्न तुमसी झाले त्यास सुमारे ९ वर्षे झालीं. या आवकाशांत माझे सासर माहेर असें काय ते तीन वेळां तीन महिने तुह्मी केले. तुह्मी मज खेरीज दुसऱ्या अवरती बरोबर मोहतीर केलांत आणि बिनाकारण मजला त्यावेळा पासून मजला दूर केले. नंतर मी आपल्या आई बापाचे घरीं येऊन राहिले. मी आपल्यास या नऊ वर्षाच्या आवकाशांत पांच चार वेळां चांगले संभावित जातभाई पंच आपल्याकडे पाठवून मजला घेऊन जावे व संसार करावा असें बहुत प्रकारानें सांगितले परंतु ते सर्व व्यर्थ झाले. मी संसार करावा. हे माझे दिवस व्यर्थ जात आहेत. तुह्मी माझ्या पोटापाण्याची वगैरे आजपावेतो कांहींएक तजवीज केली नाहीं. व माझ्यावरील नवेरपणाचा हक्कही सोडला नाहीं. मी आजपावेतो तुमच्या नांवावर सावकारा पासून कर्ज काढून पोटास दरमाहा तीन रुपये प्रमाणें नव वर्षाचे ३२४ रुपये झाले. हे देऊन व चालू दिवसा पासून माझ्या पोटगीचा बंदोबस्त करावा, व चार जातभाई पंच यांची व माझी अशी खात्री करून द्यावी कीं चार जातभाई संभावीत गृहस्था प्रमाणें मजला घेऊन संसार कराल व जिवाभावास कांहीं दखल देणार नाही अशी खात्री करून देऊन मजला घेऊन जावें. मी येण्यास एकपायावर तयार आहे. असें न झाल्यास मी सरकारांत चालू पोटगी करितां व आजपावेतो झालेली खावटी याजबद्दल दावा करीन. आणि या नोटिसीच्या खर्चासह सर्व नुकसान भरून घेईन. नोटीस पावल्यापासून आठ दिवसाचे आंत सदरील लिहिलेल्या गोष्टीचा काय तो अखेर निकाल करावा. असें न झाल्यास तुह्मास माझी जरूर नाहीं असें पक्के समजून मी चाली रिती प्रमाणें दुसरा घरठाव करीन मग तुमचा नवेरपणाचा हक्क कोणयाही प्रकारे मजवर राहणार नाही. हे तुह्मास कळावें. ह्मणून दिली नोटीस सही. तारीख २७ माहे फेब्रुवारी सन १८९८ इ०]

[ सही ]

सहीची निशानी बांगडी वाच्छावी मर्द फरीदखां राहणार बोरी अडगांव तालुके खामगांव इच्या हातची असें तर्फे मुखत्यार शेखवजीर वा शेखभोलू राहणार बोरी अडगांव तालुके खामगांव

---

# वऱ्हाडसमाचार

मित्ती फाल्गुन शुद्ध ८ शके १८१९

---

√ पार्लमेंटांत मि० साम्युग्ल स्मिथ यांनीं सूचना केली कीं सरहद्दीवरील लढाईचा खर्च इंडियावर सर्वच लादला जाऊं नये. या सूचनेचा धिक्कार करून स्टेट सेक्रटरी लार्ड हामिल्टन ह्मणाले कीं इंडियन प्रजासमूह फार दरिद्री आहे हें खरें पण अलिकडे त्यांची स्थिती सुधारत आहे, या वर्षीं पीकपाणी चांगलें झाल्यामुळें लढाईच्या खर्चा साठीं निराळे कर बसविण्याची जरूरी नाहीं आणि खजिन्यांत ही मोठीशी तूट पडणार नाहीं. सर हद्दीवरील मोहिम ब्रिटिश राष्टाकरितां नसून फक्त इंडियाच्या कल्याणा साठींच चालविली आहे. अशा मतलबाचें भाषण झाल्यावर माजी स्टेट सेक्रेटरी सर फौलर यांनीं लार्ड हामिल्टन यांच्या मतांचें खंडन केलें पण मूळची सूचना बहुमतानें रद्द झाली. ९६ मतें अनुकूळ असून १८८ मतें प्रातिकूळ होतीं.

ही सूचना नापसंत ठरली यांत हर्षशोक मानण्याचें कांहीं प्रयोजन नाहीं. वरील प्रकारची सूचना पसार होणार नाहीं ही गोष्ट विद्यमान स्थितीवरून कोणी सांगू शकेल. प्रस्तुतचा काल मोठा चमत्कारिक आला आहे आणि मोठें नवल हें कीं आमच्या इंडिया सरकारास देखील या देशाची योग्य तरफदारी पार्लमेंटांत करावीशी वाटत नाहीं. इंडिया देश गरीब नाहीं; श्रीमंती वर्णनीय नसली तरी इंडिया सरकारानें स्वकीय बळावरच सर हद्दीवरील लढाई आरंभली आहे; त्या मोहिमेचा खर्च देण्यास इंडिया देश समर्थ आहे; इंग्लंडावर कोणतीच जबाबदारी नाहीं व ब्रिटिश खजिन्यांतून बिलकूल पैसा नको इत्यादि गोष्टी प्रतिपादन करण्याचा हेतू अगदींच वेगळा दिसतो. इंडिया सरकारला सरहद्दी वरील लढाया बद्दल बहादरी मिळावी आणि ब्रिटिश खजिन्याला कांहींच धक्का नाहीं तों पर्यंत इंडियांतील अवाढव्य लष्करी खर्चा बद्दल विचारपूस करण्याची जरूरी पार्लमेंटाला वाटूं नये. इंडिया सरकाराला आपल्या राजनीतीचा मोठा अभिमान आहे आणि तिचा गौरव होण्या साठीं इंडिया सरकारानेंच या देशाच्या श्रीमंतीचा पाढा वाचण्याचा संकल्प जपला आहे सर्वत्र शांतिः शांतिः हा मंत्र ह्मणण्या पासून एक मोठा तोटा होतो. खऱ्या गोष्टी लोपल्या जातात आणि काल्पनिक गोष्टींनीं गैरसमज होतो व परिणामीं मोठें अकल्याण होतें. श्रीमंती नसतांना श्रीमंतीच्या डौलानें वागल्या पासून जसा एकेकटा मनुष्य यशस्वी होत नाहीं तशीच गोष्ट सरकारची किंवा राष्ट्राची आहे.

रायल कमिशना पुढें झालेल्या साक्षी लक्ष्यात घ्यावयाच्या नाहींत, राष्ट्रीय सभेच्या अभिप्रायाला मान द्यावयाचा नाहीं, लोकमत दर्शविणाऱ्या सार्वजनिक संस्था लटक्या समजून त्यांचीं मतें झुगारून द्यावयाचीं ह्मणजे उजेडाचीं द्वारें बंद करून अंधवृत्तीनें वागण्या सारखेंच आहे. दुःखांत सुख इतकेंच कीं पार्लमेंटांत इंडिया संबंधानें असे महत्वाचे प्रश्न निघतात. हल्लींच्या प्रधान मंडळाच्या सत्तेखालीं इंडियाला कोणतीच सुखें मिळण्याची आशा नको.

---

'ब्राह्मण ऋषि' या सही खालीं एका अकोलेकर गृहस्थानें 'टाईम्स आफ इंडिया' पत्रांत एक लेख लिहिला आहे. त्याचा आशय असा आहे कीं स्त्रीशिक्षणाचा प्रसार करण्याला उत्तम साधन ह्मणजे आमच्या समाजांतील विधवा ह्या होत. त्या संन्यासव्रतानें राहत असतात आणि त्यांच्या पारमार्थिक विचाराला एक निराळी दिशा लाविली पाहिजे. त्यांस विद्येची अभिरुची लावून त्यांस विदुषी बनविल्या ह्मणजे सहजच त्या आपल्या जवळील विद्याधनाचा लाभ आपल्या इष्टमित्रांपैकीं भगिनीवर्गास उत्तम प्रकारें देतील अशी आशा आहे. या 'ऋषी' ची सूचना आहे कीं विधवा स्त्रियांस शिक्षण देण्याच्या सोयी पुष्कळ झाल्या पाहिजेत आणि त्यासाठीं पृथक् 'विधवागृह' मोठमोठ्या शहरीं असावें. अशा 'विधवा गृहा' ची दशा पुण्याच्या शारदासदना प्रमाणें होऊं नये ह्मणून लोकांची श्रद्धा व विश्वास बसेल अशी व्यवस्था असली पाहिजे. ही सूचना चांगली आहे आणि प्रस्तुतच्या चळवळीच्या कालीं तिचा योग्य विचार होईल अशी आशा आहे.

---

## आकोला म्युनिसिपालिटी व घर तपासणी.

चांदा रेलवे कडील बाजूस ग्रंथिक संनिपात ज्वरानें आपला अम्मल बसविण्यास सुरुवात केल्यापासून आसपासचे प्रांतांतील अधिकाऱ्यास व रयतेस रोगाची बरीच दहशत पडली आहे. तिकडून मध्यप्रांत अगदीं नजिक असल्यामुळें ईकडील अधिकाऱ्यांस ह्या विषारी तापाचा प्रादुर्भाव आपले प्रांतात उद्भवूं नये ह्मणून अहर्निश काळजी लागली आहे. नागपूर, वर्धा वगैरे ठिकाणीं कारंटाईन व सिग्रिगेशन पूर्ववत् सुरू ठेवण्या विषयीं घाटत असून रेलवेचे प्रवासीं व इतर वाटसरू यांची तपासणी करण्याचें काम ही पुन्हा चालूं झालें. खानदेशांत जळगांव, नेरी, व जामनेर तालुक्यांत ह्या रोगानें प्रवेश करून पुष्कळ फन्ना उडविणें सुरू केलें आहे. ह्या भयंकर शत्रूचा रोख वऱ्हाड प्रांतात शिरण्याचा दिसतो कारण चांद्याचे बाजूनें यवतमाळ जवळ आहे. व खानदेशकडून बुलढाणा जिल्हा सरहद्दीवरच आहे. अशा प्रकारची स्थिती असल्यामुळें वऱ्हाडचे सानिटरी कमिशनर साहेब व इतर प्रमुख अधिकारी वर्ग यांचें लक्ष स्वच्छता राखण्याकडे लागणें अगदीं साहजिकच आहे. मुंबई, पुणें, कऱ्हाड वगैरे दक्षिणेकडील मुलखांत ह्या भयंकर शत्रूनें "दे माय धरणी ठाय" करून सोडलें व सरकारास व रयतेस सदहू शत्रूचा पराभव करण्यास द्रव्याचा किती चुराडा करावा लागला व लागत आहे हें आपल्या वऱ्हाड प्रांतांतील लोक पूर्णपणें जाणतच आहेत. आपल्या वऱ्हाड प्रांतास भिती बाळगण्याचें कारण नाहीं कारण उन्हाळा अगदीं समीप येऊन पोहचला आहे व उन्हाळ्यांत ह्या विषारी तापाचा जोर अगदीं नाहींसा होतो व जरी ही गोष्ट खरी आहे तरी एकदा साथ सुरु झाल्यावर तिचा बिमोड लवकर होणें कठीण आहे. कोंवळ्या झाडास जसें सहज उपटून काढितां येतें तसें मोठ्या वृक्षास काढितां येत नाहीं. हीच या रोगाची अवस्था आहे. जावत्काल रोगानें आपलें ठाणें देविलें नाहीं त्या पूर्वीच त्याच्या पताका निशाण वगैरे झुगारून देणें अगदीं अवश्य आहे. सर्व विद्वान व अनुभवशीर वैद्य व डाक्तर यांच्या मतें ओलसर जमीन असली ह्मणजे तिजवर कुजणाऱ्या पदार्था पासून हवा जास्त खराब होते. वाळलेलीं पानें, केर कचरा नासके कुचके पदार्थ तापाचा आजार उत्पन्न करण्यास मुख्य कारण आहेत. कुजणाऱ्या पदार्थांपासून घाणवायु निघतात व त्या मुळेंच हवा बिघडते मोऱ्या संडास वगैरेचें घाणेरडें पाणी सांचून त्याची घाण होऊन हवा एकदा बिघडून गेली ह्मणजे ताप वगैरे महान भयंकर रोगास मोठेंच साह्य मिळतें. ही गोष्ट सिद्ध धरली ह्मणजे आपलीं घरें, कोठे पायखाने, वगैरे अशा चोहोकडेस पसरलेल्या दारुण ग्रंथिक साथीच्या ज्वराचे वेळीं स्वच्छ ठेवणें फार अवश्य आहे. व असें केल्यानें विषारी ताप ही रोखित येतात.

अकोले येथें ह्या जिल्ह्याचे लोकप्रिय डे० क० मे० हेअर साहेब यांचे अध्यक्षेत खालीं अकोले म्युनिसिपाल कमेटीची स्पेशल जनरल सभा गेल्या २५ तारखेस भरली होती. त्यावेळीं ह्या भयंकर तापाचे निवारणार्थ प्रारंभीच काय काय बंदोबस्त केले पाहिजेत ह्मणून पुष्कळ उहापोह होऊन घरतपासणीचें काम फार लवकर सुरू करून शहर अगदीं स्वच्छ ठेवलें जाण्याविषयीं तजवीज एकदम अमलांत आणावी ह्मणून ठराव पसार झाला शहरांतील व पेठेतील घर तपाणीचे काम करण्या साठीं चार सब कमेट्या स्थापन केल्या असून प्रत्येक कमेटींत तीन मेंबर नेमले गेले आहेत. सिव्हील स्टेशन (वार्ड नंबर ३) चे तपाणीचे काम खुद्द डे० कमिशनर सा० यांणीं

मे० सिविल सर्जन यांची मदत घेऊन करण्याचें पत्करलें आहे प्रत्येक सब कमेटींत एका मुसलमान जातीच्या मेंम्बराची निवडणूक केली आहे. तपासणी करितांनां घरांतील नुसतें अवार न पाहतां प्रत्येक घरांतील सगळे भाग तपासले जाऊन घाण, केर कचरा, कुजट व घाणेरडे पदार्थ अगर दलदलीची जागा दिसून आल्यास घर मालकास सदर्हु घाण काढून घर स्वच्छ ठेवण्या विषयीं समज द्यावी व दिलेल्या मुदतींत त्याणें अमलींबारी न केल्यास कमेटी मार्फत घाण काढविली जाईल व तो खर्च घर मालकाकडून वसूल करण्यांत येईल. अशा वेळीं प्रत्येक घर मालकांनें कमेटीस मदत देणें फार जरूर आहे. व आमचे आकोल्याचे लोक आपले उदाहरणानें जिल्ह्यांतील व प्रांतांतील पुष्कळ लोकांस आपला कित्ताच घालून देतील अशी आह्मांस बळकट उमेद आहे. मागल्या जूलै व आगस्ट महिन्यांत महामारीनें आपल्या शहरावर कसा कडक अम्मल बसाविला होता हें शहरवासी लोक अजून खास विसरले नसतील; त्या वेळीं आकोल्याची सॅनिटेशन ( स्वच्छता ) पुष्कळ कारणांमुळें वाईट झाली होती व त्याचे भयंकर परिणामही आपणास चांगलेच सोसावे लागले ही गोष्ट लक्षांत ठेऊन आमचे शहरवासी लोक कमेटीची तपासणी येण्या पूर्वींच आपआपलीं घरें दारे चुना वगैरे लावून स्वच्छ करतील व घरांत असलेले नासके, कुचके पदार्थ नाश करून टाकतील व ज्याचे पायखाने मोऱ्या वगैरे फुटल्या असतील त्या दुरुस्त करून घाण काढून टाकतील व असें केल्यानें प्लेग सारखे येणारे भयंकर अनर्थापासून आपलें वेळींच आरोग्य रक्षण करून घेतील. मागाहून हजारो रुपये खर्च करण्या पेक्षां वेळींच थोडे पैसे खर्च करून आरोग्य रक्षण करणें हा न्याय सर्वांसच इष्ट वाटेल हें सांगणें नकोच.

---

येत्या रविवारीं दर्यापुरास हायस्कूलमाजी विद्यार्थी समाजाच्या वार्षिक समारंभास प्रारंभ होणार आहे. त्यावेळीं खालील सूचना आणण्याचा विचार कांहीं गृहस्थांचा आहे:-

"ज्या कोणाला या समाजाचा मेंबर होण्याचा हक्क असेल त्यानें समाजाचा मेंबर होण्यासाठीं प्रथम १० किंवा त्याचे कितीही पट रुपये समाजास दिल्यावर तो या समाजाचा मेंबर समजला जाईल.

या रकमेचा जो फंड होईल त्याला वऱ्हाड हायस्कूल माजी विद्यार्थी समाज फंड हें नांव दिलें आहे.

या फंडाचा उपयोग कोणत्याही प्रकारच्या व्यापारासाठीं केला जाईल.

या रकमेचें जें उत्पन्न येईल त्यांतून खर्च वजा जातां जो निवळ नफा राहील तो प्रत्येक मेंबरास त्यानें दिलेल्या रकमेच्या मानानें विभागला जाईल.

फंड वसूल करण्यासाठीं एप्रील १८९८ ते ३१ मार्च १८९९ हें साल प्रथम समजलें जाईल. या सालीं जे मेंबर होतील त्यांनीं आपली रकम चार हप्त्यानें द्यावी. प्रथम हप्ता एप्रील १० चे आंत, दुसरा जुन १० तिसरा आगष्ट १० व चवथा आक्टोबर १०.

या पुढें प्रत्येक सालांत जे नवे मेंबर होतील त्यांनीं वरील प्रमाणें त्या त्या सालांत हप्ते बंदीनें आपली रक्कम द्यावी.

ही रकम आकोला अगर उमरावती येथें समाजाच्या जनरल सेक्रेटरीचे नावांनें पाठवावी. जेव्हढी रकम पोहचेल ती जमा केल्या बद्दल सेक्रेटरीचे सहीचा दाखला दिला जाईल.

ही रकम कोणाचे पेढीवर ठेवावी व काय व्याजानें ठेवावी हे समाजतर्फे या पैशाच्या व्यवस्थे साठीं जी सबकमिटी नेमण्यांत येईल त्या सबकमिटीनें ठरवून व्यवस्था लावावी.

या पैशाचा उपयोग कोणत्या व्यापारा कडेस वेळोवेळीं करावा हें ठरावेण्या साठीं व त्या प्रमाणें व्यवस्था करण्या साठीं एक कमिटी समाजा तर्फे आकोला येथें नेमिली जावी. कारण अकोला हें व्यापारा संबंधानें वऱ्हाडचे मध्य भागीं आहे.

कोणता व्यापार काढावा व त्या संबंधानें काय व्यवस्था लावावी या बदलचा अधिकार वरील कमिटीस असावा. मेंबर होण्यासाठीं दिलेली रकम परत दिली जाणार नाहीं. व त्या बद्दलचा हक्क विकण्याचा त्या मेंबरास अधिकार नाहीं. निदान ३० तीस हजार रुपये भांडवल जमेपर्यंत कोणताही व्यापार काढला जाणार नाहीं.

भांडवल जमल्यास असोसिएशन नोंदिली जाईल व सविस्तर नियम व शर्ती ठरविल्या जातील

---

The Berar Samachar

MONDAY FEBRUARY 28 1898

## A NEW SCHEME

An association of the past students of the Berar High Schools in existence for the last ten years holds its annual gatherings in the Holi holidays on the plan of the Deccan College Gathering. We all know that the gatherings of the Ex—students of the provincial schools have been very popular with their members. Some years ago the New English School of Poona started a gathering of the past and present students of that institution and the Poona High School too has followed suit. The gathering of the past students of the Berar High Schools is specially welcome as it serves a double purpose. It is always looked upon as an occasion for mirth, jollity, and a free interchange of thought with some additional advantages. It serves the purpose of an object lesson to some of the younger members in as much as they have here a chance to look, with pride coupled with a zeal for emulation, upon some gentlemen of their own school to rise before them with an excellence of moral character, high social position and the noble qualities of the heart and the head. One stands here in the midst of happy familiar faces of his school days. The several members interchange thoughts in a free open manner and compare notes of their life's experiences. Some do not spare pains to invite the rest of the company to an intellectual feast of eloquence, learning and philosophy. Even a casual looker—on is struck with the social harmony, the heartfelt greetings, that prevail in the hall of liberty and the free easy open chitchat—all of which go a very great way to the development of character.

The second equally great purpose served by our gatherings is that they provide us with a decent, useful, manly, elevating entertainment in place of the indecent, sordid, demoralizing and enervating one that we would unfortunately meet with otherwise.

Another addition of a still higher utility is proposed to be made to these happy gatherings. An idea has been floating in the minds of the principal movers to attach to it some concern which will naturally interest the members, ensure their presence and active cooperation each year and by that very act promote the interests of the concern. The working of the concern will be automatic. (if we may use that word.) The gathering itself breathes a cardial response of mutual trust, confidence and individual responsibility. This state of guarantee is a sure opening to success. An absence of confidence usually proves a stumbling block in all ventures, and as a gathering like ours presupposes mutual confidence and mutual support we venture to propose to attach a business concern to this gathering. We put it before the members with a view to invite discussion and practical adoption in any form to be generally approved after a due consideration and discussion at the ensuing gathering. The concern should be started on a small scale in the beginning. The capital should be raised by shares of Rs. 10 so as to place the share within an easy reach of every member of the gathering. The main principle is to collect funds and to utilize them in a business—like manner in the interest of the shareholders.

The first basis of this business should be mutual support, and effective cooperation. We repeat that such a business will give a sort of permanance to the gathering as it will always remain a subject of direct interest to its members. Moreover it will teach a commercial life to those of its members who lend it their support and the profits will in some measure enrich the gathering and give it a more robust and a more healthy life. In such a scheme cooperation sure and certain is the key to its fulfilment and we therefore close this article by requesting the members to give some thought to this, and leave it to them to determine the particular form and character of the concern by a common consent.

---

A danger is looing in the near future. A rumour is afloat that Mr. V. M. Mahajani shall be in charge of the places of Deputy Inspectors of Amraoti and Ellichpore districts and his place is to be abolished altogether If this be true we would deprecate in emphatic terms the short sighted policy of applying the shears of economy in the wrong place. We hope to revert to the subject in future.

---

## वऱ्हाड

हवामान— उत्तरोत्तर उष्मा भासूं लागला आहे. किरकोळ दुखणीं व कांजण्या, देवी वगैरे आजार हीं थोडथोडीं फैलावत आहेत. धान्यसमृद्धीमुळें लोक आनंदांत आहेत. पिण्याच्या पाण्याची हांकाटी बहुत ठिकाणची आहे.

मि० मिश्रीप्रसाद ए० असि० कानसरव्हेटर. वैरागगड जंगल, यांस ९ जानेवारी सन १८९९ पर्यंत १ वर्षाची फर्लो रजा मिळाली आहे. आणि त्यांच्या रजेंत मि० व्ही. कृष्ण स्वामि मुदलीआर, रेंजर यांस ए० अ० कानसरव्हेटर नेमिलें आहे.

मि० इ. मार्शल ए० अ० कमिशनर, वाशिम, यांस गेल्या २९ वे तारखे पासून एक महिन्याची हक्काची रजा देण्यांत आली.

वाशिम जिल्ह्यांतील रेगांव, राजुरा, बेलवाडी, देवठाणा, वांई, पार्डी, बेरि व सुरकुंडी या गांवच्या बंजारी लोकांवर प्रत्येक गांवाला दरमहा रुपये १७–१४–८ पै प्रमाणें खर्च बसवून दोन दोन नवीन कानस्टेबल बंदोबस्ता साठी नेमण्याचा हुकूम स्थानिक सरकारानें काढला आहे.

रा० रा० माधवराव आण्णाराव तहशिदार यांस आणखी दोन महिन्यांची आजारापणाची रजा देण्यांत आली.

मि० जे. एम. वाचा असि० इंजिनिअर यांस पश्चिम वऱ्हाडांतून काढून पूर्व वऱ्हाडांत बदलले आणि मि० ए ए. पासन्ना असि० इंजिनिअर यांस पूर्व वऱ्हाडांतून पश्चिम वऱ्हाडांत बदललें.

गेल्या डिसेंबर महिन्यांत वऱ्हाडांत ६८३७ मनुष्यें जन्मलीं व ८७१३ मनुष्यें मरण पावलीं. दुष्काळामुळें जननाचें प्रमाण पुष्कळ उतरलें आहे.

रा० रा० विनायक आप्पाजी काणे तहशिलदार, अकोट यांस ३ महिन्यांची हक्काची रजा देण्यांत आली असून त्या रजेंत रा० रा० दामोदर नानाजी, क्लार्क आफ कोर्ट निसबत डिपुटी कमिशनर, अकोला यांस तहशिलदार नेमण्यांत आलें आहे हें कळविण्यांस आनंद वाटतो.

रा० रा० बाळकृष्ण बळवंत सुळे बी. ए. एक्स्ट्रा असि. कमिशनर यांची मोर्शीहून वाशिमास बदली होणार असून रा० रा० गोपाळ नारायण बापट बी. ए. एल. एल. बी. यांस मोर्शीस बदलणार आहेत. आणि मि० सैफुद्दीनखान लालखान क्लार्क आफ कोर्ट निसबत डिपुटी कमिशनर, उमरावती यांस एक्स्ट्रा असि० कमिशनर नेमून त्यांची नेमणूक उमरावतीस करावीं अशी शिफारस झाली आहे हें कळविण्यास मोठा आनंद वाटतो.

उमरावतीचे डिपुटी कमिशनरचे डिपुटी क्लार्क रा० रा० वासुदेव काशिनाथ परांजपे याची नेमणूक त्याच जागीं कायम होण्या सारखी असून विनाकारण त्यांचे हक्क बुडविण्यांत आले आणि त्यांची पिच्छेहाट झाली!

रा० रा० भगत यांची नेमणूक मेहकरच्या तहशिलीवर होत आहे असें कळतें.

---

## आकोला बाजारभाव

| | दर खंडीस |
|---|---|
| आळशी | ८२ रुपये |
| जवारी | ४२ पासून ४८ रु० |
| गहूं ( कांठे ) | ११० रु० |
| ,,( बन्सी ) | १३० रु० |
| चणे | ७९ रु० |
| तेल | ९ रु० मण |
| तूप | ७॥ मण |
| मीठ | ३॥– मण |
| सोनें | २४ तोळा |
| चांदी | ८० |
| कपाशी | ३९ |
| रुई | ४[illegible] |

## वर्तमानसार

बाराखगीकडील भागांत राहणाऱ्या कित्येक झिआउद्दीन तायफ्यांतील पठाणांनीं शिनकमर येथें झालेल्या लढाईतून यार्कशायर रेजिमेंटपैकीं रिव्हेट नांवाच्या सोल्जरास कैद करून नेलें होतें. पण त्याला परत आणण्या करितां पाठविलेल्या तुकडीनें त्याला पठाणापासून सोडवून आणला आहे. त्याची मुक्तता करण्या बद्दल पठाणांनीं कोणत्याही प्रकारचा मोबदला ता मागितला नाहींच, पण जोंपर्यंत तो त्याच्या ताब्यांत होता तोंपावेतों त्याची चांगली बरदास्त ठेविली होती. अफ्रीदीचो त्यांपैकीं झकाखेल व दुसरे आणखी कित्येक तायफावाले अद्याप नरमावल्यांचें दिसत नाहीं. इतकेंच नाहीं पण त्यांच्यामुळें ओरकझाई तायफावालेही बिथरल्या सारखे झाले आहेत. त्याचें ह्मणणें असें आहे कीं, अफ्रीदी लोकांना व्यापार धंद्याकारितां इंग्रजाचे हद्दींत जातां येऊं नये ह्मणून कोहाट व कुरम या खिंडीच्या नाक्यावर ज्या लष्करी चौक्या ठेवण्यांत आल्या आहेत त्यामुळें अफ्रीदी लोकांबरोबर आह्मालाही त्रास सोसावा लागतो. पेशावर खिंडीकडील भागांत वादळाची गर्दी उडाली आहे, आणि त्यामुळें अफ्रीदी लोक लढाईस तयार होणार नाहींत असा सुमार दिसत आहे. अफ्रीदी लोकांचे जे पुढारी पठाण तहाची बोलणीं करण्याकारितां जमरूद येथें आले होते ते अद्याप तेथेंच आहेत. त्यांची गेल्या सोमवारीं सर विलियम लॉखार्ट यांनीं भेट घेतली होती. निकाल समजला नाहीं. येत्या एप्रील महिन्यांत अफ्रीदी लोकांवर जी मोहिम करण्याचा सर विलियम लॉखार्ट यांचा बेत आहे ती करण्यापूर्वींच एकाद्या छोटेखानी लढाईत अफ्रीदी लोकांची चांगली कणिक मऊ करून हें सरहद्द प्रकरण शेवटास लागलें जाईल असेंही कित्येकांचे उद्गार निघत आहेत. मकरान किनाऱ्यावरील बंडखोर लोकांना दहशत बसण्याकारितां बऱ्याचशा पहाडी किल्यांचा नाश करण्यांत येणार आहे. तसेंच नसिराबाद व आणखी चार दोन किल्ले तर जमिनदोस्तही करून टाकण्यांत आले आहेत, व दुसरे पाडून टाकण्याची तयारी चालू आहे. गुराखी.

धूमकेतु.—असें सांगतात कीं, ह्या वर्षी अनेक धूमकेतु दृष्टीस पडणार आहेत. एक एप्रिलमध्यें, एक मे महिन्यांत, दोन जून महिन्यांत आणि एक वर्षाचे अखेरीस ह्या पांच शेंडेनक्षत्रांच्या उदयावरूनच स्पष्ट होणार आहे कीं, हें वर्ष कोणत्याही प्रकारें ह्या देशाला सुखाचें असें अनुभवास येणार नाहीं.

लंडनच्या स्टेशनावरील टिकिटकलेक्टरांजवळ प्रत्येकीं एकेक विजेचा दिवा दिलेला असतो. त्याचि वरच्या डगल्याला अडकाविलेला असून, त्यांच्या खिशांत एकेक विजेची ब्याटरी असते, तींतून त्या दिव्याला वीज पुरविली जाते. येणेंकरून त्यांना दुसऱ्या हातकंदिलाचें ओझें वाहावें लागत नाहीं ही विशेष सोय असते.

ट्रान्सव्हाल ( दक्षिण आफ्रिका ) मधून सर्व हिंदी लोकांनीं ता० ३१ मार्च १८९८ च्या आंत निघून जावें असा त्या सरकारचा जाहिरनामा प्रसिद्ध झाला आहे. त्यावरून त्या राज्याची राजधानी प्रिटोरिया येथील हायकोर्टात तेथील रहिवासी हिंदी लोकांकडून नुकसानीचे दावे करण्यांत येतील असा अजमास आहे.

सरहद्दीवरील वादांचा व तंट्यांचा निकाल लावून शांतता करण्याचें काम ब्रिटिश सरकाराकडून सर रिचर्ड अड्नी यांजकडे देण्यांत येणार असून तत्संबंधानें सर्व प्रकारचे अधिकार त्याजकडेस सोपविले जातील. फक्त त्यांचेवर परदेशीय खात्याचे सेक्रेटरींची मंजुरी घेतली जाईल, असें ठरलें असल्याचें सिव्हिल ॲन्ड मिलिटरी ग्याझेटच्या समजण्यांत आलें आहे.

अझून सरहद्दीवरच्या लढाईला शांतता येत नाहीं. डोंगरी लोकांनीं आमचे सरकारच्या गोटावर हल्ला करून ९ आफिसर ठार मारले, तीन जखमी केले. आणि २२ गोरे सोल्जर मारले व १७ जखमी केले. ह्या शिवाय काळे शिपाई किती मारले गेले व जखमी केले त्यांची संख्या समजली नाहीं. शत्रूकडचेही पुष्कळ लोक मारले गेले. हा युद्धानल इतक्यांत विझून शांत होईलसा रंग दिसत नाहीं. तो असाच बरेच दिवस धूमसत राहणार आणि आमच्या सरकारास पुष्कळ खर्चाखालीं आणणार हें उघड दिसत आहे.

देशी कारागिरी—सियालकोट [पंजाब] पैकीं कोठली नांवाच्या गांवीं, बुंदेलखंडमधील नौगांव येथें असलेल्या ६ व्या लष्करी छावणींतला उमरुद्दीन मामल लोहार ह्या नांवाचा कारागिर दोन महिन्याचे रजेवर आपल्या घरीं गेला असून तेथें त्यानें धान्यें वगैरे दळण्याच्या यांत्रिक चक्क्या बनविल्या आहेत. ह्या चक्क्या एक मनुष्य एक कालीं ४ ( चार ) चालवूं शकतो. ह्याच कारागिरानें एक चमत्कारिक कुलुप तयार केलें आहे. तें कुलुप कसें उघडावें हें ज्याला माहीत नाहीं त्यानें तें उघडण्याचा यत्न केल्यास तें त्याला मुळींच उघडतां येत नाहीं. कुलपांत दारू व गोळ्या भरून ठेविल्या असतां कोणी चोर तें कुलुप उघडण्याचा यत्न करूं लागल्यास बार होऊन कुलुप उघडणाराचा हात जायबंदी होतो. कुलुपाची माहिती असणाराला हा अपघात टाळतां येतो आणि बार होत नाहीं. हें कुलूप ह्मणजे एक जागता पाहरेकरीच असून, तें एकदां तिजोरीला किंवा घराला लावलें ह्मणजे वेगळा मनुष्य दारावर राखण करण्यास ठेवण्याचें प्रयोजन उरत नाहीं. ह्या कुलुपाला ७०० रुपये तयार करण्यास खर्च झाले आहेत. ज्ञा. च.

एका कोटाला किती टांके असतात?—लंडनच्या एका मोठ्या शिंप्याचें काम चालणाऱ्या कारखान्याचे मालकानें एका डगल्याला निदान ४०,००० टांके घालावे लागतात किंवा यंत्राकडून पडतात असा हिशेब काढला आहे ह्या संबंधानें खुलासेवार माहिती त्यानें मुद्दाम आपल्या कारखान्यांतील शिंप्यांना सांगून जमविली. त्यावरून कळलें कीं, डगल्याचा आगपिछा व बगला मिळून तयार करण्यास ४,७८० टांके पडले. गळपट्टीला ४,०६३ व तिचेवर १,७६३ बटनाचे काजे तयार करण्यास २,९२० बाह्या व त्यांचे गोट यांस ९८०, खिसे करण्यास ९२४, अस्तर व रेशमी गोठ शिवण्यास १७,८६२ व संजाफाला २,७६२ ह्या प्रमाणें एकंदर ३९,६१९ टांके पडले असा हिशेब निघाला, ह्मणजे, सुमारें ४०,००० टांके निदान पडतात इतके टांके हातच्या शिवणीनें मारावयाचे झाल्यास, प्रत्येक टांका घालण्यास हाताला एक हात लांबीचा प्रवास होतो असें धरलें तर एक कोट शिवण्यास शिंप्याच्या उजव्या हाताला १० मैल लांबीचा प्रवास करावा लागतो असें प्रमाण निघतें.

लॉर्ड विलियम नेव्हिल यास विश्वासघाताचे आरोपावरून ५ वर्षाची सक्त कैदेची शिक्षा झाली आहे.

अफगाण सरहद्दी संबंधानें पार्लमेंटांत जो हल्लीं वादविवाद सुरू आहे त्यांत सर मंचरजी भावनगरी यांनीं प्रधानमंडळाच्या मतास अनुरूप असें आपलें मत दिलें होतें, परंतु त्यांतले त्यांत हिंदुस्थान देशाला पैशासंबंधी इंग्लंडनें मदत करावी. गु.

दक्षिण आफ्रिकेंतील ब्रिटिश मुलखा पैकीं उत्तर चार्टर लॅन्डचे सरदार मपासिनी यानें तेथें बंड केल्यामुळें त्या भागांत राहणाऱ्या युरोपियनांच्या तोंडचें पाणी पळालें आहे. सदरचें बंड नाहींसें करण्याकरतां न्यासालॅन्ड येथून ४०० शिपायांची फौज व कित्येक तोफांसह कर्नल मेनिंग यास तिकडे पाठविण्यांत आलें आहे. ग.

मि. ट्यांड यांच्या खुनाशीं रा. टिळकांचा कांहीं संबंध नाहीं असें दृष्टोत्पत्ती आल्यामुळें किंवा त्यांच्याविषयीं पूर्वीं दाखविलेल्या गेलेल्या अनुदारतेबद्दल पश्चात्ताप झाल्यामुळें ह्मणा, पण सरकारानें त्यांस कारागृहांतून मुक्त करावे, अशा सूचना इंग्रजी बर्तमानपत्रांतून होऊं लागल्या आहेत, हें सुचिन्ह आहे असें समजलें पाहिजे. प्रसादचिन्हानि पुरः फलानि, ह्मणतात त्याप्रमाणें त्यांच्या खाण्यापिण्याच्या बाबदींत कांहीं सवलती मिळाल्या आहेत असेंही ऐकतों. दीड वर्ष तुरुंगांत प्रत्यक्ष वास केल्यानें, व त्यांच्या शरीरास क्लेश दिल्यानें कोणताही हेतु सिद्धीस जातो असा भाग मुळींच नाहीं. सरकारास त्यांच्यावर जय मिळाला आहे. आतां त्यांनीं अशा रीतीनें आपलें औदार्य दाखविलें तर त्यांचा लौकिक वाढून लोकांत त्यांच्याबद्दल प्रेमभाव उत्पन्न झाल्यावांचून राहणार नाहीं असें आह्मी मागेंच सुचविलें आहे. रा. टिळकांवर काहूर उसळण्यापूर्वीं मुंबईच्या दैनिक पत्रांत कांहीं आलें कीं, तें होणारच असें भाकीत करण्यास कांहीं दिवस मुळींच संशय नव्हता, तीच स्थिती हल्लींही कायम असेल, तर त्यांत अनुकूल लेख येत आहेत हें सुचिन्ह आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं. देव करो आणि हें प्रत्ययास येवो असें आह्मी मनःपूर्वक इच्छितों.

सरहद्दीवरील लोकांच्या हातीं, अगदीं सुधारलेलीं शस्त्रें येतात कोठून हें एक बरेंच दिवसपर्यंत मोठें कोडें होतें. आतां असें बाहेर आलें आहे कीं, खुद्द इंग्लंडांतूनच हजारो टन दारू गोळा व लक्षावधि बंदुका तयार होऊन इंग्रजी गलबतांतून इराणी आखातांत किंवा तांबड्या समुद्रांत बंदरास लागतात ! परवां बलुचिस्थान नावाचें एक तारूं पकडलें त्यावर असला माल होता त्यावरून शोधा अंतीं असें कळलें कीं, इंग्लंडांतले अनेक कारखानदार असला धंदा आज कित्येक वर्षें करीत आले आहेत याचप्रकरणीं रशियन सरकारचीही थोडीशी मदत असावी असाही सुगावा लागला आहे. सु०

मधमाशी हा प्राणी दिसण्यांत किती लहान आहे पण तो मनुष्याच्या किती तरी उपयोगी पडतो. मधमाशीनें सतत उद्योगानें काळजीपूर्वक जमा करून ठेवलेला मध व तयार केलेलें मेण हमेषा माणसाच्या उपयोगी पडतें हें सांगावयास नकोच. इजिप्त देशांत फार प्राचीन काळापासून मधाची उपयोग औषधाचे कामीं करण्याची वहिवाट चालत आली आहे. आपल्या वैद्यकांतही मधाचा उपयोग पुष्कळ सांगितला आहे. ग्रीक लोकांतही औषधांत मधाचा उपयोग करीत असें त्यांच्या वैद्यक ग्रंथावरून दिसतें. सारांश मध हा मनुष्यास अति उपयोगी वस्तु आहे. परंतु मधमाशांनीं बनविलेला मधच मनुष्याला औषधाचे कामीं उपयोगी पडतो असें नाहीं; तर स्वतः मधमाशाही तशा उपयोगीं पडतात असें एका डाक्तराचें ह्मणणें आहे. मधांत बुडून मेलेल्या मधमाशाचा उपयोग डोळे स्वच्छ करण्याच्या, आणि बधिरपणा घालविण्याच्या कामीं करून पहावा अशी त्यानें शिफारस केली आहे. डोळे स्वच्छ करण्यासाठीं जेव्हां मेलेल्या मधमाशांचा उपयोग करावयाचा, तेव्हां माणसाचे हातपाय बांधले पाहिजेत; कारण त्या औषधाचा डोळ्यांत बराच चरका बसतो. डोळ्यांतून नुकत्या काढलेल्या मधमाशा घेऊन त्या वाटून त्याची पूड डिएरेटिक वाईन या औषधाबरोबर दिली असतां तिच्या योगानें जलोदराचा रोग तावडतोब हटतो असें एका डाक्टराचें ह्मणणें आहे.

लार्ड केलविन् नांवाचे एक अतिशय नामांकित विद्युच्छास्त्री आहेत, त्यांनीं थोडे दिवसांपूर्वीं एक व्याख्यान दिलें त्यांत पृथ्वीच्या वयाबद्दल विवेचन करून या बिकट प्रश्नाबद्दल सयुक्तिक असें उत्तर दिलें. आजपर्यंतचा असा समज होता, कीं पृथ्वीवर जीवसृष्टि उत्पन्न होण्याला कमींत कमी २०,००,००,००,००,० वर्षें झालीं असावीं परंतु आतां जे नवीन शास्त्रीय शोध लागले आहेत, त्यावरून असें अनुमान काढण्यास जागा आहे कीं खरोखर पृथ्वी इतकी कांहीं वृद्ध नाहीं. ती किती तरी तरुण आहे. त्यांचें ह्मणणें असें कीं पृथ्वीला सध्यांची घनता येण्यास २,००,००,००,० पासून ३,००,००,००,० वर्षें लागलीं असावींत याहून अधिक नाहींत. सर्व प्रकारचे भूस्तर तयार होण्यास अतींत अति ह्मणजे सारीं १,७०,००,००,० वर्षें लागलीं असावीं असें अत्यंत आधुनिक मत आहे. लॉर्ड केल्विन् यांचें मत असें आहे कीं, पृथ्वी जीवसृष्टीच्या योग्य झाल्याला तीन कोटीपेक्षां अधिक वर्षें झालीं नाहींत. क०

---

☞ हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे “ वऱ्हाससमाचार ” छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.